

सुबोध
संस्कारधारा
सौ. सुहासिनी वसंत जलतारे
संपादक - प्रा. डॉ. सौ. वसुधा वि. देव

# सुबोध
# संस्कारधारा

लेखिका

**सौ. सुहासिनी वसंत जलतारे**

◆ संकलन ◆

**ॲड. वसंत हनुमंतराव जलतारे**

◆ संपादक ◆

**प्रा. डॉ. सौ. वसुधा विनोद देव**

**सुनंदा प्रकाशन, अकोला- ४४४ ००१ (म. रा.)**

◆ सुनंदा प्रकाशन क्र. १५ , १५ एप्रिल २०१२.

◆ **सुबोध संस्कारधारा**
**सौ. सुहासिनी वसंत जलतारे**

◆ संपादक
**प्रा. डॉ. सौ. वसुधा विनोद देव**
भ्रमणध्वनी : ०९४२२९५९७६४

◆ **श्री विनोद देव** © सर्व हक्क सुरक्षित

◆ प्रकाशक :
**श्री मनिष शांताराम बुटे**
सुनंदा प्रकाशन, राजेश्वर अपार्टमेंट,
जलाराम शाळेजवळ, तापडिया नगर, अकोला.
दूरध्वनी : ०७२४-२४२१२९६, मो.:०९४२११२०२२५

◆ आवृत्ती पहिली : **१५ एप्रिल २०१२**
चैत्र कृ. १०, शके १९३४

◆ अक्षर जुळवणी व मुखपृष्ठ :
**श्री नितीन मो. भोप्मापुरे**
योगीराज कम्प्युटर केअर शॉपी, अकोला.

◆ मुद्रण : **श्री प्रकाश शर्मा**
श्रीसाई उद्योग, अकोला

मूल्य : रू. १००/-

# ॥ अर्पण पत्रिका ॥



**मुलाचे चालीने चालावे । मुलाच्या मनोगते बोलावे**
**तैसे जनास शिकवावे । हळु हळु ।।**

* समर्थ रामदास स्वामी

आपल्या वाङमयातून असंख्य लोकांना सुसंस्कारित करणाऱ्या
जगद्गुरु समर्थ रामदास स्वामी व असंख्य बालगोपालांना
ही विचारधारा सादर अर्पण...



# संपादकीय मनोगत

सौ. सुहासिनी जलतारे ! माझी आई. आज आईला जाऊन एक वर्ष झाले. पण ह्या वर्षातील एक क्षणही तिच्या आठवणीशिवाय गेला नाही. विस्मरणच झाले नाही. त्यामुळे स्मरणाचा प्रश्नच उद्‌भवत नाही. उच्चविद्या विभूषित आई, अत्यंत सुधारक कुटुंबात जन्मलेली आई, माणसाने जगन्मित्र कसे असावे असा आदर्श घालून देणारी आई अकोला जिल्ह्यातील अकोट गावात लुकतुके घराण्याची कन्या. ह्या घराण्याला मुळातच सुधारक विचारांचा वारसा आंबेडकरी चळवळीतील विस्मरणात गेलेला इतिहास, ज्या घराण्याने दलितांना विहीर उघडी करुन दिली. ज्या घराण्यातील स्त्रिने प्रौढाच्या साक्षरतेसाठी हातात कंदील घेऊन दलितवस्तीत जाऊन अनेकांना जीवनाचे धडे दिले अशा इंदिराबाई लुकतुके व बिंदुमाधव लुकतुके ह्यांची सुविद्य कन्या म्हणजे आई. लग्नानंतर अतिशय परंपरागत व कर्मठ घराण्यात सून म्हणून पदार्पण केले. शासनाच्या समाजकल्याण विभागात वर्ग २ अधिकारी असणारी पुढारलेल्या विचारांचे बाळकडू घेवून जलतारे घराण्यात प्रवेशित झाली. घरी सोवळ्या आजेसासू तो काळ बालविधवा, केशवपनाचा काळ होता. घरात सासू, सासरे, नणंदा, दिर, भावजया अशा नात्यांच्या दृष्टिकोणातून सुसंपन्न पण कर्मठपणा ही परंपरा असणाऱ्या घरात आईचे पदार्पण झाले. आपल्या कर्तृत्वाने संयमी वर्तनाने घरातील कर्मठपणा तीने दूर केला. पण हे दूर करण्यात कोठेही आपण काही वेगळे करतो आहे हा भाव नव्हता. हे सर्व सहजपणे फक्त तिच्या वागण्यातूनच घडत होते. पुढारक विचारांची जरी ती होती तरी संस्कारांची संपन्नता तिच्याकडे होती तिच्या वर्तनात, वागण्यात, बोलण्यात होती. आमचे घर म्हणजे एक संस्कार केंद्र होते. आजी, आजोबा आम्ही चार भावंडे. आई, बाबा अशी सुंदर कुटुंबाची ती चौकट होती. पण ही चौकट बंदिस्त नव्हती कारण, ह्या चौकटीची कवाडे आईनी अगदी अलगदपणे

सर्वासाठी उघडी केली होती. ह्याच कवाडामधून आम्ही पिल्ले आमच्या पखांत बळकटी आणण्यासाठी बाहेर पडलो. आयुष्याच्या प्रत्येक घटनेप्रती तीने सजग केले आणि म्हणूनच आज आम्ही अनेक संकटावर मात करुन पुन्हा जीवन सार्थकतेने जगत आहोत.

ती कुटुंब मैत्रिण होती. ती समाजसेविका होती. ती मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणारी होती. प्रत्येक प्रसंगात बाबांना साथ देणारी ती प्रेमाची, मायेची सावली होती. जीवनातील अनेक कठीण प्रसंगावर मात करुन त्या प्रसंगाना नमवणारी ती एक योध्दाच होती. आम्हाला शिस्त लावणारी ती शिक्षिकाच होती. ती केवळ जन्मदात्री म्हणून आई नव्हती तर खऱ्या अर्थाने ते आईपण तिने जपले. सासरी पाठवितांना संस्कार तांदुळाच्या ओटीचे दान तिने आमच्या पदरात टाकले. तिचे मातृत्व केवळ तिच्याच अपत्यापुरते मर्यादित नव्हते. तिचे मातृत्व हे व्यापक होते. तिने निसर्गावर प्रेम केले, तिने मुक्या प्राण्यांवर प्रेम केले, तिने मानवजातीवर प्रेम केले. ती मातृत्वाचा अखंड स्रोत होती. आपल्या आयुष्याला बाबांच्या जीवनाशी एकरुप करुन घेणारी ती पतिव्रता होती. तिचा समर्पण भाव, समरसता पाहून आम्ही खरच भारावून जातो. बाबासोबत अखंड अव्याहतपणे साथ देणारी ती तेजोमय ज्योत होती. बाबांनी अंगीकारलेल्या प्रत्येक व्रतात तिचा पूर्ण सहभाग होता. असंख्य अडचणीवर हसत हसत मात करणारी ती यशस्वी स्त्री होती. ती प्रत्येक समस्येचे समाधान होती. माणसे जोडणारी ती गुरुकिल्ली होती. लोकांना बोलते करण्याची कला तिच्याजवळ होती. ती उत्तम गुणग्राहक होती. तिने सुरु केलेले समर्थ मंडळ आजही अकोटात कार्यरत आहे. तिने ह्या समर्थ चळवळीच्या माध्यमातून अनेक स्त्रियांना बोलते केले. त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. १९७५ साली तिने स्थापन केलेला सुबोध संस्कार वर्गातून आज अनेक बालकांनी झेप घेऊन आज ते आपले यशस्वी जीवन जगत आहे व संस्कार शिदोरींचे दान ते आपआपल्या कुटुंबांना देत आहेत. ह्या संस्कार वर्गात विविध उपक्रमातून तिने अनेकांच्या पंखात बळ दिले व हे देतांना ती त्याच्यात रममाण झाली. व ह्या संस्कार वर्गाला जे धन दिले तेच आज पुस्तक रुपाने प्रकाशित होत आहे. आईचे हे विचारपुष्प आज

तिच्याच चरणी अर्पण. मनोगतातून तिचा साहित्यप्रवास आपोआप उलगडत जातो व त्यातून तिची संस्कारांची गर्भ श्रीमंती लक्षात येते. आजही आईच्या देवघरातील समई तिच्या संस्कार अस्तित्वाची जाणिव करुन देते.

सर्वात महत्वाचे म्हणजे ती प्रखर गुरुभक्त होती. आणि म्हणून अत्यंत धैर्याने ती मृत्युला सामोरे जाऊ शकली. नव्हे तिने मृत्युचे गुरुस्मरणात स्वागत केले. तिची ही निर्भयता पाहून काळही क्षणभर हेलावला असेल. असं म्हणतात की व्यक्तीच्या मृत्युवरुन त्याची जीवनशैली अंतिमतः लक्षात येते. आयुष्यभर धैर्याने जगणारी अशी ती होती.

आज निशीगंधा वाड ह्यांच्या एका कवितेची प्रखरतेने आठवण येते.

तिच्या श्वासाचा उच्छवास, मी तिच्या प्रतिभेचा पडसाद मी
तिच्या छबीची सावली मी, तिच्या वेलीवरची पाकळी मी
तिच्या अंगणीची आठवण मी, तिच्या गुणाची साठवण मी
तिच्या अस्मीतेचा ताठ कणा मी, तिच्या कर्तव्याची जाण मी
माझ्या अंतःकरणाचा प्राण ती, सखी गुरु दैवत माझी लाडकी माय ती

आईची ही संस्कारधारा बालसाहित्यात निश्चितपणे नव्याने भर घालेल. ह्या संपूर्ण कार्यात माझ्या सतत पाठीशी असणारे व मला सहकार्य करणारे माझे बंधु श्री जयंत जलतारे (मॅनेजर, एच. पी.) श्री नारायण जलतारे ( विंग कमांडर ) तसेच जिजाजी डॉ. सुनिल लुले ह्यांची मी ऋणी आहे. ह्या पुस्तकाची संकल्पना देणाऱ्या सौ. अर्चना जलतारे, सौ. प्रणोती जलतारे, सौ. शैलजा लुले ह्यांची मी ऋणी आहे. तसेच सुनंदा प्रकाशनचे श्री मनिष शां. बुटे, व सदैव प्रेरणा देऊन ह्या पुस्तकाला प्रस्तावना देणारे मा. डॉ. शांताराम गो. बुटे ह्याची मी ऋणी आहे. तसेच ह्या पुस्तकाची छपाई करून त्याला मूर्तरूपात सादर करणारे श्री नितीन मोहनराव भोजापुरे ह्यांची देखिल मी ऋणी आहे.

माझ्या आईचे हे संस्कारधन अनेक बालगोपालांच्या चरणी समर्पित.

**डॉ. सौ. वसुधा विनोद देव**
सहयोगी प्राध्यापक



# प्रस्तावना

सुबोध संस्कारधारा हे सौ. सुहासिनी वसंत जलतारे ह्यांचे बालसाहित्यावर आधारित पुस्तकाची प्रस्तावना लिहण्याची जबाबदारी माझेवर आली. तेव्हा लेखिकेच्या जीवनाचा मी प्रथम मागोवा घेतला. तेव्हा असे लक्षात आले की प्रस्तुत पुस्तकाच्या लेखिकेचा जन्म हा अत्यंत सुधारक अशा घराण्यात झाला. व अशा काळात झाला ज्यावेळी संपूर्ण समाज हा जातीच्या बंधनात अडकला होता. उच्चवर्णीय–दलित ही प्रचंड दरी समाजात होती त्या काळात बिंदुमाधव व इंदिराबाई लुकतुके ह्या दांपत्याच्या पोटी जन्म झाला. आंबेडकरी चळवळीमधील दुर्लक्षित इतिहासाचा वारसा ह्या घराण्याला होता. दलितांना विहीरी उघड्या करुन देणे. दलितांसाठी प्रौढ साक्षरता वर्ग घेणे इ. सामाजिक कार्य लेखिकेच्या आई वडिलांनी केले व हेच बाळकडू त्यांनी आपल्या अपत्यांना दिले. त्याचाच परिणाम म्हणून की काय आज ही बालसाहित्य कलाकृती वाचकाच्या हाती येत आहे. गेली ४५ वर्षे आकोट सारख्या लहान गावात सुबोध संस्कार केंद्र स्थापन करुन लेखिकेने अनेक बालकांवर संस्कार केलेत. त्यातील अनेकजण आज उच्च विद्या विभूषित असून नोकऱ्यांमध्ये उच्च पदांवर आहेत. ह्या संस्कारवर्गाच्या विविध उपक्रमात लेखिकेने प्रत्यक्ष स्वतः सहभागी होऊन ज्या विविध संस्कारधारा बालगोपालांपर्यंत पोहोचविल्या त्यांचे संकलन म्हणजे 'सुबोध संस्कारधारा ' होय. ह्या सुबोध संस्कार धारेत आपणास नाट्यधारा, काव्यधारा, लेखधारा, दासबोध चिंतनधारा, कथाधारा इ. या शीतल वर्षाव अनुभवास मिळणार आहे.

काव्यधारेत एकूण २५ कविता आहेत. ह्या कवितांचे अवलोकन कवयित्री म्हणून लेखिकेची भमिका ही अत्यंत तरलसूक्ष्म व भावनाप्रधान आहे असे आपणास आढळते. पण त्यालाही प्रखर वास्तविकतेची किनार लाभली आहे. देवा तू दगडात आहे तेच बरे आहे असे म्हणणारी कवयित्री

ईश्वराच्या चरणी लीनही होवू इच्छिते. कवयित्री ही प्रखर देशभक्तही आहे. भावीजवानांना ह्या देशाचे उत्तरदायित्व निभावण्याचा संदेश त्यांनी आपल्या कवितेतून केला आहे. शारदा स्तवन असूदेत की स्वागतगीत सर्वांमध्ये त्यांची वैश्विक भावना वाचकांच्या प्रत्ययला आल्याशिवाय राहत नाही. कवितेमधील वऱ्हाडी मानसं, चंची ह्या सारख्या कवितेतून कवयित्रीचे वऱ्हाडी भाषा व मायबोलीवरील प्रेम व्यक्त होते. मनोगत, जाणिव ह्या सारख्या कवितेतून त्यांचा वास्तव दृष्टिकोण लक्षात येतो. आपल्या काव्याच्या माध्यमातून संस्कारभिक्षा ही त्यांनी उपलब्ध करुन दिली आहे.

कथाधारेत लेखिकेच्या कथा ह्या समाजातील वास्तव चित्रणावर आधारित आहेत. पण तू वाट चुकलीस, कोर्टातील क्षण ह्या कथामधून स्त्रीकडे पाहण्याचा प्रगल्भ दृष्टिकोन आपल्या लक्षात येतो. स्त्रिच्या आयुष्यात अनेक समस्या येतात. पण त्या समस्येशी सामना करण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण होणे हे त्या समस्येचे उत्तर असते. पलायन करणे हे कोणत्याच समस्येचे उत्तर असू शकत नाही. हा आजच्या काळालाच नव्हे तर सर्वकालिक सिध्दांत लेखिकेने मांडला आहे. आबा ड्रायव्हरचे व्यक्तीमत्व यातील शैली ही पु. ल. देशपांडेच्या शैलीशी आपले नाते जोडते. संत व ईश्वर ह्याबद्दलचा प्रेमभाव असणाऱ्या कथांचाही ह्यात अंतर्भाव आहे.

नाट्यधारेत नाटक व नाट्यछटा ह्या दोन्हीचा अंतर्भाव आहे. आई संपावर जाते. जुन्यांचा आला कंटाळा ह्या नाटकामधून नाते संबंधातील सूक्ष्म गुंफण आपल्या लक्षात येते. अनेक नात्यांना आपण गृहित धरतो, पण ह्या सर्व नातेसंबधाचे व्यक्तिच्या आयुष्यात एक स्वतंत्र स्थान असते व ते श्रेष्ठ असते. आम्ही पुस्तके शिकवितो आयुष्य नाही ह्या नाटकातून शिक्षणाचे आजचे वास्तव चित्रण लेखिकेने रेखाटले आहे. चंद्रभागेच्या तीरावर हे संत साहित्यांवर आधारित एक प्रकारचे संगीत नाटक आहे. संत साहित्यात भर टाकणारे असे हे नाटक संताचे कार्य त्याची ईश्वर भक्ती प्रगट करते. कठपुतली हा नाविन्यपूर्ण प्रकार लेखिकेने दिला आहे. प्रत्यक्ष बालकांना कठपुतलीच्या भूमिकेत उभे करुन ह्या नाटकांचे प्रयोग संस्कार वर्गाच्या विविध कार्यक्रमात घेण्यात आलेली आहे. हे लेखिकेचे सृजनात्मक कार्य आहे. आपल्या पारंपरिक कलांना

ह्यामुळे उजाळा मिळण्यास व वैभव प्राप्त करण्यास मदत होते. इतिहासावर आधारित गड आला पण सिंह गेला शिवबाच अमुचा राजा ह्या नाटकामधून शिवाजी महाराजांचे रेखाटलेले चित्रण हे मनाला सुखावून तर जातेच पण लेखिकेचा भारतीय इतिहासाचा सार्थ अभिमान अभिव्यक्त होतो.

दासबोध चिंतनधारेत समर्थ रामदासाच्या दासबोधावर आधारित काही चिंतनात्मक भाग आहे. बालकांकरिता अत्यंत आवश्यक असणारे हे संतसाहित्य संपूर्ण दासबोध वाचणे हे बालकाकरिता शक्य नाही पण तरी त्यातील काही पृष्ठ त्यांनी वाचावे हा लेखिकेचा खटाटोप आहे आणि म्हणूनच वेळोवेळी बालकांना दासबोधाचा जो संदेश त्यांनी आपल्या संस्कार वर्गात दिला तो ह्या भागात अंतर्भूत करण्यात आला आहे.

सुबोध संस्कार धारेतील काव्यधारा, नाट्यधारा, कथाधारा, लेखधारा, दासबोध चिंतनधारा ह्यातून वाचकाचे जीवन निश्चितपणे समृध्द होत जाते. विचार प्रगल्भ होत जातात. बालसाहित्यात ह्या निमित्ताने एक मोलाची भर पडते आहे. हे सर्व अनुभवण्याकरिता लेखिका आज नाहीत. पण त्यांच्या विचाराच्या रुपात त्या अनेक पिढ्यापर्यंत पोहोचणार आहे, आणि म्हणूनच संस्काररुपाने त्या अनेक बालकाचे व्यक्तिमत्व घडवित आहे. प्रस्तुत पुस्तकाचे मुखपृष्ठ अतिशय बोलके आहे. कोणत्याही प्रवाहाचा उगम हा लहान असतो व ह्या प्रवाहास अनेक प्रवाह येऊन मिळतात व त्यातून एक भव्य जलाशय निर्माण होतो. ह्या प्रवाहाचा मार्ग हा वरुन खाली दाखविण्यात आला आहे. शिवाय ह्या प्रवाहाचा मार्ग हा अत्यंत खडतर आहे. पण हा प्रवाह नित्य वाहतच असतो व आपल्या आजुबाजूचा प्रदेश हा हिरवागार करतो. अशा ह्या प्रवाहाचे चित्र मुखपृष्ठावर घेऊन संपादकांनी आपल्या सृजनशीलतेचे उत्कृष्ट दर्शन घडविले आहे. ही संस्कार धारा अशीच प्रवाहीत राहो अगदी तळागाळातील बालकांपर्यंत पोहोचून व त्यांचे आयुष्य सुखी व समृध्द व्हावे. हिच ईश्वरचरणी प्रार्थना करतो. व प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मी शुभेच्छा देतो...!

**डॉ. शांताराम गोवर्धन बुटे**
प्राचार्य

# कुटुंब

बिंदुमाधव तात आणि माता होती पहा इंदिरा ।
श्री. नरसिंग जिथे आकोट गावी संसार तो थाटला ।

वकीलीचा व्यवसाय तो करुनिया नावा रुपा येऊनी ।
संसारास करुनी धन्य गेले किर्ती अंम्हा ठेवूनी ।

होती शांत आणि सुशिल विमल संसार वेलीवरी ।
अरविंदास नसे दुजिच उपमा गमतो वडिलांपरी ।

आदर्शास आम्ही सदैव ठेऊ ऐसी मिनाक्षी असे ।
शोधा जीवनी हास्य हे म्हणतसे ऐसी सुहासिनी दिसे ।

सारे गुण सवे सुरेश आला दोषास ना सापडे ।
वासंती गमते बहार ऐसी जीवनी फुलावे असे ।

पेठे श्रेष्ठ आणि सुशिल हे असती, जमात ते शोभती ।
कर्तव्यास किती करुनी राहू मोघे असे भासती ।

नामे जो असतो वसंत त्याला उपमा नको ती दुजी ।
जोडीला मिळतो वसंत दुसरा सृष्टीस नाही कमी ।

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| मुखपृष्ठ | - | १ |
| अर्पण पत्रिका | - | ३ |
| संपादकीय मनोगत | - | ४-६ |
| प्रस्तावना | - | ७-९ |
| लेखिकेचे मनोगत | - | १० |
| अनुक्रमणिका | - | ११-१४ |
| ❖ **काव्यधारा** | - | १५ |
| स्वागतगीत | - | १६ |
| समूहगीत | - | १७ |
| शेतकऱ्याचे गीत | - | १८ |
| गीत | - | १९ |
| देवा | - | २० |
| संस्कारभोजन | - | २१ |
| आई | - | २२ |
| जाणिव | - | २३ |
| पारिजात | - | २४ |
| स्मित | - | २५ |
| बाबा | - | २६ |
| वऱ्हाडी मानसं | - | २७ |
| चंची | - | २८ |
| मनोगत | - | २९ |
| बटुस | - | ३०-३१ |
| पतीस | - | ३२ |

| | | |
|---|---|---|
| माझ्या ओव्या | - | ३३ |
| मातृभोजन | - | ३४ |
| भिक्षावळ | - | ३५ |
| सहजीवन | - | ३६ |
| सर्वस्व | - | ३७ |
| मना | - | ३७ |
| म्हातारपण | - | ३८ |
| गोपालकाला | - | ३९ |
| माझे दासबोध मंडळ | - | ४० |
| ❖ नाट्यधारा | - | ४१ |
| आई संपावर जाते | - | ४२-५० |
| कठपुतली - १ | - | ५१-५४ |
| कठपुतली - २ | - | ५५-५६ |
| माझा मटका | - | ५७-५८ |
| आम्ही पुस्तके शिकवतो, आयुष्य नाही | - | ५९-६४ |
| शिवबाच अमुचा राजा | - | ६५-६९ |
| चंद्रभागेच्या तीरावर | - | ७०-७८ |
| म्हणीची आजी | - | ७९ |
| गड आला पण सिंह गेला | - | ८०-८६ |
| जुन्याचा आला कंटाळा | - | ८७-९७ |
| बाहेर जातात म्हणे | - | ९८-१०१ |
| ❖ कथाधारा | - | १०३ |
| आबा ड्रायव्हर | - | १०४-१०८ |
| कोर्टातील क्षण | - | १०९-११० |
| तू वाट चुकलीस | - | १११-११३ |

| | | |
|---|---|---|
| समर्थाचिया सेवका वक्र पाहे | - | ११४-११६ |
| गणेश जन्मकथा | - | ११७-११८ |
| संध्याछाया | - | ११९-१२३ |
| ❖ **लेखधारा** | - | १२५ |
| आदरणीय मावशी | - | १२६-१२८ |
| संस्कार केंद्र | - | १२९-१३० |
| वनवासी क्षेत्र | - | १३१ |
| लोकन्यायालय - एक दिवस | - | १३२-१३५ |
| महिला दिन | - | १३६-१३९ |
| ❖ **दासबोध चिंतनधारा** | - | १४१ |
| समर्थ रामदास स्वामींचा परिचय | - | १४२-१४४ |
| समर्थांनी मनाचे श्लोक का रचले ? | - | १४५ |
| दासबोध ग्रंथाबाबत | - | १४६-१४७ |
| समर्थांची गणेशस्तुती | - | १४८ |
| अष्टविनायकाचा परिचय | - | १४९ |
| समर्थांनी उल्लेखलेल्या गीता | - | १५०-१५१ |
| दुरात्मा व दुश्चित्तपणा | - | १५२-१५३ |
| पढतमूर्ख लक्षण | - | १५४-१५५ |
| यत्न शिकवण | - | १५६ |
| सद्गुणाचे रहस्य | - | १५७-१५८ |
| उत्तम पुरुष लक्षण | - | १५९ |
| राक्षसवृत्ती लक्षण | - | १६० |
| चातूर्य लक्षण | - | १६१ |
| सत्संग महिमा | - | १६२ |
| श्रवण | - | १६३-१६४ |

| | | |
|---|---|---|
| राजकारण | - | १६५ |
| जनस्वभाव निरुपण | - | १६६-१६७ |
| जाणतेपण | - | १६८ |
| स्वगुण परीक्षा | - | १६९ |
| सद्‌विद्या | - | १७० |
| विश्वमन व मानवी मन | - | १७१-१७३ |
| नामस्मरण | - | १७४-१७५ |
| नामस्मरण भक्ती | - | १७६-१७८ |
| उपासना | - | १७९ |
| विमलब्रह्म चिंतन | - | १८० |

# का व्य धा रा

# स्वागतगीत

स्वागत करुया सकल जनांचे ।
माता भगिनी, गुणी, अतिथींचे ।।धृ।।

आज असे हा दिन भाग्याचा ।
आनंदाने मन भरण्याचा ।
भावफुलांची उधळूनी सुमने ।।१।।

मुख्य अतिथी पद भूषविती ।
माता भगिनी कौतूक करीती ।
बोल बोबडे ऐकूनी घ्यावे ।।२।।

आशिष आपण आम्हा द्याया ।
बोध असावा संस्काराचा ।
रक्षण करु या स्वातंत्र्याचे ।।३।।



# समूहगीत

देशाचे या राष्ट्राचे या आम्ही भावी जवान
सिध्द होऊनी पुढे जाऊ या हाती घेवू निशाण ॥ धृ ॥
आम्ही भावी जवान

उज्ज्वल अमुच्या इतिहासाचे गाऊ अवघे गान ।
शहीद झाले त्यांना अमुचा मुजरा आणि प्रणाम ॥ १ ॥
आम्ही भावी जवान

भारतीयांच्या संस्कृतीचा आम्हाला अभिमान
पुढे चालवू वतन आम्ही हे देशाची ती शान ॥ २ ॥
आम्ही भावी जवान

सुजलाम सुफलाम भूमिवरती असलो आम्ही सान
समृध्दीच्या शिखरावरती नेऊ तिला हे काम ॥ ३ ॥
आम्ही भावी जवान

देशाचे ते रक्षण करण्या आम्ही पुढे जाणार
शूरवीर आम्ही देशाचे हो नागरिक होणार ॥ ४ ॥
आम्ही भावी जवान

# शेतकऱ्याचे गीत

पानी येरं, पानी येरं, पानी येरं ॥धृ॥
चांदीच्या सरी आभाळातूनी
सोनं पिकलं शेतामधूनी
मोत्यांच्या दाण्यांत, पानी येरं ।

डोईवरचा घडा भरेल ।
आनंदाने मनहि फुलेल ।
ऐशा नव जीवनांत ।
पानी येरं......

हिरवा चारा मिळे गुरांना ।
दूध मिळे ते तान्हुल्यांना ।
चाळांच्या नादांत ।
पानी येरं......

देशामधे होई सुबत्ता ।
हर्षित होईल भारतमाता ।
जय जवान, जय किसान ।
पानी येरं....

पाण्याची ती वाट पहाण्या
डोळ्यांमधले अश्रू वहाण्या
अवसर देवू नको ।
पानी येरं....

# गीत

जयभारत हा जयभारत हा घोष आम्ही करणार
विश्वशांतीचा मंत्र म्हणोनी राम नाम जपणार

शुरांच्या या देशामधूनी शौर्य आम्ही घ्यावे
संताच्या त्या बोधामधूनी अमृत ते प्यावे
चिरंजीव राहून आम्ही हे देशकार्य करणार ॥ १ ॥

प्रगतीचा त्या वाटेमधले काटे करुनी दूर
ध्येयाचे ते शिखर गाठण्या होऊ आम्ही शूर
देशाच्या त्या ऐक्यासाठी सदैव आम्ही झटणार ॥ २ ॥

नामाचा तो महीमा ऐका समर्थांनी गाईला
संकटकाळी हरुषकाळी रामनाम गावा
आज जरी सामान्य तरीहि उंच उद्या जाणार ॥ ३ ॥

# देवा

देवा तू दगडात आहेस हेच आहे बरे
निदान केलेला नवस, फेडतात तरी सारे
बाहेर येऊन पहा सव्वा रुपयाचे पेढे
नवसाला पावायला, पुरतात तुला खाणे ?

रामराज्य करु असे म्हणतात तरी खरे
देवा दगडात आहेस हेच आहे बरे ॥ १ ॥
बाहेर आलास तर देतील भारत छोडो नारे
सत्तेच्या तुकड्यासाठी कुत्री भांडतात सारे

देवा तू दगडात आहेस हेच आहे बरे
डोळे मिटून क्षणभर बसतात तरी सारे
याचवेळी नेमके तू डोळे उघडून पहा
साऱ्यांच्या ध्यानाचे रहस्य पहा ॥ २ ॥

देवा तू दगडात आहेस हेच आहे बरे
अज्ञानात सुख आम्ही मानतो तरी खरे
आशेवर जगून निदान एक क्षण तरी
हात जोडून नम्र आम्ही होतो पायावरी ॥ ३ ॥

# संस्कारभोजन

अह्वैता ये मातृभोजना
सुवर्णपात्री नवपक्वान्ना....॥ धृ ॥

नवरत्नांच्या रांगोळ्या या ।
नवरस ऐशा पाककला त्या ।
श्रीहरी स्मरुनी करी भोजना ॥१॥

माता बाळा घास भरविते ।
गोड गोड घे बाळ मुखी ते ।
मुखी असु दे शब्द गोड हा ॥२॥

घासासवे ती शिकवी तुजला ।
निती संस्कृति धर्म आपुला ।
विनयाने विद्येस भूषवा ॥३॥

# आई

तुझ्या मायेचे चांदणे । माझे मन त्यात न्हाते ।

गलबला भवतीचा । तरी निवांत वाटते ॥

आई, तुच गे माझ्या । मनाचा ग विसावा ॥

तुझ्या भेटीचा मनाने । ध्यास सदा घ्यावा ॥

आई, धरला नाहीस । कधी आग्रह कशाचा ।

तरी का ग आठवतो । तुझा निग्रह मनाचा ॥

आई, माझिया मनाला । दिलीस तू तुझी मूस ॥

तुझ्या घासाची ग चव । राहे माझ्या जिभेवर ।

आणि सत्य जीवनाचे । राहे माझ्या मनावर ॥

आता प्रत्येक गोष्टीत । होतो तुझाच आठव ।

करतांना सर्व वाटे । आहे तुझाच साठव ॥

जीवनरस असा । आई तुझ्यातला ।

माझ्या मनी प्रगटला । संसारी हा उतरला ॥

खूण ही पटे जेंव्हा । मन ग्वाही दे मजसी ।

तू नाहीस गे दूर । नित्य जननी ती असशी ॥

# जाणिव

वाटतय मनाला खूप संसार झाला
पण कोणत्या साधनाने आपण तो मोजला

संसार पण आजवर खूप केला कसून
पण जीवनाच्या कसोट्या पहिल्या का घासून

खूप वाचन केले पण विसरायला झाले
जीवाला भिडणारे त्यांत काय सापडले

अहंकाराने आपण जातो आहे तळाला
ही गोष्ट कधी शिवलीच नाही मनाला

वरची गोष्ट मिळवायला खूप उड्या मारल्या
पण विवेकाच्या पायऱ्या कधीच नाही चढल्या

साधक होऊन आम्ही परमार्थ करणे आहे
दासबोध वाचण्याने ही जाणीव आली आहे

उत्तम गुण अभ्यासून, अवगुण सांडू या
अंतरात्मा शोधण्यास पुढे पाऊल टाकू या

# पारिजात

अंगणांत माझ्या तू गे । लाविलास पारिजात ।
ठेवोनिया शिरी हात । जगी धन्य झाले आज ॥ धृ ॥

अंगणांत पडतो जेंव्हा । सडा पारिजातकांचा ।
मनामध्ये रेखिले मी । आठवणींच्या रांगोळ्या ॥ १ ॥

एक एक वेचिते मी । फूल पारिजातकाचे ।
मोलाचे ते क्षण आहे । जीवनांत वेचायाचे ॥ २ ॥

झाड हालवुनी बघते । आहे कां ते कोठे फूल ।
कर्तव्याची मजला कधिही । नको पडाया ती भूल ॥ ३ ॥

हार गुंफतांना वाटे । गुंतले मी या मायेत ।
परि अर्थ भरला आहे । तयाच्याच सुगंधात ॥ ४ ॥

तुझेच ते घेऊनी मी । तुला अर्पिते गे माते ।
आशिर्वाद हाचि देई । कार्य होऊ दे या हाते ॥ ५ ॥

# स्मित

ओठी बघुनी तुझिया, स्मित ते मनांत येते ।
जीवनांत हास्य अपुल्या, स्मितात त्या असु दे ।
हसुनी खळाळणारा, मग नावडे समुद्र ।
हळु संथ वाहणारी, सरिता दिसे सुरेख ।
उद्रेक वादळाचा, नाशी पहा जगाला ।
मधु गंध धुंद वारा, हेलावेती जीवाला ।
रुचला कधिही नाही, अंधार निराशेचा ।
किरणांत शोधिते मी, आशा आणि मनिषा ।
जगी काही साध्य करण्या, मी मंद पावलाने ।
गांठीन ध्येय शिखरा, शोधिन त्या स्मिताने ।

# बाबा

बाबा, तुमचे त्यावेळचे सामाजिक विचार अजुनही किती ताजे वाटतात ।
आणि म्हणूनच आम्हाला शिळे कधी खावेसेच वाटत नाही ।
स्वतंत्र, मुक्त स्त्रीचे चित्र तुम्ही त्यावेळी रंगविले ।
अजुनही त्या कलेत कमतरता आहे असे वाटतच नाही !
अस्पृश्य, दीन दुबळ्यांना तुम्ही जवळ केले ।
गाडीत बसले । तरी त्यांना दूर लोटावेसे वाटतच नाही ।
पै अन् पै चा हिशेब करुन संसाराचे गणित तुम्ही जुळविले ।
अजुनही त्या हिशेबाच्या वह्या, टाकाव्याशा वाटतच नाही ।
तुमच्या तापट, जिद्दी स्वभावाला आम्ही खूप घाबरलो !
पण 'वाघाला' दुसरे काही म्हणणे जमलेच नाही ।
तुमच्या बागेश्रीची सम मनात एवढी ठसली ।
की, तसा बाल गंधर्व अजून ऐकलाच नाही ।
एवढ्या उमेदीने तुम्ही स्वतःचे घर बांधले ।
पण ते सोडतांना तुम्हाला काहीच नाही वाटले ।
मनाचा हा स्थिर भाव केव्हा आत्मसात केलांत ।
आम्हाला मात्र हे कधी कळलेच नाही ।
तुमच्या सावली सारखी रहाणारी आई, तुम्ही साक्षरता वर्गाला पाठविली ।
तशी हातात कंदील घेवून जाणारी शिक्षिका अजूनही दिसलीच नाही ।
बाबा, तुम्ही आम्हाला अनमोल विचार सागरात नेले ।
बाकी नद्या त्याला केव्हा मिळाल्या हे कळलेच नाही ।

# वऱ्हाडी मानसं

आम्ही वऱ्हाडी मानसं अहो लई आहो साधे ।
आधी देऊ चा अन मग पोहे बी त्याले ॥ १ ॥

आपल्या चंचीमंदल अर्ध पान त्याले ।
लोंग इलायची अन वर जर्दा गोडबोले ॥ २ ॥

अन् त्या चंचीतल्या गोष्टी काय रंगतात सांगू ।
एकेका येकराले इस इस किंटल गहू ॥ ३ ॥

आम्हा वऱ्हाडी लोकांची रहानी लई सादी ।
दिवसा नाईट पैजामा अन् रातच्याले पॅंटभी चालसील ॥४॥

सासुरवाडीच बांधलं घड्याळ, वर सूर्यनारायण आले ।
आणि तेंव्हाच आमच्या घड्याळ्याचे बारा की हो वाजले ॥ ५ ॥

शेतात आला ट्रॅक्टर अन् घरात आली मिक्सी
पण आमच्या दोघांमधली सरली नाही अजुनही खेकसा खेकशी ॥ ६ ॥

बॅंकेच कर्ज काढलं अन् पोराच्या लग्नांचं फेडलं
पाऊस आला नाही म्हणून पीक बी बुडालं ॥ ७ ॥

पन् मिशीवर तान देनं अजून बी नाई सरलं ।
लाथ मारली तेथून पानी बी आम्ही काढलं ॥ ८ ॥

पन् आमच्या वऱ्हाडी मानसाचं दिल लई साफ ।
अन् उगाच काई बाई बोलून तोंडाची गमावू नका वाफ ॥ ९ ॥

# चंची

चंचीमदलं पान लसं लागले मोठं गोड ।
पण ठेल्यावरच्या पानाची राजा गोष्टच सोड !
कापसाची बंडी बाजारांत जाऊन इकली ।
अन् त्या रोजी सारी चंची म्या नोटायनी भरली ।
गनप्याला म्हनलं टॅक्टर जूत ।
माझ्या बी शौकाले आज लईच आला ऊत ।
तालुक्यालो गेलो तर ह्यो गर्दी सिनेमाले ।
भारी टिकट काढून शान पाह्यलं त्या भाग्यश्रीले ।
हाटीलात जाऊन मिसळ च्या झाला ।
अन् मग हात्त सरळ चंचीकडेच गेला ।
चंचीतल्या नोटांनी घातली साद ।
ठेल्यावरच्या पानाची लईच आली याद ।
मसाल्याच्या पानाचा तोबा म्या भरला ।
अन् घरच्या लक्ष्मीचा ह्या येवढा दोळा दिसला ।
लक्ष्मीच्या यादेत लईच मन गुतलं ।
कडु गोड आठवणीत ते खोल जाऊन रुतलं ।
म्हनलं दोन बेस पानं तिले बी घ्याव ।
उगाच कुणाच्या नजरेचं काह्याला खाये ।
चंचीतल्या नोटा ठेल्यावर काढून ठेवल्या ।
अन् दोन पानांच्या पुरचुंड्या जागच्या जागी जाऊन बसल्या ।
टॅक्टरमध्ये बसून अर्ध्या वाटेवर आलो ।
अन् म्हनलं पानवाल्याचे पैसे द्यायला इसरलो ।
म्हनुनशान घातला चंचीमध्ये हात ।
अन् नशिबाने माहा लईस केला घात ।
तवा ठरविलं देवा चंचीतलं पान चंचीतच राहू दे ।
अन् दिसा दिसानं त्याची गोडी बी वाढू दे ।

# मनोगत

वाटतय मनाला अर्धा संसार झाला !
पण असे म्हणतांना कशाने तो मोजला !

म्हणे संसार पण आम्ही आजवर केला आहे कसून ।
पण अनुभवाच्या कसोट्या पाहिल्या आहेत का घासून ।

उंच काहीतरी मिळवायला खूप उड्या मारल्या ? ।
पण विवेकाच्या पायऱ्या कधी तरी चढल्या ।

म्हणे आयुष्यात आम्ही वाचन तर खूप केले ।
पण जीवाला भिडणारे त्यात किती सापडले ।

मी मी माझं माझं म्हणताना किती वेळ घालविला ।
पण ईश्वराचे नामस्मरण करायला वेळ नाही मिळाला ।

लोकांच्या डोळ्यातली कुसळ बघायला किती चष्मे वापरले ।
पण दिव्य दृष्टीचा चष्मा लावून सृष्टीला नाही न्याहाळले ।

अशा विचारांनी मन कसे ढवळून ढवळून येतय ।
आणि म्हणूनच दास बोधा मृताचा एक थेंब प्राशन करणे आहे ।

# बटुस

जोडोनी कर दोन्ही मी विनविते । कार्यास या गणपति ।
कर्ता आणि तुच ते करविता । ठेवा कृपा दृष्टी ही ।
श्री. राजेश्वरी आश्रमी तुझ्या गे । जमलेत प्रेमीजन ।
देवी आशिश हा खरा बटुवरा । कुर्यात बटोर्मंगलम् ॥ १ ॥

आहे सुंदर रम्य हा परिसर । वाहे नदी नर्मदा ।
हिरवी गार डुले कशी वनश्री । संतोष वाटे मना ।
पात्री हे भरले असे जणु जिव्हा । मांगल्य पावित्र्य ते ।
तोडी आश्रम भव्य हा वदतसे । राजेश्वरी नांदते ॥ २ ॥

ऐशा सुंदर या स्थळी आजि हा । व्रतबंध नेमियला ।
झाले धन्य पिता आणिही माता । पाहोनी तो सोहळा ।
आहे प्रेमळ ती पितामही तुझी । पीतामह सद्‌गुणी ।
बंधु सुश्रुत हा जणु गमतसे । श्रीराम तो मन्मनी ॥ ३ ॥

धर्माला करी विश्वधर्म आणि । विश्वास मनी धरा ।
ऐशा थोर मनी नसे कधीही । द्वैतास तो आदरा ।
ऐसा वागुनी सार्थ तू करी खरे । अद्वैत हे नाम गे ।
होसी तू कुलभूषणा आशिश हा । देते तुझा आज रे ॥ ४ ॥

ठेवा बंधन धर्म आणि नीतीचे । घ्यावे आणि हे व्रत ।
माता आणि पिता तसेच गुरुला । माना खरे दैवत ।
विद्येने भुषवा कुलास अपुल्या । धर्मास त्या वाढवा ।
जिंका प्रेम भरे जगास साऱ्या । कुर्यात बटोर्मंगलम् ॥ ५ ॥

परेमशा मनी नित्या प्रार्थुनी करी । ज्ञानार्जन तत्वत: ।
राग व्देष तसाच अहंभ मनी नको । चित्ती समाधानता ।
सर्वा भूषयी तू जाण हेचि । धैर्य क्षमा शांतता ।
आचरणांत तू आणोनि प्रचिती घे । कुर्यात बटोर्मगलम् ।। ६ ।।

माताश्री करी हेमपात्र घेई । भिक्षा तुला देत से ।
माग्याची जननी तुझी ही माता । सद्‌बुध्दी ती अर्पिते ।
देती मंत्र पिता सात्विक तुजला । जपशी करी चिंतन ।
आशिर्वाद तुला असा बटुवरा । कुर्यात बटोर्मगलम् ।। ७ ।।

भाग्याचा असशी तु बटु खरा । होई असा सोहळा ।
ऐशा पूण्या स्थळी तुझ्यावरी घडे । व्रतबंध संस्कार हा ।
स्वामीजींची कृपा तुझ्यावरी अशी । राहो सदा नित्य ही ।
गुरूचरणी अशी प्रार्थना मी करिते । कुर्यात बटोर्मगलम् ।। ८ ।।



# पतीस

वाढदिनी संख्या बोले
निरांजनातील ज्योती
जीवनातील उतार चढ हे
सांगे मम प्रिती ।।

ज्योतीचे हे तेज आपुल्या
मुखावरी झळके ।
संसारातील समाधान हे
मजला तेथे गवसे ।।

# माझ्या ओव्या

१) आधी मूळ धाडा । धाडा घुंगराची गाडी ।
पहिले वऱ्हाडी । गणपति ।

२) या हो देव देवतांनो । राजराजेश्वरी माता ।
बालकांचा व्रतबंध । यावे वर्षाया अक्षता ।

३) औक्षवण करा तुम्ही । करा पांच सुवासिनी ।
चांदीच्या तबकांत । सोन्याची निरांजनी ।

४) औक्षवण करिते आजी । लाडाची अन् प्रेमाची ।
पंचप्राणाच्या ज्योतीने । ओवाळिते पंचारती ।

५) ताईच्या आगमने । संतोषली आमुची मने ।
अद्वैता त्यांची वाणी । मानी वेदवाक्य खरे ।

६) चांदीचे गंगाळ । चंदनाचे मांडा पाट ।
आंघोळीचा करा थाट । आत्याबाई ।

७) सव्वा पावाची हळद । लावीन तुझ्या अंगा ।
नवस केला होता । आजीबाईंनी ।

८) आंघोळीला जमल्या आहे । सुवासिनी त्या हो आठ ।
जावईबुवा मोजा आता । तुम्ही रुपये एकशे साठ ।

९) बालक बटु शोभे । आई असे ती वरमाय ।
पति पुसतो तुझा गे । हिरवा शालू आणू काय ।

# मातृभोजन

कौतुकाच्या मागे असते प्रेमाची भावना
सुकन्ये करीते या भोजना ॥ धृ ॥

लाज मनातील तुझ्या जाणते
कशास कौतुक हेहि मानते
वंश वाढीची मनी भावना
करीते या भोजना, म्हणोनी
सुकन्ये करीते या भोजना ॥१॥

मानव गेला चंद्रावरती
यंत्र मानवा उपमा नच ती
उच्च तुझे हे विचार असतां
करीते या भोजना तरीही
सुकन्या ॥२॥

प्रगतीची ही विचारसरणी
एक-एक हा पाय चालसी
"नवयुगातील दिव्य पुत्र हा"
देते आशिवर्चना
सखे ग करीते या भोजना ॥३॥

# भिक्षावळ

१) धुतल्या तांदुळाची भिक्षा घालिते झोळीत ।
शुध्द चारित्र्याची बाळा, करि सदा रे जपणूक ॥ १ ॥

२) भिक्षा घालिते लाडुची । ही शिदोरी प्रेमाची ।
पुरेल तुला बाळा । पुरेल जन्मभरी ॥ २ ॥

३) भिक्षा घालिते फेणीची । शुध्द आणि सद्‌गुणांची ॥ ३ ॥

४) गोड आठवणींचे हे । सारण भरिले आंत ।
भिक्षा घालिते करंजी । तुझ्या रे या झोळीत ॥ ४ ॥

५) लक्ष्मी सरस्वतीचा हा । अनरसा नैवेद्य ।
भिक्षा घालीते झोळीत । होशी तू रे तू सुविद्य ॥ ५ ॥


६) चित्तशुध्द करुनिया । जातोस गुरुगृही ।
भिक्षा घेवूनी तू जा रे । विवेक वैराग्याची ॥ ६ ॥

# सहजीवन

जीवनामध्ये स्थान किती ते असते कर्तव्याला ।
गूण असावे अंगी ऐसे लोकसंग्रहाला ।

आदर्शाला सदैव ठेवू ऐसा जीवनसाथी ।
साथ तुम्हाला सदैव मिळाली धन्य असे पत्नी ।

जीवन तुम्ही जगला कैसे, नंतर हो ते किती ?
बघता दोन्ही हर्षभराने कर माझे जुळती ।



## सर्वस्व

देवा काय मागु मी तुला
दिले सर्वस्व मी

तव नमन गाता गाता
झाले चिन्मय मी

त्यागात आहे प्रेम
प्रेमात राहो भक्ती

देवा अशीच असू दे
माझी ही चित्तवृत्ती

## मना

मना बोध केला तुला रे कितीही
घडा पालथा पाणी गेले वरुनी
अता ही समस्या असे जीवनाची
येवो तुला आठव त्या जलाची

# म्हातारपण

किती जगलो यापेक्षा कसे जगलो ।
याचे करायचे चिंतन ।
हेच नव्हे का म्हातारपण ।

निःसंग राहून मनाच्या स्वच्छ आरशात ।
बघायचे आहे आता म्हातारपणचे प्रतिबिंब त्यांत ।

राग लोभ ममत्व द्वेषादि विचार मंथनातून ।
काढले आहेत का कर्तव्याचे माणिक मोती त्यातून ।

याच सर्व कर्मांचे आता अकर्म करणं ।
हेच नव्हे का म्हातारपण ।

तुझ्याजवळचे तू सर्व दुसऱ्यांना दिलेस ।
ते कां आता यावेळी मोजलेस ?

देते घेते हात आता जुळवून पहाणं ।
हेच नव्हे कां म्हातारपण ।

# गोपालकाला

अहो चला चला तुम्ही गावाकडे चला ।
तेथे आहे म्हणे आज वेगळाच गोपालकाला ।

सर्व मंडळींनी आणले आहे कौटुंबिक मोठे पातेले ।
भावफुलांचे हारतुरे सर्वत्र आहेत लावलेले ।

सर्वांनी घातले पातेल्यांत यशकिर्तीचे पोहे ।
सहस्त्र चंद्राचे प्रतिबिंब दूध पण मिसळा काही ।

पंच्याहत्तर वर्षाच्या आठवणींच्या घरातले दूध दही ।
लहानथोर सर्वांच्या कौतुकाची साखर ओता त्यात ।

लहान थोरांच्या कौतुकाची साखर पण आहे आत ।
संसारात मुरलेल्या गप्पांचे लोणचे लज्जत आणतात ।

जुन्या अनुभवाची भिजलेली डाळ शोभा वाढवणार ।
संसाराच्या विचारमंथनातून काढलेले लोणी त्यावर घालणार ।

कष्टानंतर मिळालेली फळे पण दिसताहेत आत ।
सुगरणीचा जमलाच मेळावा पातेले लवकरच भरणार ।

# माझे दासबोध मंडळ

दासबोध मंडळांत या
गुणसुमने ती किती पहा
भक्तीभाव हे उद्याने
भक्त करीती सन्मान
पुष्प उमलली तरुवरी
सुहास्य झळके मुखावरी
सरोज उमले काव्यांत
प्रतिभा वसते गीतांत
शोभा ऐसी वाढावी
क्रिया करुनी करवावी
रजनीच्या निशीगंधात
आशा हसते उद्यांत
पुष्पाची ती कोमलता
आशाची ही उदारता
सदा हासरी विजया ती
असे सुजाता सुभाषिणी
काकू असति थोर अति
तेथे माझे कर जुळती
देवळातली सुनबाई
करी सर्वांची बरोबरी
सिंधुबाई प्रेमळ
केशव राजांची कृपा तयांवर

# ना ट्य धा रा

# आई संपावर जाते

पात्रे :- आई, किशोर, नमिता

( स्टेजवर किशोर शाळेत जाण्याच्या तयारीत, वह्या, पुस्तके बॅगमध्ये भरतां भरता )

किशोर : (घड्याळांत पाहून) माय गॉड, सव्वा दहा झाले, कसा मी वेळेवर शाळेत पोहोचणर अजून बूट मोजे,डबा वॉटरबॅग छे, आई ए आई ग ये ना लवकर

आई : केवढ्यांदा ओरडतोय रे किशोर ? काय झालं, तरी काय ? नेहमीचीच पळापळ होय नां ?

किशोर : ए आई, माझे मोजे कुठे आहेत ? आणि डबा भरला की नाही ? वॉटर बॅग नसेलच भरलेली.

आई : वा रे, तुझं तुला पाहून नाही घेता येत वाटतं, मोजे आई देणार, डबा आई, कपड्यांना इस्त्री आई, होमवर्क ते ही आईच ! आई म्हणजे काय मशीन आहे वाटतं, बटन दाबल की सुरु ।

किशोर : आई प्लीज, आधीच उशीर झाला आहे मला, हे ट्युशनचे सर म्हणजे नं ! ए आई माझे मोजे आणून दे ना जरा ! धुतले असतील .

आई : तर तर धुतले की, एक टेबलखालुन मोजा काढला आणि दुसरा बुटातून, आता पायतले मोजे व्यवस्थित ठेवणे हे काम मीच करणार का ?

किशोर : ए आई अग उशीर होतोय ना मला, दे ना आणून लवकर उद्या नाही त्रास देणार.

आई : तर तर म्हणे उद्या नाही त्रास देणार मला रोजची उद्या उगवते आहे. पण तुम्ही ? हे असेच !

किशोर : ए आई प्लीज दे ना ग मी तुझा लाडका किश्यु आहे की नाही?

आई : असं म्हटलं की झालं, आणते बाबा मोजे कितीही बोललं तरी पालथ्या घागरीवर पाणी ।सकाळपासून तुझ्या बाबाचे करता करता अजून मी चहा पण घेतला नाही आणि आता तुझं (जाते)

किशोर : आणि हो बरका ग आई येतांना डबा, वॉटरबॅग, नॅपकीन सर्वच आण. आता बूट घातल्यावर मी आत कसा येणार ? तुझ्या किचन मध्ये (बुट घालतो) (सर्व आई घेवून येते)

आई : हं घ्या हे तुझ्या आवडीची भाजी दिली आहे, डब्यांत

किशोर : ओहो या, आई खरच माझी चांगली आई (बिलगतो)

आई : तर तर म्हणजे चांगली आई, तुमची कामे केली आवडीचं खायला केलं की म्हणजे चांगली आई. आणि काहीच कामे केली नाही तर रे ? मग बघु या की काय होतय ते ?

किशोर : ए आई असं काय ग करतेस, सॉरी

आई : सॉरी म्हटलं की झालं । जरा आपली कामं आपण करायला शिका । स्वावलंबन म्हणून काही गोष्ट आहे की नाही ? प्रत्येक गोष्ट आई, आई, आई.

किशोर : बापरे (घड्याळांत पाहून) उशीर झालाच शेवटी आता सरांना काय सांगु ? स्वावलंबन विषयावर तू भाषण दिले म्हणून ?

आई : सांग सांग त्यांनाही पटेल, बरं जा आता आणि हो सायकल हळु चालव बरं का!

किशोर : हो हो अच्छा बाय टाटा (जातो)

आई : (स्वगत) चला मुलांच्या बाबांच झालं किशोरचे पण सगळे देवून झालं। सकाळ पासून या सर्वांचे करण्यातच वेळ जातोय माझी अंघोळ, देवपूजा, जप, फुल तोडणं अजून काही नाही तसा कंटाळा येत नाही हो पण कधी कध असं वाटतं नं की, आता मुलं मोठी झाली आहेत. स्वत:ची कामं त्यांनी करुन घ्यावी. एकटीची दमछाक होते हो, पण काय करणार? आलीया भोगासी

असावे सादर. आता नमिता येईल ती डोकं खाईल ! (तिकडे पहात) घ्या आलीच वाटतं ! (नमिता येते)

नमिता : (हाश हुश्य करीत येते) काय गरमी आहे नां ए आई तो पंखा लाव नां जरा (ॲक्शन) (खुर्चीवर बसते)

आई : काय ग नमिता एवढं दमेपर्यंत काय केलंस! सारखी हुश्य, हुश्य करते आहेस.

नमिता : अग आई इंग्लीश आणि गणित नुसत्ता जीव घेताहेत. इंग्रज गेले तेंव्हा त्यांच्याबरोबर इंग्लिश भाषाही गेली असती तर बरे झाले असते. (उठते) पण आता बोलायला तरी वेळ कुठं आहे. एक आई मला लवकर वाढ बरं।

आई : अग पण अंघोळ वगैरे काही करशील की नाही ?

नमिता : छे छे मुळीच नाही. एक्स्ट्रॉ पिरीएड आहे माझा, गणिताचा, आणि हो आई आज युनिफॉर्म पण आहे बरका. ड्रेस प्रेस केलेला नसणार. आई तेवढा करुन ठेव नां! मी जेवते तोवर तू (प्रेसची खूण करते) आणि हो बेल्ट पण घे हं.

आई : कमालच आहे, तुमचे शाळेचे कपडे पण मीच बघायचे कां ? आता तुम्ही लहान आहात का ? वाढून द्यायचे, प्रेस करायची आणि आता उशीर झाला म्हणून बॅगमध्ये पुस्तके भरायला मदत! शिवाय पेनमध्ये कांडी नसणारच म्हणजे मला बाबांचा लपवून ठेवलेला पेन द्यावा लागणार.

नमिता : काय ग्रेट आहेस न आई, अगदी कसं बरोबर बोललीस. याला म्हणावं आदर्शमाता

आई : तर तर आम्ही आदर्श म्हणजे तुम्ही आळशी आणि परावलंबी असेच ना ? जरा स्वतःची कामे स्वतः करायला शिका म्हटलं ! नमिता काय करतेस प्लीज, सॉरी म्हटलं की झालं, आम्ही लोण्यासारखं विरघळणार! छे आता जरा स्वतःच बघत जा

आणि काय ग नमिता, 'स्वावलंबन' या विषयावर तू भाषण केलस आणि लिहून माझ्याकडून घेतलंस आणि बक्षीस तुला मिळालं म्हणजे......

नमिता : व्हॉट ए ग्रेट जोक ! होय नां ? आई तुझ्यासारखी आई मिळायला खरचं नशिबच लागतं. मोठी झाले नं की मी म्हणणार What I am my mother made me ? माझी चांगली आई (बिलगते)

आई : (दूर सारुन) बस्स गोड गोड बोललं की झालं, मला पण माझी चांगली मुलं म्हणायला आवडेल.

नमिता : मग आम्ही चांगली मुलं नाही वाटतं (रागावते)

आई : आहात तर ! सारखं आई हे करुन दे, ते करुन दे मग तुम्ही काय करला ? जरा मोठी झालांत असं काही करा. नाहीतर मी गावालाच जाते कशी. म्हणजे तरी हाताने कामे करावीच लागेल.

नमिता : भलतेच काय बोलतेस आई, मला तर रडुच येत बघ, तुझ्याशिवाय रहाणं म्हणजे ? आई (रडते)

आई : नाही जात ग बाई पण तुम्ही दोघांनी आता सुधारयला हवं असचं वाटतं मला. बरं चल वाढून देते.

नमिता : हो, मी जेवले तोवर तू ड्रेस प्रेस करुन ठेवशील. नेहमीप्रमाणे, आणि डबा छान छान.

आई : झालं कां सुरु ? तुम्ही नाही सुधारणार। मलाच काहीतरी करायला हवं । चल जेवून घे. (दोघी जातात) आतून आई व नमिता बाहेर येतात.

नमिता : आई निघते हं मी यायला थोडा उशीर होईल. मस्त खायला करुन ठेव हं.

आई : जा आता उशीर होईल. (नमिता जाते)
बाय.
(स्वगत) चला नमिता गेली शाळेत. आता कुठे जरा बसायला मिळेल (बसते) (थोडा विचार करते व उठते) आम्ही चौघच-

चौघ पण किती दमायला होतं नं. प्रत्येक जण आयतोबा मुलांना शिस्त तरी कशी लावणार। बाबांना वेळ नाही, आणि मिळाला की, लाड. छे मलाच काहीतरी करायला हवं (फेऱ्या मारते.......) "हमारी माँगे पुरी करो" आपल्या मागण्या पूर्ण करायला लोक संपावर जातात. आपणही आपल्या मागण्या पूर्ण करण्याकरीता संपावर जायचे कां ? (विचार करते) वा. आयडिया। आपण पण संपावर जाणार. घ्या आई संपावर जाते. आयडिया करायला हरकत नाही. (जाते)

## (दुसरा)

(नमिता व किशोर शाळेतून थकून येतात)

किशोर : शाळेची बॅग फेकून खुर्चीवर बसतो. बापरे, जाम दमायला झालयं। (आंत बघत) आई ए आई जरा पाणी आण नां खूप तहान लागली आहे.

नमिता : आणि हो काही तरी खायला पण आण खूप भूक लागली आहे.

किशोर : फ्रीजमधलंच पाणी आण गं। ए आई.

नमिता : (आंत बघत) आणि बरं का आई, ऐकते आहे नां मला पन्नास रुपये हवे आहेत. खरेदीला.

किशोर : आणि बरका ग आई आज संध्याकाळी मी भाजी आणणार नाही. तेंव्हा तूच जा.

नमिता : किशोर, माझ्या मैत्रीणीचा वाढदिवस आहे, तेंव्हा प्लीज एखादे प्रेझेंट आणून दे. बाजारातून

किशोर : वा ग आताच बाजारांत जाणार नाही. म्हणून मी आईला सांगितलं अन् तू प्रेझेंट आण म्हणतेय, शहाणीच आहेस.

नमिता : मग आईलाच सांगू यां कां? नाहीतरी भाजी आणायला जाणारच की ती ! आई बाहेर गेली की एक डिस्को कॅसेटवर डान्स (नाचते)

किशोर : तू नाच मी मात्र मस्त वॉकमन लावून झोपणार.

नमिता : बरका रे किशोर उद्या सर लोकांचा संप आहे म्हणे, म्हणजे शाळेला सुटी, मग काय मज्जाच मज्जा!

किशोर : मग काय तुझ्या त्या 'सुंदर' मैत्रिणी घरी येणार असतील नाचायला व धांगडधिंगा करायला. मजा आहे बुआ.

नमिता : तू मात्र घरी राहू नकोस हं।

किशोर : हुट, मला काय गरज पडली आहे. पण अजून आई पाणी घेवून का येत नाहीये। आई ए आई, आई गं.

(दोघोजण हाका मारतात)

(इतक्यांत 'आई' आई संपावर' अशी पाटी घेवून येते व खुर्चीवर बसते)

नमिता व किशोर:(आश्चर्याने) कोण आई ? आणि हे काय (पाटीकडे बघून) 'आई' संपावर ?

किशोर : (डोक्याला हात मारतो) कमाल आहे. आई, तू खरोखरच्या संपावर आहेस मग कामे कोण करणार ?

नमिता : मला तर आतांच भूक लागली आहे. आई संपावर म्हणजे संपलच की। काही करुन ठेवलं आहेस का गं आई खायला.

आई : (नाही म्हणून मान हलविते)

नमिता : म्हणजे तू अगदी 'बंद', ठेवणार ?

आई : मानेने हो म्हणते.

किशोर : मग आम्हालाच सर्व कामे करावी लागणार की काय ?

(नमिता व किशारे डोके धरुन खाली बसतात.)

किशोर : नमिता, आई संपावर काय म्हणून ग ?

नमिता : अरे तिच्या काही मागण्या असतील. बाबा, उगीच कुणी संपावर जात नाही.

किशोर : मागण्या? म्हणजे आपण आईला फार त्रास देतो कां गं ?

नमिता : असेल बाबा मला तर काही कळेनासेच झालं आहे.

किशोर : सकाळी नं आई असंच काहीतरी म्हणत होती, की, स्वत:ची कामं स्वत: करा सारख आई, आई, एकटी आई काय करणार वगैरे......

आई : (चिडवण्यासारखे काय)

नमिता : किशोर चल ना आपण आईलाच विचारु या तिचा संप आहे पण मौन व्रत तर नाही नां?

किशोर : चल पण ए आधी तू बोल हं. मला नाही सुचणार.

नमिता : ठीक आहे (दबकत दबकत) ए आई, आई गं (हलवून) तू संपावर काय म्हणून, म्हणजे घरांत तू काहींच करणार नाहीस कां ? आम्ही तुला त्रास देतो कां सांग ना ?

किशोर : तुझ्या काही मागण्या आहेत का ग आई.

नमिता : किशोर आई अजून बोलत पण नाहीये. मला खूप भूक लागली आहे. बघते स्वयंपाक घरांत काही करुन ठेवलं आहे का आईने? (जाते. किशोर फेऱ्या मारतो. नमिता नाराज होवून येते)

नमिता : किशोर काही सुध्दा नाही आहे. खायला पोळी ती ही नाही. काय करणार रे. मला तर काही सुध्दा येत नाही. अगदी चहा पण नाही थोडा प्रयत्न केला तर हा चटका बसतो (रडते)

किशोर : नमिता, आपण दोघं मिळून काही तरी करु या.
तसही संध्याकाळची भाजी बाबांचा चहा, दिवा वगैरे करावं लागणार आहेच. चहा बघु या (जातात) (घाबरत घाबरत थोड्या वेळाने येतात)

नमिता : हाय राम गॅस संपला, ए आई निदान सिलेंडर तरी लावून दे ना बाबांना यायला अजून बराच वेळ आहे ए आई गं (रडवेली होते)

किशोर : (आंत डोकावून) नमिता ते बघीतलं का बादली भर कपडे पडले आहेत धुवायचे आणि भांडी पण धुवायची पडली आहेत.

नमिता : (डोकावून) खरंच की रे ! बहुधा कामवाली आली नसावी. गेली

असेल ती पण संपावर

किशोर : आता कसं होणार ग नमिता आई किती कामं करायची होय नां, तू का नाही ग एखादे वेळी चहा करुन बघीतलास, मुलगी आहेस नां ?

नमिता : किशोर उगाच वादात शिरु नकोस हां
आपण पण तसेच आहात म्हटलं आधी आईच्या संपाचं बघा.

किशोर : नमिता आईच म्हणणं तरी ऐकून घेवू या.

नमिता : आई, तू संपावर गेलीस आम्ही काय करायचं ग ? बाबा आले तर काय सांगायचं, बोल नां ?

किशोर : तू बोल तरी काही करु नकोस वाटलं तर..

आई : (उठून पाटी धरुन) हमारी माँगे पूरी करो. नही करेंगे, नही करेंगे, घरका काम नही करेंगे ।

नमिता : ठीक, परंतु यावर उपाय सांग ना ?
तुझे म्हणणे तरी सांग पण हा संप नको ग करु ?

आई : माझ्या काही मागण्या आहेत, पूर्ण कराल? आहे कबूल.

किशोर-नमिता :हो, हो सांगून तर पहा पण आई संप नको, प्लीज, आम्ही मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करु. एकवेळ आभाळ कोसळले तरी चालेल पण तू संपावर जाऊ नकोस.

आई : ऐका तर माझ्या अटी व मागण्या...
अट नं. १ :स्वत:ची कामे स्वत: करायची.
(दोघेही मान हलवितांत हो म्हणायला)
अट नं. २ :बुटाला पॉलीश, मोजे धुणे, प्रेस करणे ही कामे मी करणार नाही.
अट नं. ३ : कामाच्या मध्ये होमवर्क विचारायचे नाही. आई हे कुठे ते कुठे चालणार नाही. सर्व शोधून घ्यायचे.
अट नं. ४ : मी डबा भरुन देईन पण तो टेबलवरुन तुम्ही

बॅगमध्ये भरायचा. किशोर भाजी आणेल, नमिता चहा करायला लागेल. अट नं. ५ : बाबांचा रुमाल व पेन लांबवायचा नाही. आणि डिस्को नाच बंद. टी. व्ही. जास्त नाही.

किशोर : ए आई पुरे झाल्या ना अटी आम्हाला सर्व कबूल आहे.

नमिता : आई, आम्ही तुला सर्व मदत करु. तू म्हणशील तसच वागु. अटी मंजूर. आता तरी संप सोड नां.

आई : मंजूर

दोघेही : मंजूर

किशोर : आई, तू उपोषण वगैरे केले नाहीस ना. नाहीतर, मोसंब्याचा रस आणून देतो. हो पण तो तूच काढून घे.

आई : झालं का सुरु. जाऊ कां संपावर पुन्हा

नमिता : आई, पाया पडतो (वाकून नमस्कार) आम्ही तुझ्या, खरं म्हणजे यापूर्वीच हे करायला पाहिजे होते, आम्ही शेवटी तुला संपावर जावं लागलं.

नमिता : लाज वाटते आम्हाला.

आई : तुम्हाला जाणीव झाली नां की, एकटी आई काय काय करणार. आता स्वावलंबन शिका व शहाणे व्हा.

किशोर : मग आता सिलेंडर लावून झकास पोहे करना संपाची सांगता......

नमिता : आणि फस्ट क्लास चहा.

आई : काय काय, म्हणजे आतापर्यंत पालथ्या घागरीवर पाणीच वाटतं.

दोघेही : छे, छे म्हणजे आम्ही तुला सर्व मदत करतो ना बशा कप आणणे, उचलून ठेवणे.

नमिता : कांदा चिरणे (डोळ्याला हात लावून) खोबरं किसणे. त्या संपापेक्षा हे बरं मग काय आई. चल तर..

दोघेही : आईचा संप संपला (जातात)

# कठपुतली - १

**"प्यारी और प्यारेलाल"**

स्टेजवर प्यारी घागरा ओढणी, ड्रेस करुन खूप नटून थटून मंदीरांत जाण्याच्या तयारीत असते इतक्यात तिचा पती प्यारेलाल ये....

प्यारेलाल : (निरखून पहात) वा: वा: प्यारी, आज तू इतनी सज-धजके कहां जा रही हो, शादी में जा रही क्या ?

प्यारी : नही जी शादी में नही, पर आज मेरा व्रत है । इसलिये मंदीर में पूजा करने जा रही हू ।

प्यारेलाल : कितनी सुंदर लग रही हो, जैसे आकाश से परी उतर आयी हो ।

प्यारी : सुनोजी (थोडी दूर लोटत) ये मिठी बात ठीक नही. और देखे । पूजा होने तक मुझे आपने हाथ भी नही लगाना समझे ?

प्यारेलाल : जल्दी हो जायेगी ना पूजा. प्यारी लगता है तेरा हात हात में लेऊ(प्रयत्न करतो)

प्यारी : अरी, अरी ये क्या है दूर हटो छुना नहीं. मैने व्रत जो रखा है ।

प्यारेलाल : ठीक है, पर कौनसे मंदीरमे जा रही हो ये तो बतावो ।

प्यारी : वो जंगलमें का शंकरजी का मंदीर है ना वहाँ ।

प्यारेलाल : बापरे वो शेरवाला जंगल है उधर ?

प्यारी : क्यों डरा रहे है, मुझे ।

प्यारेलाल : अरी प्यारी सच बताऊ तो उधर चोर डाकू भी आते है, और तू ये सब गहेने पेहेनकर जा रही हो?

प्यारी : तो क्या हो गया? दिनका समय है सब औरते तो जाती ही है नां ?

प्यारेलाल : जाती होंगी, पर चोरोने अगर ये तेरे गहेने लुटे तो ?
शिव - शिव क्या होगा ? तुझे तो बहोत डर लग रहा है।

प्यारी : डरनेकी कोई जरुरत नही जो मै रामू को ले जा रही हुं साथ में। संभाल के जाऊंगी, आप फिकीर मत करना।

प्यारेलाल : फिकीर तो हो ही जाती है ना. तू ऐसा कर ये गहेने मेरे पास दे मै तिजोरी में रख दुंगा।

प्यारी : नही नही मैं सुंदर दिखती हुं ऐसा अभी आपनें बोला था ना जी ?

प्यारेलाल : हां प्यारी जब तो जी धडक रहा है। चोर आयेंगे और खिचकर तेरी ये माला खिचेंगे तो (ऐसी ऐसी नक्कल करतो)

प्यारी : बाप रे बाप सचमुच ऐसा हो सकता है।

प्यारेलाल : तू ऐसा कर प्यारी, तेरे सब गहेने मुझे दे दो मैं अच्छे रखुंगा।

प्यारी : नही कभी नही, तुम बेच डालोगे, तुम्हारा कोई भरोसा

प्यारेलाल : अरी, पगली तो नही हो गई तू। बेच डालना तो तुझे क्यो पेहनाता मैं निश्चीत रुपसे गहेने अच्छे संभालुंगा ना ?

प्यारी : हां ये बात भी सच है। गहेने आपके पास देना ही ठीक है।

प्यारेलाल : ये हुई ना बात? चल जल्दी निकाल देर काम की नहीं।

प्यारी : (दागिने काढून देते) ये लो जी संभालके रखना।

प्यारेलाल : हां हां क्यो नही , फिकीर मत करना और तू अब आराम से मंदीरमें जा. रामु को साथ ले जाना हां मैं तिजोरीमें रख देता हू।

प्यारी : (तिकडे पहात) सुनोजी देखो तो वो कौन आया है।

प्यारेलाल : कौन है रे (शंकेने पहातो) क्या है (माणूस चिठ्ठी आणून देतो) चिठ्ठी है क्या ? लाओ जा तू (चिठ्ठी वाचतो व लपवतो)

प्यारी : किसकी चिठ्ठी है जी।

प्यारेलाल : दुकानकी है। नया माल आनेवाला है ना? उनके बारे में सॅम्पल भेजे है। तुझे नही समझेगा। तू जल्दी जा, रामु ए रामु (दागिन्यांत

चिठ्ठी लपवतो व घाईघाईत आत जातो चिठ्ठी खाली पडते लक्ष रहात नाही जातो)

प्यारी : देखो काम की चिठ्ठी और कैसे गिर पडी दुकान की जो है। देखती हुं। (चिठ्ठी घेते व वाचते)

प्यारी : "मैं हनुमान मंदीर के पास आपको श्याम ५ बजे मिलुंगी जरुर आना". छबेली
ये छबेली कौन होगी? वा रे प्यारेलाल तू तो बडा वो निकला छबेली देखती हूं। छबेलीको और उनका यार प्यारेलाल को भी। (जाते)

## प्रवेश दुसरा

प्यारी पूर्ण अंगभर दुसऱ्या रंगाची ओढणी घेवून हनुमान मंदीर पाठमोरी उभी रहाते छम्मक छल्लो सारखी इतक्यात प्यारेलाल येतो.

प्यारेलाल : छबेली, मुझे देर तो नही हुई, घुंघट तो निकाल (लगट करतो पण ती दाद देत नाही ) घुस्सा आया है। अभी तेरा धुस्सा जाएगा ये देख तेरे लिये क्या लाया हुं। (हातातील दागिने तिला दाखवितो ) अच्छे है ना छबेली तेरा चांदसा मुखडा तो दिखाओ ए छबेली (प्यारी ओढणी फेकते व प्यारेलालचा कान पकडते.)

प्यारी : ये चांद जैसा मुखडा है साक्षात पार्वती का रुप। क्यो जी अच्छा बुद्दु बनाया।
गहेने चोर लुटेंगे तिजोरी में रखेंगे क्या झुट बातें चोर तो तू निकला और लोफर भी। तुझे पोलीसके हवाले करना चाहिए. (मारते)

प्यारेलाल : मर गयो, मर गयो प्यारी तू इधर कहां आयी तेरा मंदीर वगैरे और छबेली.

प्यारी : अजी उनको तो मैने पहेले ही भेजा है मुक्काम पर अब तू भी जा उनके साथ.

प्यारेलाल : (घाबरत) नही नही प्यारी तू ही मेरी प्यारी है मेरे जनमकी साथी वो तो एक हवा थी, माफ करना प्यारी आगे ऐसा नही होगा।

प्यारी : मेरे गहेने दो और सिधे घर चलो।

प्यारेलाल : पुलीस तो नही आयेगी नां? प्यारी

प्यारी : आगे देखेंगे (मारत मारत आत नेते)

(कठपुतली हा लेखिकेचे स्वत:निर्माण केलेला नाविन्यपूर्ण प्रकार आहे ह्यात प्रत्यक्ष मुलगा व मुलगी कठपुतली बनतात संपूर्ण नाटकात सुत्रधार हा नाट्याचे वाचन करतो.)

# कठपुतली - २

पात्रे - जमनादास जमना

जमनादास : अरी ओ जमना, बोलती क्यों नही, क्या होगया ? तू बोलोगी नही तो मैं क्या समझू ? (घुगट दूर करतो) अरे तू तो रो रही ! सांस की दाट पडी क्या ?

जमना : नही जी वो क्यो डाटेगी ?

जमनादास : फिर सरदर्द हो रहा ?

जमना : सरदर्द क्यों हो गा ?

जमनादास : तो क्या हुवा बताती नही क्या बात है जमना।

जमना : हो जी मुझे रोना आ रहा

जमनादास : कुछ बताओगी भी । मैं मदत करू।

जमना : आप क्या करेंगे, डिब्बे मे मैंने लड्डू रखे थे वे गायब हो गए।

जमनादास : है भागवान । ये कैसा हुआ।

जमना : अब सासुंमा मुझे डाटेगी।

जमनादास : अरी बडो ने खाये होंगे ।

जमना : नही जी डिब्बा उपर रखा था ।

जमनादास : गये कामसे तो कौन चोर आगया समझमे नही आता।

जमना : वोही तो अब मै क्या करू ? (रडते)

जमनादास : जमना तू ऐसा कर, दुसरे लड्डू बना कर डिब्बे में भर दे बस बात खतम ।

जमना : वो तो मै करूंगी मगर पहिले लड्डू कहा गए ? मुझे तो रोना आ रहा (रडते)

जमनादास : जमना गए सो गए प्यारी रोना मत मुझे भी रोना आता है ।

जमना : चूप रहो जी मै दुसरे लड्डू बनाके रख दुंगी ।

जमनादास : वा वा जमना ऐसा करोगी तो मै तेरा कभी दास बनुंगा जमनादास

जमना : अब दुसरे लड्डू तो रहेंगे ना ? चोर तो नही आएगा ?
जमनादास : आएगा तो मै उसको पिटुंगा। चिंता मत कर और देख लड्डू करने के बाद तू गावमें मौसी के वहा जाना। मन जरा हल्का हो जाएगा।
जमना : कितना ख्याल करते आप मेरा । ठिक लड्डू बनाती हूँ।
जमनादास : ये हुआी ना बात । जा जल्दी जा ।
(जमना जाते पुन्हा थोड्या वेळाने येते)
जमना : देखोजी डिब्बा भरके रखा है ओर मै जा रही मौसी के यहा।
जमनादास : मा कहा है ?
जमना : मा गयी मंदीरमें, बच्चे स्कूल में, दरवाजा अच्छा बंद करना जी नही तो चौर फिर आयेगा ।
जमनादास : ऐसी अशुभ बात मत निकालना तू । बिनफिकीर चली जा
(जमना लपत लपत बाजूला जाते )
जमनादास : (दरवाजा बंद करतो) वा रे जमनादास अब तो तेराही राज है। भगवान देता है तो छप्पर फाडके देता है। चलो लड्डू खाने। (डबा काढतो खाऊ लागतो)
जमनादास : वा वा ! कितने मीठे ।
जमना : (काठी घेऊन येते ) पकडो, पकडो चोर आया चोर आया लो आप है चोर ।
जमनादास : अरी जमना मारो मत मै हूँ जमनादास तेरा पति।
जमना : मै पहलेही जानती थी जब तो ये नाटक रचाया, पहला चोर भी आप थे ।
जमनादास : प्यारी बस कर, किसी को मत बताना फिर नही होगा ऐसा ।
जमना : सॉरी बोलो ।
जमनादास : सॉरी जमना !
जमना : उठो बैठो कान पकडकर ।
जमनादास : बस करो अब जमना .
जमना : अब तो तुम सचमुच जमनादास बन गए ।

■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■ ■

# माझा मटका

( कृष्ण , गोपी )

(स्टेजवर गोपी ड्रेसमध्ये डोक्यावर दह्याचा मटका घेवून येते.)

गोपी : (स्वगत) आज किती उशीर झाला आहे ना, बाजारात जायला. आता माझ्या मटक्यातील दही विकल्या जाईल कां ? नाहीतर सासु रागावेल पण निघायलाच पाहिजे.

कृष्ण : अग, बसंती कुठे निघालीस बाजारांत वाटतं ?

गोपी : हो रे कान्हा ए पण तू दगड वगैरे मारुन माझा मटका फोडू नको बर कां.

कृष्ण : मी कशाला फोडु ? पण तुला माहित आहे कां ? अग गावांत एक बैल मोकाट सुटला आहे. सर्व लोक पळत आहेत. बाहेर जाण्याची कुणाची हिंम्मत नाही.

गोपी : हो का रे, कान्हा मग माझे हे दही ? सासू रागावेल रे मला.

कृष्ण : बघ बुवा, मी तुला सांगितलं, आता तू तुझं बघ.

गोपी : कृष्णा तू खोटं खोटं तर सांगत नाहीस नां. तुला दही हवं असेल तर मी तसंच देते पण माझी खोडी करु नकोस.

कृष्ण : खोटं तर खोटं बैलाने धडक दिली की समजेल. हे बघ तू यशोदा मय्याला विचारुन ये हवं तर तिनेच मला सर्वांना सावध करायला पाठविलं आहे इकडे.

गोपी : ठीक आहे, मला तुझा भरवसाच नाही मी आपली भय्याला विचारुन येते. पण तोपर्यंत तू माझा मटका सांभाळशील का रे ? नाहीतर जाता जाता तो बैल अंगावर येईल माझ्या, सांभाळशील ना.?

कृष्ण : हो हो तू मुळीच काळजी करु नकोस पण लवकर ये हं. मला सर्व ठिकाणी जायचे आहे (लबाडीचे भाव)

गोपी : हे बघ अश्शी जाते आणि अश्शी येते. कान्हा बघ हं मटका नीट. (जाते)

कृष्ण : (इकडे तिकडे पहांत दही खातो व उरलेले दही व मटका घेवून पळून जातो)

कृष्ण : आता आज मित्रांना दही खाण्याची मज्जा झाली की नाही (जातो)

गोपी : (धापा टाकत) कृष्णा, कृष्णा अगबाई, कोठे गेला कान्हा, मला चांगलच फसवलं. मी दही दिलं असंत त्याला पण चोरी करुन खाण्यातच त्याला मजा येते. आता सासू रागावेल. यशोदेला. सांगते. मग कसा मार मिळेल बघ म्हणावं, कान्हा ए कान्हा माझा मटका माझा मटका.

# आम्ही पुस्तके शिकवतो, आयुष्य नाही

(पात्रे:- सरला, मेघा, उर्मीला, सुलभा, प्राजक्ता)

स्टेजवर सरलाबाई हेडमिस्ट्रेस खुर्चीवर विचार करीत बसली आहे. समोर पेपर पडला आहे. पेपर हातात घेते व लेख वाचते.

सरला : खरचं राम शेवाळकरांनी किती बरोबर सांगितले आहे आम्ही पुस्तक शिकवितो. आयुष्य नाही. शिक्षिका म्हणून मला तर हे विचार खूपच पटतात. काय केलं आपण ?
(इतक्यांत त्यांची मुलगी मेघा येते)

मेघा : काय आई ? कासला विचार करते आहेस. हं हं उद्या तू रिटायर्ड होणार हेडमिस्ट्रेस म्हणून बहुधा भाषणाचा विचार करीत असशील होय नां ?

सरला : छे ग भाषण तर ठरविकच रहाणार! विचार सतावलोय तो हा की, आपण शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना आजपर्यंत पुस्तक शिकविली पण त्यांचे आयुष्य जगवायला शिकविणे यात कुठेतरी कमी पडलो आपण.

मेघा : आता कशाला हा विचार करते आहेस. तुझे विद्यार्थी सुध्दा मोठमोठे हुद्यावर आहेतच की, अगदी आमदार सुध्दा.

सरला : ते जरी असलं तरी हल्ली शिक्षण क्षेत्रांत आलेली मलीनता अप्रामाणिकपणा. नैतिक मूल्यांची घसरणं पाहिली ना म्हणजे भविष्याची काळजी वाटते. या परिस्थितीत लायक मुले कशी तरतील ? गरीब विद्यार्थी कसे चमकतील ?

मेघा : हे मात्र खरे हं आई आता माझेच बघ नां तू आणि बाबांनी एवढ्या हौसेने व कष्टाने मला एम. एड्. पर्यंत शिकविले. पण

कुठे नोकरी मिळतेय कां ? जिथे तिथे वशिला, डोनेशन. इंटरव्ह्युला फेऱ्या आणि नकाराची फळं!

सरला : वाईट तर याचेच वाटतय नं ? आपलं काही चुकतयं की तुमची करीअरची इमारत अशी डगमगते कां आहे ? कां आम्ही पाया पक्का करण्यात चूक केली ?

मेघा : आई स्पेशली तू तरी ही चूक केली नाहीस अग पाया कितीतरी मजबुत केला तरी वरच्या इमारतीचे साहित्य सुध्दा त्याच दर्जाचे व धर्तीचे हवे नां ? नाहीतर ती कोसळतेच संपूर्ण.

सरला : खरं आहे नाहीतर आमच्या शाळेतून बारावी झालेला मुलगा आज बेकारीचे दु:ख भोगत बसला नसता. बघ ना तो देशमुखांना नितीन काळेची कल्पना, शिंदेची पूजा किती भटकत आहेत करिअर साठी आणि नोकरीसाठी मनात कसा गोंधळ झाला आहे. (इतक्यांत उषा येते)

उषा : नमस्ते मॅडम मी उषा पानसे आता उषा देशमुख आपली विद्यार्थीनी. उद्या रिटायर्डमेंटचा सत्कार नां ? माजी विद्यार्थीनींना पत्रिका पाठविल्या. मला पण आली म्हणून अगदी आवर्जून आले. खूप आनंद वाटला.

सरला : अगंबाई उषा, काय करतेस सध्या, पुढे शिकलीस की नाही ?

उषा : शिकले तर मॅडम M. A. झाले मराठीत.

सरला : मग नोकरी वगैरे की पुढे शिकणार ?

उषा : छे हो मॅडम किती शिकले तरी नोकरीची काही गॅरंटी थोडाच आहे. म्हणून सध्याची टीचरची नोकरी मीच मॅनेज केली.

सरला : म्हणजे नेमकं काय केलेस गं ?

उषा : म्हणजे सासरी पैसा गडगंज, सासऱ्यांच्या ओळखी खूप मग काय जमून गेलं बाकी पुढचं पुढे. तुमच्यापसून काय लपवायचं ?

सरला : खूपच लकी आहेस गं! आता सर्वत्र तेच आहे नित्य मरे त्याला

कोण रडे.

उषा : मॅडम, मेघा कुठे आहे बरेच दिवस झाले तिला भेटून तेंव्हा अगदी लाहन होती पण हुशार हं.

सरला : त्या हुशारीचेच दिवे लावते ती. जा ना आंत भेटून ये तिला.

उषा : ठीक आहे. मॅडम उद्या भेटूच आपण.

सरला : उद्याच्या कार्यक्रमाचे खरच अगदी टेंशनच आले आहे. इतकी वर्षे शाळा चालवितांना आलेली संकटे, निंदा टीका! पण ही संकटे आपण बोलाविलेली नव्हती. तसेच उद्याचा सन्मान सुध्दा बोलाविलेला नाही. आपल्या सद्सद् विवेक बुध्दीने आपण सर्व आजपर्यंत केले तेच आपल्या हाती होते. (फेऱ्या मारते) (इतक्यात उर्मीला आणि सुषमा येतात.) माजी विद्यार्थीनी.

उर्मीला, सुषमा:- नमस्ते मॅडम उद्याच्या कार्यक्रमाला आम्ही आलो आहोत खरच खूप अभिमान वाटतो आम्हाला तुमचा.

सरला : अग तू ? आणि तू पण ?

उर्मीला : हं मी उर्मीला शिंदे आपली माजी विद्यार्थीनी. हल्ली एक बालक मंदीर चालवते.

सरला : कुठे घेतलेल ग ट्रेनिंग बरीच चंट दिसतेस ?

उर्मीला : कसल ट्रेनिंग अन् कसलं काय? ते सगळ करतां करतां नाकी नऊ आले शेवटी डोनेशन दिले ह्यांनी आणि लावून घेतलं झालं.

सुषमा : मी सुषमा केळकर शिक्षिका आहे.

सरला : म्हणजे हायस्कूलमध्ये ? B. Ed. वगैरे कुठून केलं ?

सुषमा : मॅडम लाजवू नका. मी तुमच्याशी खोटं काय बोलणार ? पण बरंच मॅनेज केलं. सरळ मार्गाने जाता जाता थकून गेले. तुम्हाला सांगायची लाज वाटते पण मॅडम, मॅडम (रडवेली होते)

सरला : अग अशी रडतेस काय. तू मन मोकळं केलस ठिक आहे. पण आता हाती घेतलेलं काम मात्र प्रामाणिकपणे व मन लावून

करा. बरं का.

उर्मीला : आपले संस्कार आहेत मॅडम. संधी मिळाली की, ते संस्कार आपोआपच काम करतात.

सुषमा : मॅडम आपण दिलेली शिदोरी आम्हाला जन्मभर पुरेल एवढी आहे. आपले आभार कसे मानावे तेच कळत नाही.

उर्मीला : खरच मॅडम, वादळात जरी आम्ही भरकटलो तरी निवाऱ्याला आल्यावर आपलीच आठवण येते.

सरला : माझा आशिर्वाद आहे तुम्हाला.

उर्मीला व सुषमा : (वाकून नमस्कार करतात) येतो मॅडम आम्ही यशस्वी कारकीर्द केल्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन (जातात)

सरला : माझ्या मेघासारखे कितीतरी विद्यार्थी बाहेरच्या परिस्थीत होरपळून निघाले असतील. अती हुशार ते हुशारीवर पुढे येतात. इकडून तिकडून टेकू देणारेही थोडे सरकतात पण या दोहोतून सुटणारे बिचारे काय करणार ?

(इतक्यात हातात एक फ्लॉवरपॉट व गुच्छा घेऊन उषा येते)

उषा : नमस्ते मॅडम (हातात फ्लॉवरपॉट देते)

सरला : अग तू, तू त्या करंदीकरांची उषा ना ?

उषा : म्हणजे तुम्ही मला इतक्या वर्षानंतर ओळखले म्हणायचे.

सरला : तुला कोण विसरु शकतो बरं. एक नंबरची हुशार, गुणी कलाकार तू. सगळ्या संधीमध्ये पहिली, अभ्यासांत पण तेच

उषा : मॅडम तुम्ही माझी परीक्षा केली पण समाजाने मात्र माझ्या हुशारीची कलेची कदर केली नाही. उपेक्षा आणि उपेक्षा बेताची परीस्थिती आर्थिक भार लावयचा पण कसा ? कुठे ? आशेचा किरण सापडला नाही.

सरला : म्हणजे तू नोकरी वगैरे केली नाहीस किंया एखादे प्रशिक्षण ?

उषा : छे मॅडम जिथे तिथे परिस्थिती जातीयवाद मध्ये आला खूप

निराश झाले होते.

सरला : अग पण आता तर तू बरीच सावरलेली दिसतेस?

उषा : शेवटी ठरवलं मॅडम की स्वतःच आपला रोजगार करायचा काही करुन मला अवगत होण्याचा

सरला : हो ना पेंटींग, ड्रॉईंग, रांगोळ्या किती बक्षीसे मिळविली होतीस तू.

उषा : बस तेच उपयोगी पडलं. सात-आठ जणी आम्ही एकत्र आलो तुटपुंज्या भांडवलावर ग्रिटींग्ज, रांगोळ्यांची पुस्तके तयार करणे, विकणे, मेहंदी काढून देणे, ही कामे केली. स्वयंरोजगार समितीकडून नंतर कर्ज घेतलं व आता तुमच्या आशिर्वादाने एक छोटे घरीच दुकान बनविले.

सरला : शाब्बास! उषा तुझ्याकडे पाहून मला खूपच आनंद होत आहे. शिक्षणाचा खरा हाच उपयोग आहे. चार डिग्री मिळवून इकडे-तिकडे भटकंती करा व नको त्या मार्गाने जा यापेक्षा आहे त्यात तू तुझे आयुष्य सुरु केलेस. कमाल आहे.

उषा : मॅडम हे फ्लॉवरपॉट व फुले माझ्याच दुकानची आहेत. आता स्वतंत्र जागा घेतली आहे व घरपोच मालाची व्यवस्था केली आहे. मॅडम मला आठवतय नववीत होते मी. "कचऱ्यातून कला" ही स्पर्धा होती. त्यात मला पहिल्या नंबरचे बक्षीस आपण दिले होते. मुली किती हासल्या होत्या पण मॅडम माझे भविष्य जणु तुम्ही तेंव्हाच घडविले होते. तुमचे उपकार मी विसरणार नाही.

सरला : उषा तुझ्यासारख्या, आहे त्या परीस्थितीत जिद्द धरुन पुढे जाणाऱ्या मुली खरचं मला खूप आवडतात. माझी मुलगी मेघा तिला जरा काही सांग नां. ती पण खूप निराश झाली आहे.

उषा : मेघा कुठे आहे मॅडम मला तिला भेटायचे आहे.

सरला : मेघा ए मेघा.

मेघा : काय गं आई आणि या कोण ?

सरला : तेच तर बोलायला तुला हाक मारली तू या उषाशी जरा गप्पा-

गोष्टी कर. मग एक नवीन विचार तुला मिळेल बघ तुम्ही आता ओळख करुन घ्या आणि गप्पा करा. मी तुमच्या करता चहा-फराळाचे आणते.

उषा : मी मदतीला येते ना मॅडम.

सरला : नको ग मी करेन . आज मी खूप आनंदी आहे. नुसती पुस्तके मी शिकविली नाही तर आयुष्य कसे जगावे हे ही माझ्या हातून घडले याचा मला आनंद आहे आणि तो मी तुझ्यातून अनुभवत आहे.

सुधा : आपले आशिर्वाद व शैक्षणिक संस्कार माझ्या कामात आले हे मी माझे सुदैव समजते. तुम्ही एक गोष्ट नेहमी सांगत होतात मॅडम आठवतं......

सरला : आठवत की, सगळं आठवतयं पण त्याचे पुरावेच कोठे मिळत नव्हते. माझे विद्यार्थी असेही घडले हा आनंद मला आज तू दिलास आता उद्याच्या समारंभात नक्कीच मी आनंद घेणार. मेघा ए मेघा बर का गं उषा तुला एक विद्यार्थ्यांना मी आज देणार आहे ती म्हणजे माझी मुलगी मेघा. सुंदर ड्राईंग काढते, रांगोळ्या, पेंटींग सर्व काही हिचा काही उपयोग तुला होईल बघ.

मेघा : म्हणजे आई तू मला एक नवीन दिशाच दिली म्हणायची. स्वयंरोजगार किंवा स्वतः कला गुणांनी विकसित झालेला प्रोजेक्ट मला केंव्हाही आवडेल.

उषा : ठीक! मॅडम मेघाला मी नक्की घेईन. थोडे तरी उतरायी होण्याचे समाधान मला मिळेल. काय मेघा बरोबर आहे नां ?

मेघा : बरोबर आता दशिले. खोटेपण सर्व बंद व स्वच्छ झऱ्यांचे पाणी, काय आई ?

सरला : तू खूष आहेस नां ? अग चंदराची शिकार करायची तर आधी तयारी वाघाच्या शिकारीची हवी. ती तू केली आहेसच आता ही शिकार तुला जमणारच. शेवटी शिकार आहे ती.

# शिवबाच अमुचा राजा

(दिवाळीचा किल्ला बनविण्याचे साहित्य)
स्टेजवर बालशिवाजी त्या साहित्याची जोडणी करीत आहेत.

जिजाबाई : काय चालले आहे शिवबा, काही वेगळ्याच उद्योगात आज दिसता आहात.

शिवाजी : प्रणाम, माँ साहेब दिवाळी जवळ आली आहे तेंव्हा किल्ला करायचा विचार आहे. मां साहेब किल्ले, गड म्हणजे महाराष्ट्राची केवढी संपत्ती आहे होय ना ?

जिजाबाई : शिवबा नुसती संपत्तीच नव्हे तर सुरक्षा सुध्दा शत्रुला नामशेष करायचे म्हणजे किल्ले रक्षकच आहेत.

शिवाजी : माँ साहेब आपण आम्हाला स्वराज्याचे स्वतंत्रतेचे जे बाळकडू दिले आहे व जी शिकवण दिली आहे त्यामुळे अमुची मने आता कामगिरी करण्याकरीता तैयार झाली आहे.
(दादोजी कोंडदेव येतात)

जिजाबाई : या पंत आज बाळराजे काही वेगळ्याच भूमिकेत दिसत आहेत.

पंत : काय शिवबा मॉ साहेब काय म्हणतायेत

शिवबा : पण गुरुजी, मां साहेबांनी दिलेले घरातील शिक्षण व आपण दिलेली लढाई, न्याय, लोकसंग्रह यामुळे खरच आम्ही आता लढाया जिंकायला सुरवात करावी असे सारखे मनांत येते.

पंत : मग लागा तयारीला. मांसाहेब बाळ राजांना काल आम्ही शेतावर नांगर चालवायला नेले होते. सर्व लोकामध्ये व शेतकऱ्यांमध्ये राजे अगदी रमून गेले.

जिजाबाई : पंत, मुलाचे पाय पाळण्यांत दिसतांत हे बघा शिवबा, छोटे

किल्ले बांधायच्या तयारीत आहेत हे सामान बघा ना.

पंत : खरोखरीचा मांसाहेब शिवबा लवकरच गोब्राह्मणांचा प्रतिपालक व परकीय सत्ता झुगारुन स्वतंत्रतेचा झेंडा फडकवणार असे दिसते. किल्ले सर करणार.

शिवाजी : पंत आपण व मांसाहेबांनी आम्हाला शिक्षण देवून ऐवढे तयार केले आहे की, आता आमच्या शरीरातील कण अन् कण स्वातंत्र्यासाठी उत्तेजित होतो आहे प्रजेवर होणारे मुसलमानांचे अत्याचार, आईबहिणीची अब्रु, अन्याय, प्रजेचे हाल आता नाही पहायत आम्हाला. (तलवारी काढतो)

जिजाबाई : शिवबा, जरा धीराने घे. योग्य वेळी पाऊल उचलणे हे महत्त्वाचे आहे.

पंत : बाळराजे महाराष्ट्रातील सर्वच प्रजा आता आदर्श राजांची वाटच पहात आहे. लवकरच कामाला सुरवात करु.

जिजाबाई : पंत, शिवबाची सायंकाळच्या प्रार्थनेची वेळ झाली आहे. त्यांना आंत घेवून जा.

शिवाजी : मांसाहेब आमचे किल्ल्याचे हे सर्व सामान महादु बरोबर मोठ्या परिसरांत ठेवायला सांगा. उद्या सर्व सवंगडी किल्ला तयार करणार.

जिजाबाई : ठीक आहे. जा आता प्रार्थनेला (पंत शिवाजी जातात)
आई भवानी, तुझी कृपा शिवबावर अशीच असु दे जे स्वप्न मी स्वातंत्र्यांचे बघीतले आहे ते शिवबाच्या हातून पूर्ण करायचे सामर्थ्य शिवबाला दे. (जाते)
(मावळे व शिवाजी येतात)

मावळा १ : वा शिवबा काय किल्ला केला आहे आपण अगदी खरोखरीचाच वाटतो बघ.

मावळा २ : किल्ला तयार करतांना असे वाटत होते की, एकेक किल्ला

म्हणजे खरोखरीचा. प्रत्यक्ष मिळाला तर काय मज्जा येईल. हो अश्शी लढाई करुन एकेक किल्ला शत्रुंकडून मिळवायचा होय शिवबा.

मावळा नं ३ :होना, अरे किल्ल्याचे बुरुज प्रथम पक्केच होत नव्हते पण शिवबाने ते अकलेने मजबूत केले सर वगैरे पण भक्कम केले.

मावळा नं. ४ :आणि किल्ल्यावर झेंडा लावायला शिवबा विसरला नाही. शिवबा, असं वाटतं की तू खरोखरीच अमुचा राजा व्हावा. तुझ्यात जे शौर्य आणि कर्तृत्त्व आहे त्याची स्तुती करावी तेवढीच कमीच. आपण आमचे राजे झालात मग ?

मावळा नं. १ :हो ना आपण आमचे राजे झालात मग ? मग बघा आम्ही कसे आमचे प्राण पणाला लावून जिंकतो की नाही खरोखरीचे किल्ले. शत्रुंचा नायनाट करुन खरा खरा झेंडा लावायचा काय ?

मावळा नं. २ :तलवार, भाले तर आम्ही शिकलोच आहोत मग शिवबा आता प्रत्यक्ष लढाई केंव्हा करायची ? तू राजा होवून आम्हाला आज्ञा कर अस्सेच्या अस्से निघतो आम्ही लढाईला.

मावळा नं. ३ :ते काही नाही शिवबा आता विचार काय करतोस आम्ही आहोना तुझ्या पाठीशी लोकांचे हाल, धर्माची विटंबना आता नाही पहावत. राजा बोल केंव्हा करायची सुरवात.

मावळा नं. ४ :तू फक्त आज्ञा कर आम्ही हे असे धावणार. कापून काढणार शत्रुला स्वराज्याचे निशाण लावणार.

शिवाजी : किती हा उतावीळपणा ? आता एवढे उत्सुक झाला आहात पण प्रत्यक्ष वेळ आली की, पळणार दूर होय नां ?

मावळा नं. १ :हीच का आमची परीक्षा केलीस शिवबा ! तुझ्याबरोबर आम्ही सर्व गावे फिरुन, न्यायनिवाडा, लोकांची दुःखे, जुलमी लोकांना धडे शिकविणे आयाबायांना विश्वात देणे ही कामे केली म्हटलं. तुझी पाठ जराही सोडत नाही. आम्ही. सदा हात जोडून

तयारच.

नं २ : हो ना आणि तलवार, भाला, घोड्यावर बसणे हेही आमचे चालूच आहे. लुटूपुटूले खेळ आता नाही चालायचे शिवबा अजून तुला खात्री नाही वाटतं आमची.?

नं. ३ : परवा मी त्या रान हेल्याला नाही कां लोळविले ? सर्वजण चकीतच झाले आता बोल शिवबा.

नं. ४ : आणि शेतात तू नांगर चालविलास तेंव्हा दुसऱ्या शेतात आम्हीच होतो कामगिरीवर तरी पण तू....

शिवबा : तसे नाही रे मित्रांनो, माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. आपण सर्वांनीच आपल्या देशासाठी महाराष्ट्रासाठी लढायचे आहे. आणि तशी प्रतिज्ञा आज घ्यायची आहे स्वराज्याची प्रतिज्ञा, घेणार ना प्रतिज्ञा ? (सर्वजण हो म्हणतात)

मावळे : (सर्वजण) वा : वा: शिवबा प्रतिज्ञा तर आम्ही घेवू पण 'शिवबाच आमचा राजा' व्हायला पाहिजे. (सर्वजण हो हो शिवबाच अमुचा राजा.)

शिवबा : तुम्ही ठरवाल तसेच होईल प्रथम प्रतिज्ञा घेऊया. या रोहीडेश्वराच्या साक्षीने आपण सर्वजण स्वराज्याची प्रतिज्ञा घेवू या माझ्या मागे सर्वजण म्हणा.

हा सगळा मुलुख आमचा आहे.
इथली माणसं इथली शेते हे आमचे आहे
आम्हाला आमचं रक्षण करता येईल.
मग परकीयाचे पाय का धरावे.?
त्यांची सत्ता आमच्यावर काय म्हणून ?
आमचे राज्य आम्ही राखू वाढवू सांभाळू
त्यासाठी आम्ही प्राण पणाने प्रयत्न करु
हीच आमची प्रतिज्ञा.

(जिजाबाई पंत येतात)

जिजाबाई : इथे आहेत हे सर्वजण किती शोध घेतला आम्ही. सारेजण काय करता आहांत किल्ला मात्र छान बनवला आहे. पण हे काय ?

पंत : काहीतरी विशेष आहे. सर्वजण अगदी तैयार आज सर्वांच्याच अंगात स्वराज्याचे वारे शिरलेले दिसते आहेत.

मावळा नं.१: होय पंत मांसाहेब, आज आम्ही या रोहींडेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ घेतली आहे. आणि ही प्रतिज्ञा आम्ही पूर्ण करणार.

मावळा नं.२ :आणि यापुढे शिवबाच अमुचा राजा होणार? हे ही आम्ही ठरवले आहे.

मावळा ३ व ४ :हो हो शिवबाच आमचा राजा.

जिजाबाई : शिवबा, बालगोपाळांनो आमचा तुम्हाला आशीर्वाद आहे. स्वराज्य करा महाराष्ट्रात मराठ्यांचे राज्य करा.

आज आमचे मन आनंदाने भरुन आले आहे. पंत आपण शिवबा तर घडविलाच परंतु ही सर्व मंडळी सुध्दा तयार आहेत.

पंत : माँ साहेब, स्वराज्याचे आपले स्वप्न खूप लवकरच पूर्ण होणार असे दिसते.

जिजाबाई : शिवबा, बालगोपालांनो आमचा तुम्हाला आशीर्वाद आहे.

(सर्वजण पाया पडतात)

पंत सर्वांना प्रसाद द्या (देवाला नमस्कार करतो.)

# चंद्रभागेच्या तीरावर

(प्रस्तुत नाटकात पांडुरंग रुक्मिणी आपल्या होऊन गेलेल्या भक्तांची आठवण काढीत आहे ही संकल्पना आहे ह्यात एक सुत्रधारही आहे आणि प्रत्येक संताचा त्या प्रसंगाला अनुसरून अभंग आहे त्याची फक्त एकच ओळ दिली आहे प्रत्यक्षात तो पूर्ण म्हणावयाचा आहे.)

चंद्रभागेच्या तीरावर पांडुरंग व रुक्मिणी कमरेवर हात ठेवून उभे आहेत पांडुरंग आपल्याच विचारात मग्न. रुक्मिणी चंद्रभागा पाहून आनंदीत होते.

रुक्मिणी : आहाहा ! काय हा रम्य परिसर. नाथ आज तर मला पुन्हा चंद्रभागेवर आल्याचा अतिशय आनंद होतो आहे. बघा न ते चंद्रभागेचे ओसंडून वाहणारे पाणी त्यातून निर्माण होणारा तो रामकृष्ण हरीचा गजर आज कलीयुगातही आणि विशेषतः २१ व्या शतकात हे दृष्य म्हणजे आपल्याला पर्वणीच नाही का ? (पांडुरंगाकडे पाहून) हे हो काय नाथ. आम्हीच आपले बोलतो आहे आपण बोला ना! नाथ कसली चिंता करित आहात आपण. नेहमी आनंदी असणारे आपले मुखकमल आज मलूल का ?

पांडुरंग : (सावध होऊन व दीर्घ श्वास घेवून) देवी खर सांगु ह्या २१ व्या शतकाला दिखाऊपणाचा शाप आहे बघ जो तो केवळ भोगाच्याच मागे लागला अग आज भक्ती सुध्दा पैशामध्ये मोजली जाते आणि मला तेच नकोय ग. मला तराजुत तोलणारी भक्ती नको. मला हवाय भक्ताचा भाव फक्त भक्तांचा भाव कलीयुगात तोच तर महाग झालाय. देवी आठवतोय मला माझ्या भक्ताचा नामस्मरण गजर (पडद्या आडून रामकृष्ण हरी चा गजर सुरु होतो.) देवी ऐकायला येतोय न तुला.

रुक्मिणी : होय नाथ! ऐकायला येतोय. आणि मन कस आनंदाने उचंबळून

जातय (डोळे मिटून) नाथ नाथ रामकृष्ण हरी. जय जय रामकृष्ण हरी.

पांडुरंग : देवी, आठवतय तुला ह्या गजराने चंद्रभागेचा काठ दुमदूमन जायचा खरच वेडा व्हायचो ग मी भक्तापायी. पण...

रुख्मिणी : नाथ! मला माहीत आहे तुमचं भक्ताचं ते प्रेम. त्याच्या मदतीला धाऊन जाणे, त्याच्याबरोबर त्याच्याच सारखे होऊन काम करणं. त्यांना आपल्या हाताने भरवणे. आणि.....

पांडुरंग : (मध्येच थांबवून) थांब, थांब देवी, काय म्हणालीस भक्तांना भरवणं ? आहाहा ! अमृताची चव अजूनही जीभेवर रुळतेय बघ आणि आठवतोय माझा नाम्या, नाम्या मला फक्त सगुण रुपालच स्विकारणारा नामा. (डोळे बंद करुन आठवणीने व्याकूळ होत) नामा, नामा

**दृष्य बदल**

(लहानपणीचा नामा) हातात नैवेद्याची वाटी आहे.

नामा : (स्वगत :-हट! देवाला म्हणे नैवेद्य दाखव! विठोबा तर जाऊन बसला दगडाच्या मूर्तीत आता कुणाला नैवेद्य दाखवू. आईची आज्ञातर पाळायलाच हवी ना. (विठोबाच्या मूर्तीकडे नैवेद्याची वाटी घेवून जातो) देवा. विठ्ठला तुलाही माझी दया येत नाही का रे ? माझ्यावर रुसला का रे ? मग खा न हा नैवेद्य. बघ तु जर नैवेद्य खाल्ला नाही ना तर आई मला रागवेल रे. खा नं रे. (दोन तीन दा ही विनवणी करतो) (हट्टीपणा करीत) नाही खात ? ठीक आहे नको खाऊ ! आज मी पण येथेच बसून राहीन जोवर तू खाणार नाहीस नां तोवर मी अन्नाचा कणच काय पण पाण्याचा एक थेंब देखील पिणार नाही. (विठ्ठलासमोर नैवेद्याची वाटी ठेवतो व डोळे बंद करुन

बसतो पडद्या आडून नामदेवाचा अभंग.

"तू माझी माऊली मी तो तुझा तान्हा. पाजी प्रेम पान्हा पांडुरंग."

विठ्ठल : (नामाला उठवत) नामा ! उठ! बाळ! अरे देव कधी जेवतोका! पाषाणाची मूर्ती कधी बोलते का ? नामा तुझ्या ह्या निरागस भक्तीने मी अतिशय प्रसन्न झालो बघ.

नामा : खोटे ! विठ्ठला तुम्ही खोटे बोलता. प्रसन्न झालात तर हा नैवेद्य का नाही खात ? वितुमाऊली घे ना ग हा नैवेद्य!

विठ्ठल : (नामाचा हात धरुन त्याला बसवत) नामा चल आपण दोघेही खाऊ ! चल बाळ.

(दोघेही नैवेद्य खातात विठोबा तृप्तीचा ढेकर देतात व पूर्ववत होतात नामा अगदी आनंदाने बेभान होवून, रामकृष्ण हरीचा गजरात नाचतो. ) जातो.

सुत्रधार : नामदेवाच्या बालसदृश मनाला ईश्वराचे अस्तित्व त्याच्या सगुण रुपात तेही विठ्ठल रुपात जाणवते. ईश्वर भक्त ऐक्य संबंधीची कल्पना ही माता आणि अपत्य ह्या नात्यावंर आधारलेली आहे म्हणूनच एखाद्या बालमनाला मातेच्या संदर्भात ज्या प्रतिक्रिया व्यक्त करता येणे शक्य आहे त्या सर्व नामदेवांनी विठाईच्या संदर्भात व्यक्त केल्या आहेत. पण हे काय ? विठाई तुला पुन्हा आठवण आली का ग तुझ्या लेकराची ?

विठ्ठल : नामा ! माझा नामा ! देवी ही सारी माझीच मुल बघ !

रुक्मिणी : नाथ ! तुमची अपत्य आहेत खरं! मग का हो एवढी सत्वपरीक्षा ? घेता. माझ्या ज्ञानदेवाची ?

विठ्ठल : ज्ञाना ! ज्ञानाची ज्योत तेवणारा माझा ज्ञाना. ज्ञानाचा मार्ग सर्वांना खुला करणारा माझा ज्ञाना ! ज्ञानाची भक्ती ह्या सत्वपरीक्षेतून अधिक प्रखर होतेय. (तेवढ्यात ॐ नमोजी आद्या चे सूर वातावरणात पसरतात.) (ज्ञानदेव निवृत्ती सोपान

व मुक्ताईचा प्रवेश)

(निवृत्ती नाथाच्या पायावर ज्ञानदेव आपले मस्तक टेकवतात. निवृत्तीनाथ त्यांच्या डोक्यावर हात ठेवतात.)

सूत्रधार : निवृत्तीनाथांना गहिनीनाथांची आठवण झाली आणि आपल्या जवळील शाल त्यांनी ज्ञानदेवांना दिले व आपल्या स्वानंदाचे वाटेकरी केले सद्‌गुरु व सत्शिष्य असा सुंदर मिलन सोहळा ह्या ठिकाणी घडला आहे. आणि पुन्हा गुरु-श्रेष्ठ ठरले आपल्या शिष्यामुळे "आपुल्यासारिखे करीती तात्काळ" ह्याची प्रचिती आणण्याचा हा क्षण.

निवृत्ती : ज्ञानां ! , उठ ! जे ज्ञान मी तुला दिले त्याने जगाचे कल्याण कर सर्वसामान्य जनांचा उध्दार कर !

सूत्रधार : आणि ह्याच ज्ञानाच्या आधारे ज्ञानदेवांकडून ज्ञानेश्वरी चांगदेव पासष्टी अमृतानुभव ह्यासारखे प्रासादिक ग्रंथनिर्मीती झाली. ह्या चार भावंडामधील ज्ञानदेव व मुक्ताई ह्याचे रेशमी भावबंध मन हेलावून टाकतात. ज्ञानदेवांच्या व्यक्तीमत्त्वाच्या पार्श्वभूमीवर मुक्ताई सूर्याच्या पाकळी प्रमाणे भासते ज्ञानांकाशात क्षणभर कडाडून जाणाऱ्या विजेच्या लोळासारखी भासते. मुक्ताईच्या अध्यात्मिक वाटचालीत यशात ज्ञानदेवाचा वाटा फार मोठा आहे. अध्यात्मिक जीवनाचा आरंभ बिंदू असणारा हा क्षण. ज्ञानदेव झोपडीत आहेत व मुक्ताबाई बाहेर झोपडीचे दार बंद आहे

मुक्ताई : ज्ञानादादा ! कारे रुसलास का ! रागवलास ! अरे दयेचा सागर नां तु ! आनंदाचा महामेरु ना ! मग आज एवढा उदास का ? ज्ञानादादा दार उघड नां ! माझ्याशी बोल नां ! भिक्षा मिळाली नाही म्हणून नाराज झालास का रे.

ज्ञानदेव : मुक्ते ! अग भिक्षा मिळाली नाही म्हणून मी नाराज झालो असेल काय ! लहान पणापासून बघतोय ह्या समाजाने आपल्याला

उपेक्षाच दिली. आज अतिशय उबग आला बघ! मुक्ते मी दार उघडत नाही पण आज मला येथेच देहत्याग करायचा आहे.

मुक्ताई : ज्ञानदादा काय बोलतोस ? (ताटी उघडा ज्ञानेश्वरा)

सुत्रधार : अशा अनेक अलौकीक घटना घडल्यांत ज्ञानदेवाच्या आयुष्यात.

रुक्मिणी : नाथ ! केवढी ही सत्व परीक्षा !

पांडुरंग : पण ह्या सत्वपरीक्षेचा जो आनंदाने प्रसाद म्हणून स्विकारतो ना तोच खरा भक्त बर का देवी ! बघ ना माझ्या मुक्तीने नामदेवांचा अहंकार कसा दूर केला ते.

सूत्रधार : (ज्ञानदेव निवृत्ती सोपान मुक्ताई, सेनान्हावी, सावतामाळी, चोखामेळा, नरहरी सोनार अठरापगड जातीतील संतमंडळी एकत्र लागली आहे सर्वजण नामदेवांच्या भेटीला गेली आहेत व सर्वजण नामदेवांना नमस्कार करीत आहे. विठ्ठल सगुण दर्शनाचा अहंकार नामदेवांना झाला हे त्याच्या कृतीवरुन मुक्ताईने ताडले.

मुक्ताई : गोरोबा काका ! मडके पक्के की कच्चे् कसे ओळखावे हो.

गोरोबा : मुक्ते ! चांगलं भाजल्या गेल ना की मडक पक्क होतं बरं का !

मुक्ताई : आल बरं का गोरोबा काका माझ्या लक्षात ! ज्ञानार्जनाने अहंकार भस्म होतो ना तेंव्हाच भक्तीचं मडकं पक्क होत बर कां गोरोबा काका घ्या बर एक काडी मला सर्वांची मडकी तपासून बघायची आहे.

गोरोबा : पोरी काय करतेस चलं मला तुझा बालहट्ट नाही मोडता येणार (मुक्ताई प्रत्येका जवळ जाऊन डोक्यावर काडी हळुहळु मारते व मडक पक्क आहे असे म्हणते.) नामदेवाजवळ ठेवून

मुक्ताई : नामदेव काका ! मडक कच्च बरं का !

नामदेव : मुक्ते ! मुक्ते चांगलं अंजन घातलसं बघ माझ्या डोळ्यात ! माझा अहंकार उतरविलास (पांडुरंगाकडे जातात पाय धरतात)

विठ्ठला मला माफ कर. मला मार्ग दाखव (अखंड जयाला देवाचा शेजार होणार) हे भजन.

विठ्ठला : नामा उठ ! विसोबा खेचराकडे जावून गुरु मंत्र घे

(सर्वजण रामकृष्ण हरीचा गजर करीत जातात)

सूत्रधार : संत परंपरेचे हे वैभव महाराष्ट्राने उपभोगले ज्ञानदेव, निवृत्ती, सोपन, मुक्ताई हे चार भावंडे, संत नामदेव महाराज, गोरा कुंभार, सावतामाळी, कान्होपात्रा, जनाबाई आणि कितीतरी संत ह्या महाराष्ट्र भूमीने आम्हाला दिली. ज्ञानाचा एका आणि नामाचा तुका ही पारमार्थिक पातळीवरची वारकऱ्याची धारणा आहे.

रुख्मिणी : नाथ ! आता बरे कुणाच्या आठवणीत गुंतला आहात.

विठ्ठल : देवी ! जो समाजाला सुधारण्याचा प्रयत्न करतो त्याचा लोकांकडून छळ केला जातो. माझा एकनाथ असाच आहे बघ (तेवढ्यात रामकृष्ण हरीचा गजर करीत एकनाथाचा प्रवेश) (रामकृष्ण हरीचा गजर सुरु असतानांच चार ब्राम्हण दाराशी येतात.

एकनाथ : ब्राम्हण देवता या ! आपण जेवायला बसावे ! अहाहा ! आपल्या रुपात आमच्याकडे आज माझे पितरे तृप्त होतील.

दासोपंत : ते ठीक ! पण प्रथम आम्ही स्नानाकरीता नदीवर जातो चला चिंचोपंत (दासोपंत चिचोपंत जातात तेवढ्यात मलंग येतात ते भुकेले आहेत.

एकनाथ : या बाबांनो या ! भुकेले झाले असालं न तुम्ही ! खा माझ्या भायांनो तृप्त व्हा.

(मलंगाचे जेवण सुरु आहे तोच दासोपंत चिंचोपत येतात)

चिंचोपत : बुडाला ! बुडाला अवघा धर्म बुडाला ! आम्ही ह्यापुढे ह्या घरात जेवण करणार नाही. राहु देत तुमची पितरे उपाशी.

एकनाथ : (पाय धरत) नका हो नका असे उपाशी जाऊ नका ! वाटल्यास पुन्हा स्वयंपाक करावयास सांगतो आपणासाठी

दासोपंत : मुळीच नाही! आता तुमची स्वर्गातील पितरेच बोलवा जेवायला.

(एकनाथ विठ्ठलाजवळ येतात पाय धरतात.) तेवढ्यात पितरे येवून जेवतात)

दासोपंत चिंचोपत (नाथाचे पाय धरतात) धन्य धन्य महाराज आम्ही चुकलो आम्हाला माफ करा.

एकनाथ : उठा बाबांनो उठा ! जे जे भेटे भूत ते ते मानीने भगवंत हा दृष्टीकोन ठेवा आज माझ्या विठ्ठलानेच तुमचे डोळे उघडले बरं! चला पंढरीला माहेरी जावू. (माझे माहेर पंढरी आहे भिवरेच्या तिरी

सुत्रधार : नाथांच्या जीवनात असे अनेक प्रसंग आपणास आढळतात नाथांनी प्रेमाचा व भक्तीचा संदेश दिला. (पडद्या आडून आवाज येतो ह्या मेल्या काळतोंड्या पायी माहा धनी बिघडला. घर न्हाई दार न्हाई सारखा इठ्ठल इठ्ठाल टाळ कुटतोया हा आवाज आवलीचा आहे.)

रुख्मिणी : नाथ कोणाचा आवाज म्हणायचा.

विठ्ठल : ही आवली बर कां देवी. माझ्या तुक्याची धर्मपत्नी ! तापट असली ना तरीही माझ्या तुक्यावर फार भक्ती हो तिचा फार जीव. पहायची आहे मजा. (आवलीचा प्रवेश रागात) हातात शिदोरी आहे खाली आपटने बसते.

आवली : बापा बापा ! ह्या मेल्या काळतोंड्यानी माह्या नवऱ्यावर काय जादू केली देव जाणे दिवसभर त्या काळतोंड्या समोर जाऊन इठ्ठल इठ्ठल करतु या . खायची सुद नाही का प्यायची सुद न्हाई नामाने कुठ पोट भरतं का कुणाचं ? अरे बापा काटा रुतला रे ! (विठ्ठलाकडे पहात) अरे मेल्या सुड घेतल्यास न्हाव माझा तुला काय वाटलं ? काटा रुतला म्हणून मी बोलायची सोडील तुला. (तेवढ्यात एक गुराखी येतो.)

गुराखी : आई काय झालं गं ? काटा रुतला होय. दे तुझा पाय इकडे मी देतो काढून तुला ?

आवली : (आवली गुराख्याकडे टक लावून पहात बसते) काळतोंड्या तु ? छे कसं शक्य आहे. तो तर बसला आहे दगडात. काढ बाबा लवकर माझा धनी उपाशी आहे तिकडे त्यास्नी शिदोरी द्यायची आहे. तुकारामाचा प्रवेशः- आवले ! भाकरी आणलीस होय! माझ्या विठाईला दिली तो पण उपाशी असेल गं.

आवली : आव ! भाकर म्या तुमच्या करता आणली त्या विठ्याकरीता न्हाई.

तुकाराम : आवले ! तुझ्या पायातला काटा कुणी काढला गं ! बघ हं गुराखी नाही माझा पांडुरंग आहे तो पांडुरंगा माझ्या आवलीला माफ कर रे !

आवली : अरे इठ्या तु ! मला माफ कर बाबा. हो माझ्या धन्यासंग भाकर खा आधी धनी उपाशी आहे हो माझे.

विठ्ठल : माऊली ! धन्य धन्य ! तुझी तुका बद्दलचे प्रेम पाहून भारावलो ग मी ! चला आज आपण सर्वजण भाकरी खावू सर्वजण भाकरी खातात

तुकाराम : (विठोबाच्या पाया पडतात) विठाई! आता माझे कार्य संपले आता तुझ्या बरोबर यायची मला परवानगी दे.

विठोबा : तुका ! तुका मी वेगळा आहे ! तुझे हे सदेह वैकुंठ गमन अनंत काळपर्यंत जनता लक्षात ठेवील. (आम्ही जातो अमुच्या गावा अमुचा राम राम घ्यावा)

(तुकाराम विठोबा पडला आड जातात आवली थोड्या वेळ सुन्न बसून ती पण निघून जाते. स्टेजवर फक्त विठ्ठल रुक्मीणी.

सुत्र : (निवृत्ती नामदेव सोपान मुक्ताई एकनाथ नामदेव तुकाराम हा घोष पडद्या आडून ऐकायला येतो.)

.......ज्ञानदेव रचिला पाया तुका झालासे कळस ह्या उक्तीनुसार ज्ञानदेवांनी समाज प्रबोधनाचा पाया घातला व त्याचा कळस केला तो तुकोबारांयाची पण आज २१ व्या शतकात पुन्हा धर्माला ग्लानी आली आहे. ज्या वेदांत धर्माची पताका उंच

ठेवण्याचा प्रयत्न आमच्या संतांनी केला त्याची धुरा आता कोणाकडे ?

विठ्ठल : देवी ! खुप काळजी वाटते मला ह्या माझ्या भूमीची. आज पहा धर्माच्या नावाने होणारा हिंसाचार वाढता अनाचार, बदलणाऱ्या भक्तीचा ओघ. पण आज मला एकच आशेचा किरण दिसतोय. त्याचे कार्य वेदांत धर्माला आलेली ग्लानी दूर करणार कारण भक्ताच्या रुपात मीच पृथ्वीवर अवतरीत होतो. (यदा यदा ही धर्मस्य हा श्लोक पडद्याआडून)
अरे बघता बघता आपण कोठे पोहोचलो.

रुक्मिणी : नाथ हा जनसमुदाय ! कशाकरीता ! आणि व्यासपीठावरील विराजमान संत आपलाच अंश नाही का ?

विठ्ठल : देवी खरय ते! हे तुला व्यासपीठावर दिसत आहेत न ते आहेत स्वामी चिन्मयानंद यांचे परमशिष्य स्वामी पुरुषोत्तमानंद आज यांच्या रुपात मीच अवतरीत झालो आहे धर्माची धुरा ते समर्थपणे पेलत आहेत ज्ञानी, प्रखर, वैराग्य, गुरुभक्ती, शास्त्र ग्रंथावरील श्रध्दा जनकल्याणाची तळमळ हे सर्व पाहून मी अनेकदा भारावून जातो. आज अध्यात्मिक साधनेचा शिखरावर आहेत हे देवी म्हणूनच नतमस्तक होतो. मी माझ्या भक्तासमोर ! तुला सांगतो शंकराचार्य, ज्ञानदेव, स्वामी विवेकानंद, स्वामी चिन्मयानंद, स्वामी पुरुषोत्तमानंद यासारखे परमभक्त ह्या देशाला लाभले. ह्यातील प्रत्येक जण श्रेष्ठपदाला पोहोचले ते गुरुभक्तीमुळे बरं का. परमशिष्य बनून गुरुपदाला पोहोचले देवी माझी चंद्रभागा कधीच आटणार नाही. त्यात नवनवीन प्रवाहांची भर पडणार.
(रामकृष्ण हरि ॐ चा गजर ऐकायला येतो.)
जो भजे हरी को सदा वही परमपद पायेगा.

# म्हणीची आजी

काय ग नले कसली गडबड आहे एवढी ? काय म्हणलीस नवरदेवाचे कपडे बघायला चालल्या आहेत सान्या कमालच आहे बाई. **"कधी पाहीन नवरा अन जीव झाला बावरा"** आमच्या वेळी तर नवऱ्याचा तोंड काय पण नाव सुध्दा आम्हाला माहित नव्हते आणि आता ? अरे, मिलींद अरे संदिप कसा नवऱ्याला त्रास देऊन सोडतात त्या मुली काय म्हणालीस ग नले आमच्या बद्दल काही काही बोलु नकोस वा **"चावडीत मारलं अन् घरी सांगु नका"** बरं पण आज संध्याकाळी बुफेचा बेत काय आहे ग सुनबाई ? काय म्हणालीस दहीवडा, पालक पनीर, पकोडा वा..! वा..! पण काय करणार माझं तोंड ऐवढ आलं आहे ना म्हणतात ना **"आंब्याला आल मोहोर अन् कावळ्याला झाला मुखरोग"** अन् काय ग कसली शोधाशोध चालली आहे काय गडबड आहे एक वस्तु जागेवर सापडत नाही **"अवघा आहे माझ्या घरी माझी कांता नाही बरी"** गृहीणी व्यवस्थित हवी. आणि बरं का ग संध्याकाळी सारं काही व्यवस्थित करा नाही तर गोंधळच गोंधळ **"येडकीच फुल दोडकीला अन् काजळ कुंकू बोडखीला"** । असं कराल आणि हे काय हे सगळ गोड धोड माझ्याकरीता ? मला मेलीला **"आप्पा मटलीस पुऱ्या"** कशाला ? आता वरवर कराल अन् मग या म्हातारीला आपटाल "हट बुद्‌ढे फट बुढ्ढे "…..अगं सुनबाई ! वर काय करते ! नवऱ्याचे डोक दाबतेस ? **"तरुणपणी म्हातारपणी एक झाले "** काही खर नाही ग बाई ! काय ग चिंगे तुला काय झाले रडायला । आई जाऊन किती वर्ष झाले । **"सासू मेली उन्हाळ्यात रड आला पावसाळ्यात"** हे घे माझं बोचकं सांभाळ **"तेलीण गेली स्वर्गी ! माझा दवणा जतन करा!"**

खरचं आम्ही आजीबाईच्या ह्या म्हणीचा दवणा जतन करुन ठेवला आहे त्या स्वर्गात गेल्या तरी.

# गड आला पण सिंह गेला

पात्रे :- शिवाजी, जिजाबाई, तानाजी, सुर्याजी,
शेलार मामा, सरदार १, सरदार २.

स्टेजवर जिजाबाई विचार करीत उभी आहे.
समोर चंद्रा दासी हातात पूजेचे ताट घेवून

जिजाबाई : चंद्रा पूजेचे सर्व तयार आहे नां. मंदिरात जायचे आहे.

चंद्रा : होय बाईसाहेब सर्व तयारी आहे. केंव्हा निघायचं ?

जिजाबाई : चंद्रा आज काही वेगळेच विचार मनात येत आहेत.

चंद्रा : बाईसाहेब महाराजांच्या प्रत्येक कामांत जातीने लक्ष देता, सल्लामसलत करतां तेंव्हा विचार तर येणारचं होय ना ?

जिजाबाई : बरोबर आहे स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. (विचार करते इतक्यांत शिवाजी येतात.)

शिवाजी : प्रणाम मांसाहेब, कोणत्या विचारांत आहात मांसाहेब, आपल्या मनांत काहीतरी घोळते आहे होय नां ?

जिजाबाई : शिवबा, बरोबर ओळखलेत. चंद्रा पूजेचे घेऊन जा. थोड्या वेळाने जाऊ या मंदिरात (चंद्रा जाते)

जिजाबाई : शिवबा, एक गोष्ट सारखी मनात येते आहे आणि त्यामुळे आमचे मन बेचैन आहे.

शिवबा : मांसाहेब, आम्ही असतांना आपणाला बेचैन होण्याची वेळ काय म्हणून ? सांगा. आम्हाला आपला विचार सांगा. आपण सांगाल ते योग्यच असणार.

जिजाबाई : शिवबा, तुम्ही मिर्झाराजे जयसिंगला तहामध्ये २३ किल्ले दिलेत ते अजून मोंगलांकडेच आहेत.

शिवाजी : होय, मांसाहेब तहाच्या अटीच तशा होत्या. द्यावेच लागले ते.

जिजाबाई : ते ठीक आहे परंतु या २३ किल्ल्यातील कोंडाणा किल्ला मोगलांच्या हाती असणे बरे नव्हे राजे, कसे ही करा आणि कोंडाणा किल्ला स्वराज्यात आणा.

शिवाजी : मांसाहेब कोंडाणा किल्ल्याबद्दल विचार आमचेही मनांत बऱ्याच दिवसापासून घर करीत आहेत. आज आपण इच्छा प्रदर्शित केलीत. ठीकच झाले. आता हे काम नक्की होणार. मांसाहेब कोंडाणा घेतलाच म्हणून समजा. (तलवार काढतो)

जिजाबाई : याची आम्हाला पूर्ण खात्री होती, शिवबा म्हणूनच आम्ही आमची इच्छा बोलून दाखविली. लागा आता कामाला. भवानी आई आहेच पाठीशी.

शिवाजी : अवश्य कोंडाणा किल्ला मोगलांकडे म्हणजे स्वराज्याला झालेला जखमच.

जिजाबाई : खरे बोललांत कोंडाणा किल्ला चढायला कठीण आहे. एकदम सरळ. शत्रु सहजरीतीने वर चढणे अशक्य. स्वराज्यांत कोंडाणा आला तर किल्ल्याचे फायदे जरुरच होतील. पण..

शिवाजी : ती काळजी आपण करु नका मांसाहेब कामगिरी मोठी व कठीण तर खरीच पण आपली इच्छा पूर्ण करण्या करीता ती आम्ही अवश्य पार पाडु.

जिजाबाई : तुम्हाला आमचा आशिर्वाद आहे. आई भवानी शक्ती दे माझ्या शिवबाला.

शिवबा : आजच तानाजी मालुसरे याला मनसुबा कळवितो तो मोठा हिंमतवान व ताकदीने भारी आहे. अंगाने धिप्पाड आहे. चलाख आहे. (इतक्यांत तानाजी, शेलारमामा, सुर्याजी, रायबा व दोन सरदार येतात)

शिवाजी : तानाजींची आठवण आम्ही काढली आणि तानाजी हजर.

सर्वजण : महाराज, मांसाहेब प्रणाम

तानाजी : आमची आठवण काढण्याचे कारण तरी काय महाराज.

शिवबा : ते सांगतोच पण आधी सांगा. आज आपण सर्वजण म्हणजे मामा, सुर्याजी वगैरे एकदम येण्याचे कारण?

जिजाबाई : आणि रायबा पण आला आहे. ये बाळ, मोठा गोड पोरगा आहे. तानाजी काय बात आहे.

तानाजी : महाराज, मांसाहेब, एक गोड बातमी घेऊन आलो आहोत आपणाकडे.

शिवाजी : कोणती बातमी म्हणायची सांगा तरी लवकर.

शेलार मामा: महाराज, मांसाहेब, रायबाचे लगीन काढले आहे. पुढच्या आठवड्यांत माघ वद्य षष्ठीला मुहूर्त निघाला आहे. तेंव्हा आमंत्रण द्यायला आलो आहे.

सूर्याजी : सर्वांनी आणि मांसाहेब आपण पण यायचं आहे आपली सर्व व्यवस्था केली आहे. मांडवाची शोभा वाढवावी म्हणतो.

तानाजी : मांसाहेब, महाराज आपल्या उपस्थितीतच कार्य होणार तेंव्हा जरुर यायचे.

जिजाबाई : मी सर्वांचे तोंड गोड करते (जाते)

शिवाजी : तानाजी, लग्न पुढील आठवड्यातच आहे पण आम्ही हजर राहू असे वाटत नाही.

तानाजी : महाराज आपण नाही म्हणजे मांडव हलकाच पडणार की, कायं कांही अडचण आहे कां महाराज?

शेलार मामा: बोला महाराज शक्य असल्यास आमचा काही उपयोग झाला तर पहावे.

सूर्याजी : आपण काहींसे काळजीत दिसतां महाराज. आम्हाला सर्व काही सांगा आपल्याला असे पहातांना आम्हाला बरे वाटत नाही. बोला महाराज.

शिवाजी : तानाजी, शेलार मामा, सुर्याजी आपण रायबाचे लग्न उरकून घ्या. आम्ही कोंडाणा किल्ल्याच्या कामगिरीवर जाणार आहोत. तेंव्हा आमचे लग्नाला येणे अशक्य आहे.

तानाजी : महाराज, तानाजी जिवंत असतांना आपण असल्या जिवावरच्या कामगिरीवर जाणार हे आम्हाला पटत नाही. लाख मेले तरी लाखांचा पोशिंदा मरायला नको.

शिवाजी : अरे तानाजी पण रायबाचे लग्न आहे तेंव्हा तू तिकडे जा आम्ही हे पाहून घेतो.

तानाजी : आधी लग्न कोंडाण्याचे मग रायबाचे. स्वराज्याच्या कामासाठी आम्ही सदैव तयारच रहाणार.

शेलार मामा: महाराज तानाजी म्हणतो ते बरोबरच आहे. नंतर बघु या लग्नाचे.

सूर्याजी : लग्नांत आमचे लक्ष बी लागल का महाराज. छे ती कल्पनाच पटत नाही. आम्ही सर्वजण प्रथम कोंडाण्याच्या कामगिरीवरच जाणार.

शिवाजी : तुम्हा सर्वांचे माझ्यावर असलेले हे प्रेम व विश्वास पाहून मन अगदी भरुन येते. परंतु तरी पण यावेळी स्वारीवर मी मी........

तानाजी : महाराज पुढचे बोलणे बंद. हा निघालो बघा कोंडाणा घ्यायला. स्वराज्यासाठी लढायचे आमचे व्रत आहे. व तशी प्रतिज्ञाही आहे. त्यांत खंड पडणार नाही.

शेलार मामा: तानाजी आम्ही तुझ्या सोबत आहोत .

सूर्याजी : मामा, दादा ही कामगिरी पार पाडायचीच महाराज निश्चिंत रहा.

शिवाजी : तुमच्यासारखे लढवय्ये व शूर, जिद्दी साथीला असल्यावर कोंडाणाच काय स्वराज्य येण्यासाहि वेळ लागणार नाही. जय भवानी.

(सर्वजण जय भवानी हर हर महादेव, शिवाजी महाराज की जय जातात)

## प्रवेश दुसरा

(तानाजी, सूर्याजी, शेलार मामा सरदार स्टेजवर खलबते करतात.)

तानाजी : मंडळी आपण कोंडाण्याची टेहाळणी केलीच आहे. पश्चिमेला उंच कडा आहे.

सूर्याजी : तो कसा चढायचा दादा एकदम सरळ आहे तो.

सरदार : सुभेदार शक्कल काढतील की. त्याच डोक लई तल्लख आहे.

सरदार नं २: सुभेदार सांगा काहीतरी विचार सुचलाच असेल.

तानाजी : सुर्याजी एकदम धीर खचु देऊ नका. तो उंच व सरळ कडा आम्ही तीनशे लोकांसह दोराच्या सहाय्याने वर चढून जाऊ.

सरदार दोघेही :आम्ही बी येऊ आपल्या पाठीमागून हरणार नाही.

तानाजी : सुर्याजी, मामा तुम्ही ५०० मावळे घेऊन वरचा कल्याण दरवाजा गाठा आम्ही वर गेल्यावर तो दरवाजा उघडून देऊ.

शेलार मामा: आणि दरवाजा एकदा उघडला की आम्ही बघा शत्रुला कसे सळो की पळो करुन सोडतो.

सूर्याजी : दादा तुम्ही बेफिकीर रहा व सांभाळून वर चढा तुमची गाठ उदेभानशी आहे. जय भवानी.

तानाजी : आता सर्व ठरले. कोंडाणा आता सर झालाच पाहिजे. आमचा महाराजांना शब्द आहे. आणि हो मामा सूर्याजी किल्ला जिंकला की घर गवताची मोठी गंजी पेटवून द्या म्हणजे महाराजांना विजयाची बातमी कळेल. तसे आम्ही त्यांना सांगितले आहे. चला तर स्वारीवर.

सर्वजण : जय भवानी. (हर हर महादेव, शिवाजी महाराज की जय जातात)

## प्रवेश ३ रा

(शिवाजी व जिजाबाई फेऱ्या मारीत आहेत) किल्ल्याकडे महात आहेत.)

जिजाबाई : शिवबा, कोंडाण्याच्या विजयासाठी आपले मन उतावळे झाले

आहे. सहाजिकच आहे. पण धीर धरा.

शिवाजी : मांसाहेब किल्ला जिंकल्यावर गवताची गंजी वर पेटवून तानाजी व सूर्याजी मला ही बातमी देणार आहेत. म्हणून मी सारखा किल्ल्याकडे बघतो आहे.

जिजाबाई : आई भवानी सर्वांना यश दे.

शिवाजी : मांसाहेब (आनंदाने)
ती बधा ती बघा गवताची गंजी पेटलेली दिसते. कोंडाणा आपण जिंकला. मांसाहेब आपली इच्छा पूर्ण झाली.

जिजाबाई : (किल्ल्याकडे बघून)
होय शिवबा खरेच की ! आई भवानी खरचं तुझा महिमा थोर आहे. शिवबा आम्ही विजयाची तयारी करतो.

शिवाजी : मांसाहेब, आपण तयारी करा आम्ही स्वत: गडावर जाऊन सर्वांना भेटून शाबासकी देतो. (जातात)

**प्रवेश ४ था**

स्टेजवर :शेलार मामा, सूर्याजी व सरदार पागोटे काढून खाली माना घालून उभे आहेत. डोळे पुसत आहेत.

शिवाजी : हे काय पहातोय मी गड जिंकलात मग हे काय? आणि तानाजी दिसत नाही, मामा, सूर्याजी बोला.

शेलारमामा : महाराज ताना गेला हो लढता लढता शहीद झाला व उदेभान पण गेला.

शिवाजी : काय ताना गेला पण हे कसे झाले सूर्याजी.

सूर्याजी : उदेभानशी लढता लढता तानाजीची ढाल तुटली तरीही पागोटे घेऊन लढत होता तानाजीने शिकस्त केली. उदेभानला जेरीस आणले. अखेर दोघेही पडले व सारे संपले महाराज (रडतो)

शिवाजी : अरे अरे काय ऐकतो आहे मी विजयाची माळा तानाजीच्या

गळ्यात घालण्याकरीता हे हात वाट पहात होते. आणि झाले मलतेच मामा माझा तानाजी माझा सिंह गेला हो गड आला पण सिंह गेला.( डोळे पुसतो)

सुर्याजी : आधी लगीन कोंडाण्याचे असे दादाने म्हटले होते. आणि आता तो तो.....

शिवाजी : सुर्याजी, कोंडाण्याचे लग्न तानाजीने लावले रायबाचे लगीन आम्ही लाऊन देवू. वाईट वाटून घेऊ नका. मामा, आजपासून कोंडाणा किल्ल्याला सिंहगड म्हणण्यांत येईल. तानाजी गेला नाही या सिंहगडाच्या रुपाने तो अमर झाला आहे. आम्ही मोठ्या अभिमानाने त्याला अभिवादन करतो चला तिकडेच जाऊ.

# जुन्याचा आला कंटाळा

पात्रे :विशाखा, रश्मी, शोभाताई, विमलताई, शलाका, पिंकी लहान मुली

(विशाखाचे घरे) विशाखाची ऑफीसला जाण्याची तयारी

प्रवेश विमलताई कापूस निवडतात.

विशाखा : आई, तुम्हाला कितीदा सांगितलं की, या ड्राईंग रुममध्ये कापूस निवडलेला आम्हाला चालायला नाही. अहो कोणी पण ऑफीस येतात यांचेकडे, कचरा नको दिसायला.

विमलताई : अग सुनबाई, मी उचलून टाकीत हो कचरा समजतं म्हटलं मला तेवढं !

विशाखा : तर तर म्हणे समजतं! समजून उमजून तुम्ही सर्व काही करतां, आज यांना जायला उशीर झाला. तो केवळ तुमच्यामुळे, नैवेद्य, नैवेद्य करत नकळत आणि स्वयंपाकाला उशीर झाला. मला सुध्दा अर्धा दिवस सुटी काढावी लागली. त्यापायी पिंकीला पण डबा देता आला नाही.

विमलताई : अग तुम्ही इतक करतं मग देवाचा नैवेद्य नको कां ? त्यातून आज शुक्रवार मग तू का नाही आलीस मदतीला ? माझ्याकडून नाही हो होत लवकर लवकर.

विशाखा : तर! पोथी पुराणाला जायला कसं झटपट जाता येतं ! तुम्हाला तुमची ती लुगड्याची बोचकी पेटीत ठेवत चला. देवघर कसं पॉश करुन घेतलं आहे मी पण तेथे पहाव तर हा घाणेरडा पसारा.

विमलाताई : त्यात काय झाल! नाही रहात लक्षात. इथे ठेवू नका तेथे ठेवू नका, येथे बघु नका तेथे बघु नका मोठ्यांदा बोलु नका. पोथी वाचू नका म्हणजे आम्ही रहायचं तरी कसं!

विशाखा : ते तुमचं तुम्ही ठरवा. पण माझ्या या पॉश घरांत मला हे असं जुनं बुरसटलं काही चालायचं नाही.

विमलताई : माणसापेक्षा घरांची किंमत तुम्हाला जास्त वाटते! त्याची मिजास पण आम्हा म्हाताऱ्यांची काही कदर ? विशाखा माझा सुध्दा काही अधिकार आहे. म्हटलं या घरावर ! अशोक माझा मुलगा आहे मी त्याची आई आहे, म्हातारी असले, जुन्या वळणाची असले तरी माणूस आहे.

विशाखा : आई आहे म्हणूनच ऐवढे तरी सहन करते आहे. मोलकरणीशी परवा भांडलांत, तिने काम सोडले. म्हणजे ? परवा त्या पारशी बाईच्या बगिच्यातून फुले आणलित न सांगतां ! ती तक्रार घेउन आली होती. एकेक तास देवपूजा, मला मदत करायची सोडून शेजारी गप्पा करीत बसतां. मला रोज ऑफीसला उशीर होतो. किती सहन करायचं ! कंटाळा येतो. कधी कधी

विमलताई : आमच्या जुन्या माणसाचा आता तुम्हाला कंटाळाच येणार. कारण आमची गरज सरली ना आता! मुलं लहान होती तर पत्र पाठवून बोलवून घेत होती. य वरवर करीत होतीस आणि आता मुलं शाळेत जाऊ लागली म्हातारीची गरज संपली मग कंटाळा येणारच की. पण सांगून ठेवते हे सभेच्या कामावरुन येईपर्यंत हे असेच सहन करावे लागेल तुला समजलं! मोठी आली कंटाळा करणारी .

विशाखा : ते शक्य नाही, माझ्या सहनशक्ती च्या पलिकडे आहे ते. तुम्ही आजच संध्याकाळपर्यंत शांतावन्सकडे निघून जा. येथे थांबाण्याची मुळीच गरज नाही.

विमलताई : अग पण अशोकची भेट तरी नको का घ्यायला ? तो काय म्हणेल. किती झालं तरी मुलगा आहे.

विशाखा : मी सांगेन त्याला ते कालच म्हणत होते की, आईला

शांताताईकडे पाठवून दे म्हणून त्यांना काही वाटायचे नाही.

विमलताई : म्हणजे सरळ-सरळ हाकलणंच झालं म्हणायचे, देवा, कुठ रहायची सोय नाही रे बाबा (रडते)

विशाखा : उगाच सोंग ढोंग पुरे झालीत.

विमल : कळेल-कळेल तुलाही म्हातारपण कसं असतं ते आम्हाला निभवायचं तुम्ही ते सोडलं अन् हाकलताच कस घरुन! अशोक तोही तसला.

विशाखा : आता तुमच्याशी जास्त बोलत बसायला मला वेळ नाही. मी, अशोक ऑफीसमधून येण्याआधी तुम्ही शांता वन्स कडेगेलेल्या हव्या.

विमल : अग पिंकीला तरी भेटून घेतलं असतं.

विशाखा : काही आवश्यकता नाही.

विमल : माझी गरज आता राहिली नाही. म्हणून हे हाल आहेत. बघु या की, संसार आहे हा प्रत्येकाची गरज पडतेच माणसाला, मग उघडतील डोळे.

विशाखा : आता गरज पडली तरी बोलवणार नाही. बघु काय होतय ते! कुणाचं कुणावाचून अडत नाही. म्हटलं.

विमल : ते बघणार आहे. जाईन संध्याकाळी. कशाला ? आताच जाते, तुम्हाला हाकलायची लाज वाटत नाही तर मला जायची तरी लाज कशाला वाटावी. ही निघाले. कामात घेते आणि निघतेच कशी !

विशाखा : जा एकदाच्या हे पैसे घ्या ऑटोला. (विमलबाई आंत जातात इतक्यात रश्मी येते.)

रश्मी : काय विशाखा, आज सुटी वगैरे आहे की काय, तुझी लुना बाहेर दिसली म्हटलं आज बाईसाहेब घरी कशा ?

विशाखा : सुटी कसली या म्हातारी पायी जीव नकोसा झाला आहे बघ.

विचित्र स्वभाव. तुला तर माहितच आहे. अग शुक्रवार नैवेद्य करता करता पिंकीला अशोकला जेवायला मिळाले नाही आणि मला सुध्दा अर्धा दिवस सुटी घ्यावी लागली. काय ही जुनी माणसं.

रश्मी : मी तर माझ्या सासु-सासऱ्यांना दिलं पाठवून दिराकडे. काय ग बाई कटकट मी सुध्दा कंटाळले होते. अगदी आता काय अगदी मोकळं वाटतयं बघ.

विशाखा : अग मी पण म्हातारीला शांता वन्स कडे गावातच रहायला जा म्हणून बजावलं आहे. आमचं सुध्दा खूप वाजलं आता.

रश्मी : हो कां छान! म्हणजे आता तुही मोकळी नाही तर गप्पा करतांना म्हातारी मधे मधे यायची आपण चौघं आणि मुलं मस्त पार्टी करु या गडे.

विशाखा : करूया की आता पिकनिक ऑमलेट, मसाला मुर्गी मजाच मजा ! ( पिंकी आणि शलाका येतात.)

पिंकी : ए मम्मी ग आम्ही बाहुल्या बसवायच्या कां ग ?

शलाका : मम्मी मी पण बसवू कां ग ? आपल्या शेजारच्या कॉलनीतल्या सगळ्या मुली बसवणार आहेत.

रश्मी : काय भंकसपणा आहे या मुलींचा. त्या बाहुल्या काय न ती गाणी काय ? माहेरचा वैद्य न् सासरचा वैद्य. शी !

विशाखा : नाहीतर काय, ती खिरापत म्हणजे तर अगदी मुलुखाचा घोळ ? नॉनसेन्स ह बघ पिंकी ते जुनं जुनं आता सोडा बरं अग तुम्ही कॉन्व्हेंटमध्ये जाता इंग्लीश बोलता बॉबकट करता आणि तुमच्या तोंडात ती बाहुलीची भंकस गाणी शोभतात तरी कां ?

पिंकी : अग मम्मी पण सगळ्याच मुली बसवणार आहेत किती मज्जा येते. गाणी म्हणायला.

शलाका : हो ना रोज हार करायचे, खाऊ करायची किती किती मज्जा नं.

रश्मी : शलाका, तुमचं आम्ही काही ऐकणार नाही. बाकीच्या मुली बसवतील तर बसवू देत पण तुम्ही मात्र त्यातून निघून जा.

पिंकी : हे ग काय मम्मी बसवू दे ना.

शलाका : आंटी तुम्ही हो म्हणाल ना तर मम्मी पण हो म्हणेल. म्हणा ना तुम्ही हो , (इतक्यात शोभा ताई येतात.)

शोभाताई : घरात आज बरीच गडबड दिसतेय .

विशाखा : या शोभाताई आज यावेळी कुठे इकडे आलात ?

शोभा : घर उघडं दिसलं आणि मुख्य म्हणजे गडबड दिसली म्हणून शिरले आत !

रश्मी : गडबड या मुलींची शोभाताई मुलींना समजवाल का हो तुम्ही ? अहो बाहुल्याच बसवणार म्हणतायेत आता तुम्ही सांगा. ते जुनं जुनं सार मोडायला नको कां ?

पिंकी : मॅडम बाहुल्या बसवण्याबद्दल तुम्ही आम्हाला काही सांगणार होतात ना ?

शलाका : खरच मॅडम तुम्ही आम्हाला घरी पण बोलविले मग आताच सांगा ना काय ते.

विशाखा : म्हणजे तुम्ही मॅडमपर्यंत पण पोचलात वाटतं?

शोभा : या माझ्या आवडत्या विद्यार्थीनी आहेत त्या.

रश्मी : म्हणूनच डोक्यावर बसल्या आहेत. तरी पण बाहुल्या वगैरे बसवायला मिळणार नाहीत बर का ग.

शोभा : कशाला त्यांना नाराज करतां ? बसवू देत की.

विशाखा : तुम्ही कशाला उत्तेजन देताय मॅडम. अहो त्या जुन्या चालीरिती कंटाळा आलाय अगदी. जुनी माणसं सुध्दा कधी कधी नको वाटतात. भलतीच डीस्ट हट्टी असतात.

रश्मी : तर काय शोभाताई आताच या विशाखाने सासुला पाठवून दिलं लेकीकडे .

पिंकी : काय आजी गेली आत्याकडे आणि मला न सांगता.

विशाखा : काही नको एवढे वाटायला तुला कधी डबा देत होती का वेळेवर.

पिंकी : तरी पण आजी मला आवडायची हे मम्मी तू कां पाठवलस तिला आता रामायणाच्या गोष्टी कोण सांगणार आम्हाला.

शलाका : माझे आजी आजोबा सुध्दा किती गोष्टी सांगायचे आणि मायाळू पणाने मला तर लाडाने शला शला म्हणायचे मला कळत नाही,वडीलांना हे लोक घालवून का देतात .

रश्मी : चूप रहा शलाका, आम्ही केले ते विचारपूर्वक केले म्हटलं ! शोभाताई या मुली भारी चंट आहेत यांचे काही ऐकू नका.

शोभा : रश्मी, विशाखा विसाव्या शतकातील नवी पिढी हुशार आहे खरी पण त्यांना योग्य मार्गदर्शन हवं. आता हे बाहुल्यांचच बघा नां ? किती मागे लागल्या आहेत.

विशाखा : मग यांना हो म्हणायचे की काय.

रश्मी : छे ! ते नाही जमणार हो. नॉन्सेन्स सगळ

शोभा : हे बघ रश्मी, नवीन प्रकारची गाणी वगैरे देवून हा बाहुल्यांचा सण केला ना तर खरं उत्तम आहे अगदी शारदेसारखा.

विशाखा : खरं सांगु का शोभाताई त्या जुन्यांचा आम्हाला अगदी कंटाळा आला आहे. बघा नकोस वाटतं!

शोभा : ते खरं पण "जुन्याचा आला कंटाळा. तरी नवीन प्रांत पाहिजे धरिला" असे समर्थांनी दासबोधांत त्याकाळी सांगितले आहे. जुन्यांचा कंटाळा करा पण मग नवीन काहीतरी धरा नुसता कंटाळा करुन तिरस्कार करु नका. हाच उद्देश धरुन मी या मुलींना बाहुल्यांचा सण समजावून व नवीन गाणी देणार आहे. बघीतलय

पिंकी : म्हणजे आम्हाला बाहुल्या बसवायला मिळणार तर मॅडम.

शलाका : किती मज्जा पण आजी असती तर किती छान झाले असते.

विशाखा : शोभाताई तुम्ही कराल ते चांगलेच म्हणा.

रश्मी : हो ना आम्हाला नाही हो सुचत कां.

शोभाताई : जुनं टाकयला आमचा विरोध नाही कपडा जुना झाला की फेकतोच ना. आपल्या नवीन पिढीला उत्तेजन देऊन नवीन काहीतरी करा नुसतच जुनं जुनं करीत बसू नका ऐवढेच माझे सांगणे.

विशाखा : बघा बाई करुन हा एक प्रयत्न म्हणायचा.

शोभा : जा ग पिंकी, शलाका बाहुल्या घेऊन या पण ती जुनी जुनी निरर्थक गाणी मात्र नाही हो म्हणायची माझ्याजवळ छांन गाणी आहे ते देईन तुम्हाला.

पिंकी व शलाका : मॅडम किती चांगल्या आहे मम्मी आम्ही बसवणार हं बाहुल्या (चला जाऊ या) (जातात)

शोभाताई : चला मी पण निघते हे बोलायलाच आले होते.

विशाखा : अहो चहा तरी घेवून जा, शोभाताई.

शोभा : नको नको शाळा अजून राहिली आहे. एक पिरेड घ्यायचां बाकी आहे. येईल पुन्हा केंव्हातरी.

रश्मी : चल मी पण निघते विशाखा चला शोभाताई मी सोडते तुम्हाला लुना यरुन बराय विशाखा भेटु पुन्हा आला काय तुमचच राज्य बाय बाय. (जातात)

## दुसरा प्रवेश

विशाखाला धरुन शोभाताई येतात (विशाखाचा पाय मोडलेला)

शोभा : जपून हं विशाखा, पायावर प्रेशर यायला नको.

विशाखा : शोभाताई बर झालं या ॲक्सीडेंटच्या वेळी तुम्ही होता, अहो

मी लुना अगदी डाव्या बाजूने नेत होते पण तो सायकलवाला मधेच कडमडला त्याला वाचवायला गेले तर मी जोराने पडले आणि हे दुखणे करुन बसले आता दोन महिने पाय प्लॅस्टर मध्ये म्हणजे केवढी मुश्कील.

शोभा : हो ना शिवाय घरी आजी पण नाही अशावेळी तरी आठवण येते हो त्यांची.

विशाखा : येते खरी पण मी नाही बोलवणार त्यांना. त्या काय समजतात स्वत:ला.

शोभा : अग पण विशाखा तुला तर उठायचे पण नाही मग हे सगळं सांभाळणार कोण ?

विशाखा : ठेवीन दहा नोकर चांगला पगार आहे आमचा दोघांचा (रश्मी येते)

रश्मी : विशाखा, काय ग बाई तुझ्यावर संकट मला आताच कळलं ऑफीसमध्ये तशीच आले निघून. बघू या अगबाई किती ग बॅंडेज आहे. हे किती दिवस ......आहे गं.

विशाखा : दोन महीने सांगितले आहे. डॉक्टरांनी.

रश्मी : बाई ग, आता कस गं होणार नेमक. सासुबाईंना पण घालवून दिलसं.

शोभा : घेऊन येऊ का मी त्यांना ? पत्ता दे.

विशाखा : मुळीच नको, मी पण एवढी स्वाभिमानी आहे म्हटलं.

रश्मी : अग ते खरं ग पण मग घरांत बघणार कोण अशोकची दौऱ्याची ड्युटी.

विशाखा : शिवा गडी आहे की, शिवाय आणखी लावीन दोन-तीन मोलकरणी, पंडीत मला काय कमी आहे.

रश्मी : अग मी सांगयची विसरुन गेले शिवा गडी उद्यापासून येणार नाही म्हणून सांगून गेलाय मला तो. देशावर जातोय म्हणे

मुलांना भेटायला.

विशाखा : यालाही भेटायला आताच सुचले हे धंदे. पंडीत तर कालच पळाला. त्याचा पगार कापला म्हणून आता कसे होणार सगळ अशोकलाच करावे लागणार आणि त्यांचे तर इन्स्पेक्शन ऑडीट काय करावे काही सुचतच नाही.

रश्मी : अग मी पण केलं असतं पण माझी तरी सुटी कुठे शिल्लक आहे.

शोभा : ते काही नाही. कसं असलं तरी आपलं माणूसच उपयोगी पडलं. विशाखा तू तुझा हट्ट सोड आणि त्यांना आणायची परवानगी दे बघु.

रश्मी : मला पण तेच वाटतं. अशा वेळी स्वाभीमान वगैरे गुंडाळुन ठेवावा लागतो घालवून देतांना किती सहजपणे केले पण आता.

विशाखा : रश्मी तुला वाटतं पण सासुबाई सुध्दा मानी आहेत त्या नाही यायच्या उगीच मी त्यांना घालवून दिले आता बोलाविले तरी त्या येणार नाहीत. नाहीच येणार.

(विमलबाई, पिंकी व शलाका येतात.)

विमलाबाई : विशाखा, तुझं बरोबर आहे. मी येणार नव्हते मुळी पण या छोट्या नाती आल्या आणि जबरदस्तीने आणले बघ. एकच गोष्ट चांगली हं की, संकटांत तरी तुला माझी आठवण आली. पिंकीने सर्व सांगितले. (रडत) सुनबाई कसं झालं तरी मुलीच्या जागी तू आहेस नाही. रहावलं.

शोभा : आजी, विशाखाने पण तुम्हाला बोलवायचे ठरविलेच होते.

रश्मी : हो ना शोभाताई म्हणाल्याच की, मी घेऊन येते आजींना म्हणून.

विशाखा : हो ना आई. पण याल की नाही याबद्दल मलाच खात्री नव्हती.

पिंकी : अगं मम्मी ती आजी आहे म्हटलं. सर्वांपेक्षा मोठी. ती का नाही येणार. पण आत्ता मात्र तिला घालवून देवू नकोस हं. मग बाहुल्यांचा खाऊ मला कोण करुन देणार. हो ना ग आजी.

विमलाबाई : नाही बरं बाळ आता घालवून दिले तरी मीच नाही जाणार आता. सर्व सांभाळूनच वागेन हो.

शलाका : आता तर मी पण माझ्या आजीला आणणार.हो ना ग मम्मी.

रश्मी : हो ना ! जुन्या माणसांचा आपण कंटाळा करतो पण ते शक्य होत नाही.

शोभा : जुन्या माणसांचा कंटाळा येतो हे पिढी-पिढीचे अंतर आहे. परंतु नुसता कंटाळा येतो म्हणून काहीतरी करणे किंवा आजिबात उपाय न करणे हे बरोबर नाही. जुन्या माणसांचा कंटाळा येतो तर नवीन पध्दतीने मानसशास्त्राचा उपयोग करुन त्यांचेशी जमवून घ्या. चालिरीती जाचक आहेत. कबूल परंतु त्या मोडून टाका. उगाळत बसु नका. जसे बाहुल्यांची गोष्ट. आता या छोट्या मुलींना धरुन आम्ही नवीन प्रांत धरतात नां ?

रश्मी : अगदी बरोबर आहे शोभाताई आमचं हेच चुकलं. जुनं जुनं याचा आम्ही नेहमी कंटाळा करतो.

विशाखा : हो ना आणि नवीन काही करायचे पण नाही उगीच नावे मात्र ठेवतो ही गोष्ट तुम्ही लक्षात आणून दिली बरेच झाले.

विमलबाई : तुम्हाला कंटाळा येईल असे आम्ही सुध्दा वागायला नको नवीन चालिरिती बदलत्या सामाजिक परिस्थितीप्रमाणे बदलायलाच पाहिजे. हा सुध्दा नवीन क्रमच नाही का शोभाताई.

शोभाताई : होय ना रश्मी, विशाखा विमला याप्रमाणे नव्या जुन्यांनी समजूतदारपणे वागण्याचा नवीन प्रांत आचरणात आणला ना तर माणसाला माणूस जड होणार नाही समर्थ म्हणतात. "जुन्याचा आला कंटाळा, तरी नवीन प्रांत पाहिजे धरिला"

तेव्हा समजूतदारपणाने व तडजोडीने नवीनपिढीला धरुन संसारात वागणे हा प्रांत आपण धरु या होय ना.

(सर्वजण हो हो)

पिंकी, शलाका : मग आम्ही बाहुल्या बसविणार व जुनी गाणी खोडून नवीन म्हणणार होय ना मॅडम !

शोभाताई : हो हो तर.

विशाखा : आता या खुशीत आपण सर्व जणी चहा घेऊ या.

रश्मी : छान आयडिया आहे. मी करते चहा.

विमलाबाई : नको हो रश्मी मी करते सर्वांचा चहा. तुमच्या नवीन लोकांबरोबरच आता नवीन क्रम चालायचा आहे ना. या बरका आता चहा घ्यायला. सर्वजणी हो हो आलोच (जातात)

# बाहेर जातात म्हणे

पात्रे - राजू, मंदार, पिंकी, पराग, ताई, दादा, रामागडी.

प्रथम स्टेजवर रामा गडी झाडपूस करतांना, तोंडाने शीळ व सिनेमातील गाणी.

आतून राजू तावातावाने प्रवेश करतो-

राजू : म्हणे आम्ही बाहेर जाऊन येतो. सगळंयाना बाहेर जावसं वाटतं पण मी, मला मात्र अभ्यासाचा धाक ! आणि काय तर म्हणे (वेडावून) टी. व्ही. लावू नका. होम वर्क करा, सारखा अभ्यास अभ्यास अभ्यास, अजीर्ण झालंय अभ्यासाचं.

रामागडी : कशापायी वैताग करताया छोटे धनी, अवं मी हाय ना तुमच्या सोबतीला. सांगा काय आणू, च्या की काफी.

राजू : तूच पी जा. नाहीतरी घरात कोणी नाहीच आहे. आई बाबा क्लबच्या ट्रीपला जाऊन बसले आहेत आणि हा दादा अन् ती ताई त्या कॉलेजच्या इलेक्शनपायी जसे काही वेडे झाले आहेत.

रामा : अहो त्ये रडले व्हते कवा ? छोटे मालक लहान असून शांत तुम्हीच मोठ्यासारखे वागता बघा.

राजू : राम्या, उगीच मस्का लावू नकोस हं तू चल जा हवं तर सिनेमाला जा सगळे (पाय आपटत फिरतो) बाहेर जातात म्हणे.

रामा : नका नाराज होवू, जी, येतील की ताई दादा लवकरच.

राजू : लवकरच ? छे सहाला येऊ म्हणून सांगून गेले आहेत. आता कुठे तीन वाजले आहेत. एवढा वेळ काय नुसता अभ्यास वाटतं ? मी सांगून आलो तर निघाले होते फक्त एवढेच म्हणाले की, अभ्यास कर टी. व्ही. पाहू नकोस घरीच बसून रहा. म्हाताऱ्यासारखे.

रामा : व्हय की हो तुम्ही बी बाहेर जाल तर मी बी रामलीला बघायला

जातो. लई बेस हाय बगा, आज सीतेचं लगीन हाय.

राजू : मग तू आधी जा बघायला ! मला एकट्याला शांत बसू दे.

रामा : पण दादा ताई काय म्हणतील. ते येईस्तोवर कुठे जाऊ नको म्हणून बजावलं हाय त्यांनी.

राजू : हे बघ राम्या डोकं खाऊ नकोस तू जा बघु. संध्याकाळी सहाच्या आत ये म्हणजे झालं. मी अभ्यासाला मित्रांना बोलवून घेतो. म्हणजे सोबत पण होईल.

रामा : बेस आयडीया हाय. वा धनी. असा धनी पायजेत म्हंजे नोकर बी खूष रहात्यात. मग जाऊ दूध कपाटांत झाकून ठेवायचं बरं का आणि हे कुलूप किल्ली बाहेर जाल तर लावून घ्या जा.

राजू : ते मी बघेन तू जा बघु आणि जातांना मंदार, पराग व पिंकीला पाठवून दे. म्हणावं राजूनं अर्जंट बोलावलं आहे.

रामा : वा; वा, आत्ता जातो राम राम (जातो)

राजू : छे. अभ्यासाचा मूड मुळीच नाही. हो मोठी माणसं कशी आपल्या मनासारखं करून घेतात. इकडे जा तिकडे जा आणि आम्ही मात्र एकदम शिस्तीत ! आई बाबा तिकडे ट्रीपमध्ये मजा मारत असतील. ताई दादा इलेक्शनच्या नावाने भटकत बसले असतील. दादाला तर पान खाण्याचा भारी शोक. छे कसा राग येतो सगळ्यांचा (पराग, पिंकी, मंदार येतात)

पराग : काय राजू रामा बरोबर अगदी अर्जंट बोलावलंस

पिंकी : (आत डोकावून) मला वाटलं तुझे आईबाबा ट्रीपवरून आले असणार आणि खूप गंमत जंमत आणली असणार.

मंदार : पण इथे तर कांहीच नाही आणि राजू तू असा चेहरा करून काय बसला आहेस. तब्येत ठीक नाही वाटतं.

राजू : सगळं काही ठिक आहे पण डोकं ताळ्यावर नाही ।

पराग : म्हणजे झालस तरी काय ?

| | |
|---|---|
| राजू | : काय होणार ताई दादा बाहेर गेले आणि मला अभ्यास कर टी. व्ही. पाहू नको म्हणून सांगून गेलेत आणि राम्याला दम भरला की माझ्याकडे लक्ष ठेव म्हणून. |
| पिंकी | : अरे मग तुझ्या आईबापाच्या मागे त्यांचीच जबादारी नाही कां ही ? |
| मंदार | : राजू मग त्यात काय आपण सगळे मिळून येथेच अभ्यास करूया कार रे पराग बरोबर आहे की नाही. |
| पराग | : होना तुला सोबतपण होईल व अभ्यास पण. |
| पिंकी | : चला आपण आपली पुस्तके घेऊन येऊ या. मला पण खूप होम वर्क दिले आहे सरांनी (जायला लागतात) |
| राजू | : ए ए चाललात कुठं इतकं साधं काम करायचं नाही म्हटलं. सर्व बाहेर गेलेत त्याचा फायदा उठवायचा आहे म्हटलं. |
| मंदार | : म्हणजे काय राजू आम्ही नाही समजलो ? |
| पराग | : तुझे सुपीक डोके आता काम करणार वाटतं ? |
| पिंकी | : राजू तुझ्या कल्पना म्हणजे घरी बोलणी खायची लक्षणं. जे काय करशील तेनीट कर हं. |
| राजू | : मुली त्या मुलीच शेवटी, अग जीवनात कसं थील हवं थील ! पुचाटपणा नको. |
| मंदार | : नक्कीच काहीतरी गांफला आहे कळू तरी दे. |
| राजू | : हे बघ गाफला असा की अभ्यास करायचा नाही. तर मग काय टवाळक्या करायच्या आहेत. |
| राजू | : तू मधे मधे फार बोलतोस टवाळक्या वगैरे नाहीपण घराला कुलूप लावायचं अन् ग्राऊंडवर खेळायला पडायचं ! अभ्यास वगैरे गोल. |
| मंदार | : अरे पण तुझे ताई दादा आले तर. |
| पराग | : शिवाय ते बजावून गेले आहेत ना की अभ्यास करायचा म्हणून. |
| पिंकी | : हो ना शिवाय ते सहालाच येणार आहेत मग रे. |
| राजू | : अरे त्यापूर्वीच आपण घरी येऊ त्यापूर्वी कसा येथे यथेच्छ |

फराळ करू या. शाळेतून आल्यापासून मी कांहीच खाल्ले नाही.

मंदार : अरे पण फराळाचे कुठे ठेवले आहे तुला माहित आहे कां ?

पराग : आम्ही शोधायला मदत करू नां चला चला.

राजू : आईने गावाला जातांना डबा ठेवला आहे भरून लाडूचा मग काय मजा आहे की नाही.

पिंकी : राजू तू एकटा खा बाबा आम्ही तर खाऊन आलो आहे.

राजू : अहाहा रे काकूबाई, जशी कांही तुला भूकच नाही. ते काही नाही सर्वांनी डबा फस्त करायचा बाहेर जातात काय ? थांबा हं मी आणतो घरातून. (घरांत जातो तो डबा पडण्याचा आवाज घाबरत पळत बाहेर येतो)

सर्वजण : राजू काय झालं रे.

मंदार : डबा पडण्याचा आवाज आला तू तर पडला नाहीस नं ?

पराग : राजू डबा पडला तर पडला लाडू शाबूत आहेत नां मग वेळ कां ?

पिंकी : अरे आधी तो घाबरलेला दिसतोय ते तर बघा. राजू काय झालं रे.

राजू : अग डब्यापाशी मोठा बोका बसला आहे मी डब्याला हात लावणार तो त्याने माझ्या अंगावर उडी मारली व डबा खाली पडला.

पराग : मग हाकलायचं त्याला. चला मी येतो (दुरून) शुक शुक.

राजू : छे रे (दाखवितो) तो बघ तो बघ कसं बघतोय.

पिंकी : (बघत) आणि हे काय त्याने तर सुरूवात पण केली खायला, आता रे कसे.

मंदार : काठीने मारू या का त्याला नाहीतर सर्व लाडू तो फस्त करेल. (टाळ्या वाजवितो, काठी शोधतो छे. मुश्कीलच आहे.)

राजू : पोटात भूक लागली आहे आणि समोर लाडू पडले आहेत पण काय करणार (शुक शुक )

पिंकी : जाऊ दे राजू खाऊन खाऊन तरी किती खाणार तो. तू आमच्याकडे चल तुला मी चिवडा देते खायला.

पराग : खरच राजू चल ना आमच्याकडे.

मंदार : बोका म्हणजे भयंकर अंगावर आला नां तर ओरबाडून रक्तच काढेल बघ.

पिंकी : ए नको रे कांहीतरी बोलू मला भीती वाटने.

राजू : जाऊ दे या बोक्याच्या भानगडीत पडलो तर आपल्याला खायला उशीर होईल. पुन्हा सहाच्या आंत यायचे आहे. ताई आणि दादा हे लाडू पहातील ना तर असे चिडतील की बस्स ध्या म्हणा. बाहेर जाता नं ?

पराग : बरं राजू बोल व्हाट नेक्स्ट जल्दी चलो.

राजू : थांब दुधवाला आलाच दूध घेवून येतो (जातो व पुन्हा येतो) हे बघ रामाने कुलूपकिल्ली ठेवलीच आहे तेव्हा आता चलायचं.

पिंकी : ए मी नाही आले तर रे मला बाई हे असे काही.

ताई: बरीच मोठी जखम दिसते. राजू तू कशाला गेला त्यापेक्षा सांगितल्याप्रमाणे अभ्यास केला असता तर.

राजू : ताई दादा मला चांगलीच शिक्षा मिळाली. यापुढे मी कधी असे वागणार नाही. ताई ते लाडू ग.

मंदार : आता आपण खाऊ या ना.

पिंकी : तर तर मघाशी तर ...

पराग : चूप ग चला बरं ताई दादा आपण सर्वजण आता लाडवावर ताव मारु या.

राजू : होना खाऊच मुळी बाहेर जातात म्हणे.

# कथा धारा

# आबा ड्रायव्हर

आबा ड्रायव्हर ! खरं म्हणजे आबा आणि ड्रायव्हर हे कॉबिनेशन तसे ठीक वाटत नाही. ते आपलं कु. संगीता घोगरे अस काहीतरी नाव असावं तसचं वाटत । जुन्या पिक्चरमधला टॅक्सी ड्रायव्हर देवानंद आणि आमची जीप चालविणारा आबा ड्रायव्हर म्हणजे जमीन आसमानचा फरक आबा हे नातं गोड असलं तरी आवर्जुन 'आबा' हे नाव सुचणं जरुरी नाही. परंतु आमचे नातवंड जेंव्हा आम्हा दोघांना आजी आणि आबा म्हणू लागले ना तेंव्हा त्या आबा नावातला गोडवा जाणवू लागला आणि आपण त्यावेळी उगाचचं टॅक्सी ड्रायव्हर आणि ड्रायव्हरचा घोळ घालत बसलो याची जाणीव झाली. वयाचा दोष दुसरं काय ! असो.

तर आम्ही जीप घेतली विकत। नवीन माणूस पहाण्याच्या अविर्भावात हितचिंतक आले ! कोणी हातवारे केले पण ते तेवढेच सुसंगत नव्हते पण बोलणाऱ्याचे तोंड कोण धरणार. म्हणे अहो जीप म्हणजे रानगट वाहन (म्हणजे आम्ही कोण मनांत म्हटलं) पण स्पॉट इन्स्पेक्शन ला जायला बरे झाले नाहीतरी खून मारामाऱ्या रानातच होतात नाही का वकील साहेब? तशी कॉमेंट ठिक होती. एकजण स्त्रीदाक्षीण्य दाखवत म्हणाले घरच्या बायकांना हे वाहन सुखावह नसतं त्यातून लांबच्या प्रवासाला छे छे! अहो नशीब मी ....कसा यांच्यासोबत सहप्रवास आधिच सुरु केला होता. ठीक हेहि काहीच नाही परंतु केवढ्याला घेतली हो? (खास वऱ्हाडी खाक्या) प्रामाणिकपणाने १० हजार किंमत सांगितली तर आणि काय ऐकावे ? म्हणजे फुकटच म्हणा की राजा ! (ते ट्रॅक्टरवाले होते.) काळाचा महिमा बघा. नुकतीच आमच्या मुलाने होन्डा सीटी गाडी घेतली व गॅरेजमध्ये आणून तिची पूजा केली. त्या कॉमेंटसवाल्या सद्‌गृहस्थांची मला तीव्रतेने आठवण झाली क्षणभर वाटले म्हणावे त्यांना आता हो राजा? पण छे हाच

तर फरक तिथे जाणवतो अभिमानाने मन भरुन आले. त्या काळातल्या जीप घेणाऱ्या वडिलांचा मुलगा आज होन्डासीटी घेतो "बापसे बेटा सवाई".

. हं तर काय सांगत होते एवढ्या दिव्यातून जीप तर आली. मालकच ड्रायव्हर. पण आपण पडलो कुटुंब वत्सल ! सर्वांना गाडीचा उपयोग मिळण्याकरीता ड्रायव्हरची योजना। आमचे सासरे म्हातारे ते म्हणाले अनुभवी ड्रायव्हर मग म्हाताराही चालेल ठेवा. नाही तर आजकालचे ड्रायव्हर ड्रायव्हींग सोडून सर्व धंदे करतात. बोलण्यात तथ्य होते पण त्यांतील म्हातारा चालेल हे शब्द धरुन एक म्हातारा 'आबाच' ड्रायव्हर म्हणून आम्हाला मिळावा हा योगायोग। कारण त्याचा 'म्हातारा' हे क्वालीफिकेशन फक्त आम्ही उचलून धरले बाकी आबाला सर्वांनी दूरच केले होते.

आबा ! धोतर, शर्ट, काळी टोपी, विटका कोट फाटका जोडा तोंडाचे बोलके ! इंटरव्ह्यु झाला.। बस लायसन रिन्यु करुन घ्या साहेब लई किटकिट करुन राहिले R.T.O. वाले एवढ्या ड्रायव्हरकी मध्ये बी ॲक्सीडेंट नाही. ठोसा मारल्या, लागल्या बी. पण बाकी सेफ ! अमक्याचा गाडीवर तमक्याच्या लग्नाच्या वऱ्हाडावर, ढमक्याच्या मतदारासाठी ही गाड्यांची शर्यत कुठेतरी थांबयला हवीच होती. हाताने त्याला गप्प केले. वर मुद्यावर गोष्ट आणली पगार ? "तुम्ही द्याल तेवढा !" तेवढ्यात आंतून सासऱ्याचा आवाज ३० रु. हप्ता मिळेल. खरतरं तुमचं वय पाहून तेही कुणी देणार नाही. शिवाय ड्रायव्हींग तर वकील साहेब करतील. मनात म्हटलं म्हणजे आपल्याला ड्रायव्हर हवा होता का? की मुद्याम म्हातारा हवा होता हो नाही करता करता आबा तयार झाले दुसरा दिवस हजरेचा.

हजर ! येक फडकं द्या गाडी पुश्याले. मी जुन्या पण स्वच्छ साडीचे लांब फडकं दिले. बापा, सुनबाइ एवढे काहाले फाटकं मळकं द्या. हे ठुवा पोट्ट्यायले नाक अंग पुश्याले। त्यांचे वय पहाता बोलायची सोयच नव्हती. एक पोतेरे वजा टॉवेल दिला तो पटला झालं पेटी तबले तंबोरे लायायला सुरवात झाली. दुसरी मागणी ! बाई, टेपरेल द्या. बरं

टेमरेलचा खरा अर्थ मला माहित. मी म्हटलं आबा संडास आहे जा ना तिथं काह्याले व सुनबाई टमरेल म्हणजे एक टिनपत्राचा डबा । गाडी धुवायले.। गाडीत पाणी टाकयले.। आबांची ही साधी राहनी पाहून आबा ड्रायव्हींग बर । करतील अशी आशा वाटु लागली.

रोज सकाळ सायंकाळ वकील साहेबांना कोर्टात तेथे आणणे आम्हाला गावात नेणे, आजोबा आजींना मंदीरात नेणे मुलांना फिरवून आणणे हे करत-करत आबाने सर्वांची मने जिंकली आबा घरातला आबा बनून गेले आबांचे लायसेंस रिन्यु होऊन आले तो दिवस. आबांचा आनंद काय विचारता ? वकीलसाहेब मला तर नवी जिंदगीच भेटली तुमच्या कृपेने आता पुढे १५ वर्ष घोर नाही. मनांत म्हटलं तुम्ही गाडी चालवू शकाल पण गाडी मात्र टिकणार नाही. आबा।

आबा, शैलाबाईला वाजवायची पेटी शिकायला रोज संध्याकाळी ६ ते ७ घेवून जात जा. "व्हय जी उद्यापासून बाई चाल जो" मग ड्यूटी सुरु ४ ते ५ महिने व्यवस्थित क्लास पण काही कारणाने क्लास बंद झाला याचा खरा आनंद आबाला झाला. शैलुला म्हणतो कसा बाई भल्ल चांगलं झालं तुहा क्लास बंद झाला ते. वकीलसाहेबाला पेटी शिकवायचे पैसे, गाडीला पेट्रोल द्या अन् तुझ लगीन ठरलं तर हुंडाबी द्या तेवढ्या नाराजीतही आबाला हसावे की रागवावे कळेना. जयंतला कॉलेज मध्ये ॲडमिशन मिळाली नांदेडला जाण्यासाठी आबाने मोटार स्टॅंडवर सोडले. कॉमन ऑफ घेवून तो । लगेच अकोटला आला. आम्हाला खूप बरे वाटले. सकाळी आबा आले. जयंतला पाहून "का रे बाबू परत आला जमत नाही वाटते।" हसण्या शिवाय जयंत काय करणार? जयंतने आबा चे पाहून ड्रायव्हिंग शिकण्याचे ठरविले. संध्याकाळी रोज रोडवर गाडी न्यायची मधून कॉमेंटस् चालत काय राजा समोरुन आपल्याकडे तो गडी येवून राहिला तर तू हॉर्न देनं, हॉर्न आवश्यक असेल तरच दे. पुढे जाणारा मागे वळून पाहू लागला की, आबा तो वळून पाहते हॉर्न देवू कां? जयंत विचारी त्याचा बोलण्यातली खोच आबांना समजायची आबा लई शायना आहे ना रं तू गमता नको करु गाडी शिकत की बैलगाडी?

मधून मधून थोडे सामान आबाला आणायला सांगावे लागे एकदा आबा १ डझन केळी अन् फावडा छाप दोऱ्याचे रीळ घेवून "या." फावडा छाप केळी म्हणजे फणी केळाचे हातवारे करुन दाखविले आबाने आता दोऱ्याच्या रीळाला कोणता ब्रँड मिळतो याचा अंदाज घेवून डोळ्यावर हात मारुन घेणे बाकी होते. वस्तु बरोबर आणायच्या पण आमची भाषा अंगवळणी पडली नव्हते प्रवासांत कुठे गर्दी दिसली गोंधळ दिसला की आबा गाडी जास्तच भरधाव काढील. "आहो आबा आम्हाला बघायचं आहे नां काय झालं ते काय करता? पेशंट न्यावे सांगतील आपल्या गाडीतून मगं कस? बघत्यात ते त्यायचं । इथे भलेपणा दाखवून जमत नाही बाई. माहे पांढरे केस झाले उगाच नाही. त्यावेळी आबाला हेअर डायच द्यावा असा दुष्ट विचार येई.

"आबा मंदीरात सभा आहे ९ वाजता. ती संपल्यावर ४-५ बायांना घरी सोडायचे आहे. गाडीतच बसून रहा. नाहीतर उशीर होईल." ठीक म्हणून आबाने मान्य केले. सभा उशीरा संपली आणि गाडी पाशी आले. आबा गायब. आमची अस्वस्थता वाढली. आबा जणु धावत येत होते. "आलो आलो." "काय आबा तुम्हाला सांगितले होतं ना की, गाडी सोडू नका." तर म्हणतात कसे आता बायाची काम काह्याले लवकर सरतात. म्हणून बसलो होतो तिकडे हं चाला बाप्पा इतक्या बसताल काय गाडील आज कुठी सोडावं लागते यायले. आबा आम्ही म्हणू तस करां ठीक-ठीक

यवतमाळला आबा खूप- खूष असायचे कारण सर्वांबरोबर त्यांना बाई जेवू घाली. मोठ्या मानानं गावांत जाण्याची सुटी. मग काय झाडांना पाणी देत आबा ट्यूब घेवून असायचे झाडांची चंगळ होत असे.

रेल्वे प्रवाशाला सोबत म्हणून एकदा आम्ही आबाला नेले. शैला स्टेशनवर पाणी घ्यायला आबा उतरले तरी शैला नको म्हणत होतो पण आणतो ना तू गप बैस म्हणून ते उतरले आमचा जीव वर-वरच होता पाणी तर बॅग घेतली पण गाडी सुटली आता चालत्या गाडीला धरुन आबा सावकाश चालत होते. गाडी चालतेय की, आपण हेच त्यांना कळले नाही शेवटी दारासून आबा

गाडी सुटली चढा आत त्यांना ओढलेय अस काय? मग हे चढून राहिलो पाणी घे आंधि आबा गाडीत चढले अन् आम्हाला हायसे वाटले. आबा सोबतीला आले की, त्यांना सांभाळण्यासाठी हेच कळेना सबंध ट्रेनभर आबांना सुखरुप आणणे हेच एक काम झाले पण आबा शांत।

शैलुच्या लग्नाचा अहेर आबांना केला त्यावेळी तो घेतांना आबाच्या डोळ्यातील आनंद अजुनही विसरु शकल नाही. "मला अहेर काह्याले बाप्पा पोरगी सुखात असली की बस्स।" अहेर घेण्याचा आणि मुलगी सुखांत असण्याचाही सबंध असु शकतो हा एक तांत्रिक विचार समजून गेला.

आबा मनापासून नोकरी करीत होते. हे सर्व करता-करता थकत चालले. गाडी चालवितांना चुका होऊ लागल्या. १० वर्ष झाली आता आबा सुटी घ्या असे वकीलसाहेब म्हणाले. आबा रडले. वकीलसाहेब पगार देवू नका. नुसती गाडी पुश्याले ठेवा. माझी ही अर्धी भाकर तोडु नका साहेब. लई सन्मान दिला तुमच्या घरी मला. घरच्या प्रमाणे जीव लावला. एवढा मान मला ड्रायव्हर म्हणून आजपर्यंत कुणीच दिला नाही. मला नोकरीवरुन काढू नका. ड्रायव्हर म्हणूनच मला मरायचे आहे. मन विचलित झाले. आबांची कारकीर्द यशस्वी होती. गाडी पण सुस्थितीत ठेवली. नुसतेच येवून आबा बसत. पण आता वय होवून गेले. तशा तब्येतीच्या तक्रारी सुरु झाल्या. रोगव्याधि जडल्या. आम्हालाही जीप विकणे जरुर होते. तिची सर्व्हीस पण संपली होती. एक दिवस आम्ही गिऱ्हाईक पाहून जीप विकून टाकली. आबाला ते समजले. तब्येत जास्त होती. म्हणून वकीलसाहेब भेटायला गेले. जीप विकण्याचे त्यांना समजले हळहळले साहेब आता आपण बी लवकर संपणार. याद ठेवा म्हाताऱ्याची काही दिवसांनी आबांनी या जगाचा निरोप घेतला हे कळले. घरातील सर्व हळहळले. गाड्या काय आणखीही घेवू पण आबासारखा जीव लावणारा ड्रायव्हर मिळणार नाही। ड्रायव्हरचे नाते फक्त गाडीशीच नसते तर त्यांत बसणाऱ्यांची वागणूक व सहानुभूती ही ड्रायव्हरला खूप काही देवून जाते.

# कोर्टातील क्षण

नका हो, नका माझ्या धन्यसनी जेलात टाकू नका. माझ्या पोरींचा तो बाप आहे. जीवाच्या आकांताने मी ओरडत होते आणि कोर्टामध्ये सर्व वकील, जज पक्षकार कारकून सर्वजण कुतूहलाने माझ्याकडे पहात होते. त्या सर्वांना माहित होता तो नुसता कोर्टाचा व्यवहार. एका स्त्रीला कबूल केलेला. पोटगी न भरण्यामुळे पतिला होणारी तुरुंगवासाची शिक्षा. परंतु पोट भरुन सुध्दा दोन वर्ष दुःख सहन करीत होते मी. कोर्टाची चहापाण्याची सुटी झाली आणि माझ्या वकीलानी मला शांत होण्यास सांगितले. शांत रहाण्यासारखी मनाची स्थिती नव्हती. आपल्या नवरा-बायकोत बेबनाव होऊन पोटगी दरमहा मिळेल मी वकीलामार्फत केस लढले. अगदी नवऱ्यावर जिद्द म्हणून. त्याला मी नको तर मला पण त्याची जरुर नाही. या स्वाभिमानात मी केस केली. कोर्टाने मला पोटगी मंजूर केली. दोन वर्ष मी ती घेत गेले. पण यावेळी तो पोटगी भरु शकत नाही म्हणून त्याला जेल झाली त्याच्या अर्ध्या भाकरीत रहाण्याची माझी तयारी असतांना तो पोटभर जेवू शकत नाही. म्हणून हा तुरुंगवास! कायदा असे करु शकेल पण मी ? छे प्रथमपासूनच माझी त्याच्याकडे बघण्याची वृत्ती अशी नव्हती. रीतसर माझे लग्न त्याच्याशी आईनी लावून दिले. आम्ही दोघेही मजूरी करुन पोट भरीत होतो. ईश्वर कृपेने आम्हाला तीन मुली झाल्या कोण जाणे कृपेने की अवकृपेने. कारण लागोपाठ मुली झाल्या म्हणून त्याची नाराजी. अत्यंत सुखी असलेल्या आपल्या संसाराला याच एका गोष्टीमुळे दृष्ट लागली. दिवसेंदिवस मी त्याच्या मनातून उतरु लागले. मुलगा नाही हा काय माझा दोष ? माझ्या हाती असलेल्या सर्व गोष्टीत मी त्याच्याशी तडजोडीने वागत होते. पण त्याचा पुरुषी अहंकार उफाळून वर आला आणि एकदा त्याने मला देवळात जाऊ म्हणून घेवून गेला व माझ्या खुषी खुषी काही कागदपत्रावर सह्या करुन घेतल्या. नंतर मला समजले की, त्या सह्या दोघाची फारकत करण्याबाबत होत्या. पण वेळ निघून गेली होती. कोर्टकचेरी होवून शेवटी कोर्टाने मला पोटगी मंजूर केली. गेली दोन वर्ष मी ही पोटगी घेत होते तो विशिष्ट भावनेने मुलींची माया धरुन पैसे पाठवित होता. अद्याप त्याने दुसरे लग्न केले नव्हते पण विचार

चालू होता. एका महिन्यात त्याने पैसे पाठविले नाहीत. तेंव्हा मी वकीलामार्फत कोर्टाची मदत घेतली. कायद्याने त्यांला पैसे भर नाही तर जेलात जा असा हुकूम केला. पण नाही मी त्याला जेलमधे जाऊ देणार नाही. आमचा संसार सुखी चालू असतांना एकदा पैसे मजुरीचे कमी आले. तर आम्ही दोघांनी मुलींना पोटभर जेवण दिले व उरलेला अर्ध्या भाकरीत दोन घास कसेबसे पाण्याबरोबर ढकलले होते. डोळ्यांत अश्रु होते पण दुःखाचे नव्हते तर दोघांनी ते सुख म्हणा दुःख म्हणा त्यातील अर्धा वाटा उचलला होता. त्याही परिस्थितील आम्ही समाधानाने माझी मजूरी वाचवून मी त्याला दसऱ्याला सदरा घेतला होता तर त्याने त्याच दसऱ्याला मला लुगडे घेतले होते. या आठवणी मला स्वस्थ बसू देत नाहीत. आज तो पोटगी देवू शकत नाही. आजपर्यंत त्याने दिलेल्या पोटगील मी सहभागी झाले आज त्याच्या जेलामध्ये होणाऱ्या दुःखात मी वाटा मागीत आहे. तो पण मागे वळून वळून माझ्याकडे पहात होता. खरचं त्याला पण त्या गोड आठवणी आल्या असतील कां ? आमचा संसार तीन मुली होईपर्यंत वाढला ! सुख दुःखाच्या जमाखर्चात कोणतीही शिल्लक पडते पण दोन्ही बाजूंकडे लिहिण्या सारखे तर होतेच नां ? दुःखाची शिल्लक जास्त राहिली तरी सुखाचे शिडकावे त्याला शांत करण्यास पुरेसे होते. आणि म्हणूनच त्याला जेलमधे जाणे मला नको होते. चहापानावर मी वकीलाला भेटून मला पोटगी मिळाली हे कबूल केले पण माझ्या धन्याला पाठवू नका. असे तुम्ही सांगत साहेबांना सांगा असे सांगत होते. वकीलाच्या भावनाही हेलावून गेल्या तिकडे वकील जज वगैरे जमून काहीतरी बोलले व त्याची जेलची शिक्षा रद्द केली. माझ्या डोळ्यांत पाणी आले. पण ते मला पुसावे लागले नाही. तो माझ्याजवळ आला त्याने माझे डोळे पुसले. आणि वकीलाला व तेथील लोकांना सांगू लागला आपल्याला हेच बायको हवी. हिची परीक्षा झाली. मुलगा नाही ही खंत आता मला नाही तर माझी इज्जत करणारी बायको आहे याचा मला अभिमान आहे. कोर्टातील सर्व लोक आमच्याकडे बघत होते आम्ही आणि मुलीसुध्दा फार अभिमानाने घरी परतत होतो. संसाराने कायदे नवराबायकोच्या संगनमतानेच करावे लागतात. एकमेकांच्या मनाचा ठाव घेत.

# तू वाट चुकलीस

माझा नवरा अत्यंत दारुबाज. तसा नोकरीत वगैरे हुशार, समाजांत मानमरातब सर्व काही उत्तम पण दारुचा व्यसनापायी कुटुंबीयांचे हाल. माझी गोंडस दोन मुले पण त्यांना रोजचे जेवण मिळणे मुश्कील आणि माझे हाल तर विचारुच नका. 'नवऱ्याने मारले आणि पावसाने भिजवले तर सांगणार कुणाला? मनुष्य भरल्या पोटी वाटेल ते सहन करु शकतो पण उपाशी पोटीच्या यातना ......मी भोगल्या आहेत. लग्नानंतरची १० वर्षे मला नवऱ्याने अगदी सुखांत ठेवले पण कसे कोण जाणे त्याचे दारुचे व्यसन लागले वाईट मित्रांच्या संगतीने वाढले व त्याचे पर्यावसान नालीत पडणे, घरी मुलांना, बायकोला मारणे, पैसे मागणे, दागिने विकणे, भांडी विकणे, यांत  झाले. तरी एक सुसंस्कृत घराण्यातील मुलगी म्हणून मी सहन करीत आले. आईवडीलांना व इतरांना कळायला नको त्यांना दु:ख होईल म्हणून आला दिवस ओढत गेले. मग सहनशीलतेला मर्यादा असते शेवटी मुलांना घेऊन मी माहेरी अचानक निघून आले. म्हाताऱ्या आई वडीलांच्या मनाची अवस्था मी वर्णन करु शकत नाही. मायेच्या पोटी त्यांनी मला आधार दिला. 'माहेरीच राहीन' हा माझा बालहट्ट त्यांनी पुरविला. लग्नात कन्येचे दान करुन दिलेल्या आईवडिलांवर बोझा बनून मी आले. विमल माझी मैत्रीण अगदी सुशिक्षित उत्तम घरी नांदत होती. ती त्याच वर्षी माहेरपणाला आली. आमच्याच शेजारी रहात होती.

माझे हे असे कळले म्हणून भेटायला आली. व माझी सर्व कहाणी ऐकून घेतल्यावर म्हणते या परिस्थितीत तू माहेरी यायला नको होतं? अग तू वाट चुकली आहेस. कसही असलं तरी आपल्या सासरी जायचं होतं। नवऱ्याला सुधारण्याची हिंमत नव्हती तर सरळ सासू सासऱ्याकडे का गेली नाहीस? नांदत्या मुलीच मोठेपण माहेरी असतं अन्यथा ज्या घरांत

लाडाने अल्लडपणाने वाढलो, खेळलो त्या माहेरच्या घरांत एवढीशी सुध्दा जागा आपला हक्क सांगत नाही. पाहुण्यांचे स्वागत होते, आल्यागेल्यांचा चहा होतो परंतु तुला मात्र कवडीचीही किंमत कुणी देणार नाही. अशी बरीच बडबड करुन विमल निघून गेली. सर्व घरांतून एकच सूर कानी येऊ लागला. "तू वाट चुकलीस," "तू वाट चुकलीस" मनांत विचार आला अशा माझ्यासारख्या गांजलेल्या असमर्थ मुली स्वतःला जाळून घेवून आत्महत्या करतात त्या काय बरोबर वाटेने जातात की काय? पण तसे वाटत नाही. कारण समाजांत तर याबद्दलही किती बोलले जाते. मुलीला ? माझ्यासारख्या अडचणीत सापडलेल्या स्त्रीने सुरक्षित जागा म्हणून माहेर ही जागा शोधली तर 'तू वाट चुकलीस' म्हणून विमल सारख्या समाजाने म्हणावे सासरच्यांनी माणुसकी सोडली म्हणून मी काय म्हणून जीवावर उदार व्हावे? माझी मुले आहेत त्यांना बाप मिळत नाही तर निदान आई तरी? समजा मी जीवांचे काही बरेवाईट करुन घेतले असते तर नातेवाईक, समाज यांना किती उमाळे आले असते. अर्थात मला ते ऐकू आले नसते परंतु प्रतिक्रिया ऐकायला मिळतातच नां? माझ्या अंगात हिंमत आहे. काही तरी अर्थार्जन करुन मुलाना वाढविण्याची इर्षा आहे. फक्त मला निवारा हवा आहे. मनाला झालेल्या जखमांवर हळुवार फुंकर घालणारी मायेची माणसं हवी आहेत. त्यांचे मार्गदर्शन हवे आहे. माझे हेही दिवस निघून जातील, माझ्या रोगी मनाला योग्य औषध हवे आहे मग ते शोधण्याकरीता पत्करलेली वाट चुकीची होईल कां ?

एक मात्र खरं की, व्यसनाधीन झालेल्या नवऱ्याला मी हिंमत धरुन ताळ्यावर आणू शकले नाही. येथे माझे प्रयत्न तोडके पडले. पण ही हिंमत स्त्रीमध्येच असते कां ? मात्र ती आणणे जरुर आहे. आपले प्रश्न आपणच हिंमतीने धैर्याने सोडविले पाहिजेत याकरता स्वावलंबनाचे धडे व शिक्षण मुलींना घरोघरी मिळत असते ते कांय मुलींना संस्कार सोडून निघून येण्यासाठी ? आपल्या शिक्षणाचा, धैर्याचा व हिंमतीचा उपयोग कसा मी

माझा संसार सांभाळायला हवा होता. व तो सांभाळण्याचा मी प्रयत्नही केला. पण मी, गोड बोलून सांगणे, मन सांभाळून बोलणे वगैरे ने जाण्याचा जो मार्ग पत्करला तो मात्र साफ चुकीचा होता. मुलींनी आता इतके कमकुवत बनून चालणार नाही. पक्षीसुध्दा विशिष्ट मर्यादेपर्यंतच आईवडीलांच्या चोचीने चारा भरवून घेतात. पंख फुटले की, लागले उडायला आकाशांत ! मग आम्हीतर माणसं ! बुध्दीची जोड असणारी. माहेरी निघून जायचा मार्ग का पत्करावा ? या अर्थाने 'तू वाट चूकलीस' हे विमलचे म्हणणे तसे बरोबरच नव्हते कां ? कां मी नवऱ्याचा मार सहन केला ? प्रतिकार करण्याची शक्ती माझ्याजवळ कां नव्हती ? मी कां दारुबाज मित्रांना घरी प्रवेश करु दिलां ? कां मी ऑफीसांत जावून कायदेशीर गोष्टी करुन घेतल्या नाही ? कां मी सासरी मुलांना ठेवून एकटी या गोष्टीला तोंड दिल ? कां नाही मी महिला सुधार संस्थाचा सल्ला घेतला ? का माझी घटस्फोटाला तयारी झाली नाही ? हे सर्व मी करु शकले असते आणि करायलाच पाहिजे. आणि या दृष्टीने मी वाट चुकले आहे.

पण बरोबर जीवनाची दिशा देण्यात ही चुकलेली वाटच मला बरोबरं ठिकाणावर पोचवेल ना ?

ती वाट चुकले म्हणूनच अडखळतं रखडत मी या वाटेला आले. पुढील जीवनाची वाट मात्र मला बरोबर मिळेल या आशेवर मी जगत आहे.

# समर्थांचिया सेवका वक्र पाहे

मुलगी झाली मुलगी। गोपाजीपंत व राधिकाबाई यांच्या पोटी दिव्य कन्यारत्न जन्मास आले. मोठी गोड पोरगी, नावं काय ठेवायचे? वेणा। वेणा नाव ठेवण्यांत आले.

चंद्रकले प्रमाणे वेणा वाढू लागली बाळलीला करु लागली आईवडिलांच्या कौतूकाला दिवस पुरेना. पहाता पहाता वेणा सहा वर्षाची झ ाली. देवघरांत बसून रामरक्षा स्तोत्र ती म्हणत असे. ती सहा वर्षाची झाली हे तिचे तिला सुध्दा कळले नाही. तिचे बोबडे बोल शुध्द उच्चारात केंव्हा आणि कसे विलीन झाले ते कुणाला कळलेच नाही. वेणा अगदी बालपणापासून सोज्वळ व सात्त्विक व सोशिक होती. सद्‌गुणांची सारी लक्षणे जणु तिच्या आश्रयाने वाढत होती. बालहट्ट हा शब्द तिच्या लेखी नव्हताच. वेणाबाईच्या घरांत रामोपासना परंपरेने चालत असे त्यामुळे रामभक्तीचे संस्कार तिच्यावर बालपणीच झाले होते. रामाची पूजा करणे, फोटोला हार घालणे हे तर तिच्या आवडीचे काम.

मृत्युनंतर माणसाचे काय होते ?
राम देव होता मग त्याला मरण कसे आले ?
समाधी लागते म्हणजे काय ?

असे मोठमोठे प्रश्न ती आईवडीलांना विचारीत असे. शिक्षणासाठी वेणाला मास्तर घरीच ठेवले होते. पाटीवर ती कितीतरी अक्षरे काढू लागली लिहीणे, वाचणे तिला अवगत होते. पण तिची वृत्ती लहानपणापासून अध्यात्माकडेच होती.

करता करता वेणा दहा वर्षांची झाली त्या काळात मुलगी लग्नाला मोठी झाली. तो काळ तसा होता. 'लग्न' ही कल्पना वेणाला रुचत नसे. मोठमोठे ग्रंथ वाचावे व परमार्थाकडे जावे असे त्या बालमनाला वाटत होते.

दहाव्यावर्षी वेणाचे लग्न झाले मिरजेच्या देशपांडे घराण्यांत वेणाला दिले होते. पण संसारात तिचे मन रमेना. ईश्वर भक्ती मध्ये ती सदा तल्लीन असे "जय जय रघुवीर समर्थ" हा रामदास स्वामींचा जयघोष वेणाला खूप काही सांगून गेला आणि ती त्यांची शिष्या बनण्यासाठी तयार झाली.

आमुच्या वाटे नका जाऊ । तये वाटे तुम्हा लाड ।
आमही पारिखे पारिखे । न हो लौकिका सारखे ।

देह माझे मन । सर्व मोठे गुरुराजे ।
आम्ही गुरुनाथ संथी ज्ञानमुळा दिधली हाती ।

याप्रमाणे वेणा काव्य स्वत: रचु लागली. तिची ही प्रतिमा व मनाची धारणा पाहून रामदास स्वामींनी तिला अनुग्रह दिला व तिला चाफळला नेण्याचे कबूल केले. याप्रमाणे वेणा रामदास स्वामींची शिष्या बनली.

एक स्त्री याप्रमाणे समर्थांच्या एका साधुंच्या नादी लागली. म्हणून समाजनिंदकांनी भरपूर निंदा केली. वणावर दुषणे दिली. आमच्याही पोरीबाळी बिघडतील म्हणून तिच्यावर बहिष्कार टाकण्यापर्यंत लोक निंदा करु लागले. पण परमार्थाच्या मार्गाला लागलेल्या वेणाने त्याकडे दुर्लक्ष केले व आपली अध्यात्माची वाटचाल ती चालत राहिली.

संत मीराबाई, तुकाराम, ज्ञानेश्वर, यांना समाज निंदकांचा काय कमी त्रास झाला. पण सोने ते सोनेच त्यांच्या ईश्वर भक्तीचाच शेवटी विजय झाला.वेणा समार्थांची शिष्या तिच्याकडे वाईट दृष्टीने कोण पाहू शकणार.

समर्थाचिया सेवक वक्र पाहे
असा सर्व भूमंडळी कोण आहे.

आणि हाच प्रत्यय वेणाला आला. स्वत:ला काय मीरा समजते आहे? समाजकंटकाची जहरी बोलणी. मिराने विषाचा पेला पिऊन दाखविला.तुझ यात आहे का तेवढे सामर्थ्य ? विरोधकांचे प्रश्न.

त्यावर वेणाचे उत्तर माझी अशी दृढ श्रध्दा आहे की, तुम्ही विष दिलेत तरी मी मरणार नाही. श्रीकृष्णाच्या परमभावाने मीरा जशी कृष्णमय झाली तशी सर्मर्थांच्या भक्तीने मीही. समर्थरुप झाले आहे. आणा विष आणा तुम्हाला कटोरी घ्यायची असेल तर खुशाल घ्या. मी ते विष आनंदाने प्राशन करेन.

थोड्यांच वेळात जिदीला पेटणाऱ्या समाजकंटकांनी वेणाला विष प्रयोग करण्याकरीता एक पितळी पेला आणून त्यामध्ये विष घातले व तो पेला वेणाबाईपुढे ठेवण्यांत आला. वेणाबाई: समर्था, मी सीतेसारखी पवित्र असेल तर हे विष या अपवित्र देहास नष्ट करु दे अन् मी सीतेसारखी पवित्र असेन तर मग हे विष मला अमृत ठरेल. त्या निमित्याने रामनामाची अन् माझ्या गुरुदेवाची थोरवी समाजास सिध्द होईल जय जय रघुवीर समर्थ.

असे म्हणून वेणाने तो विषांचा पेला हातात घेवून प्राशन केला. वेणाबाईचे सारे विरोधक एकदम गप्प होते. कारण विष प्राशन करुन बराच वेळ झाला होता. पण वेणा प्रसन्न, शांत व तेजस्वी दिसत होती. विष पितांच अर्धा तासात वेणा काळी ठिक्कर पडेल असे सर्वांना वाटत होते. पण विष घेवून तीन-चार तास झाले तरी वेणा पूर्ववत. निंदकांचेच चेहरे काळवंडायला सुरवात झाली विषाचा प्रभाव वेणावर झाला नाही.


समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ।
जयाची लीला वर्णिती लोक तिन्ही ।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।

# गणेश जन्मकथा

एकदा शंकर-पार्वती खूप तन्मयतेने नृत्य करीत होते. नृत्य करण्यांत ते जणु आपले भान हरवून दंग झाले होते. अचानक शंकर नृत्य सोडून आपल्या गणांसह जंगलात तपश्चर्येला निघून गेले. पार्वतीला याचा पत्ता पण लागला नाही. ती भानावर आली पहाते तो शंकर नाही. तिला न सांगता शंकर निघून गेले याचा तिला खूप राग आला. आपण एकटेच आहोत ही कल्पना तिला असह्य झाली. तिने विचार केला आपल्या अंगावरील सर्व मळ काढून तिने एक मुलाची प्रतिमा केली. त्या प्रतिमेत प्राणप्रतिष्ठा केली व त्या बालकाला सांगितले 'बाळा' मी जरा स्नानाला आत जाते. तू येथेच बसून रहा. व कोणालाहि आंत येऊ देवू नकोस. अगदी प्रत्यक्ष शंकर भगवान जरी आले तरी त्यांना मनाई कर म्हणावं आई स्नान करीत आहे. तू माझा बाळ आहेस नां ? बालकाने आईची आज्ञा पाळीन म्हणून पार्वतीला शब्द दिला.

काही वेळाने शंकर परत आले. पहातात तो पार्वती नाही. पण दाराजवळ एक बालक बसला आहे. शंकराने त्याला पाहिले व तू कोण म्हणून विचारले बालक म्हणाला माझी आई पार्वती आहे. मी तिचा मुलगा आहे. शंकरांना आश्चर्य वाटले. पार्वतीचा मुलगा म्हणजे माझा कोण ? आणि मला माहित नाही. शंकरांना राग आला ते आंत जाऊ लागले पण बालकाने ते काम मला आईने दिले आहे तेंव्हा आपण आंत जाऊ शकत नाही. शंकराचा राग अनावर झाला तू एवढासा बालक मला अडविणार ? थांब तुला चांगलीच शिक्षा देतो. असे म्हणून शंकराने त्याचे शीर उडवीले .आता नुसतेच धड रहील. इतक्यांत पार्वती बाहेर येते. पहाते तो बाकाचे धड खाली पडलेले. तिला खूप वाईट वाटले. पण माझा मुलगा तू मारलाच म्हणून ती शंकरावर रागवते व नाराज होऊन रडू लागते. शंकराला काय

करावे सुचत नाही. तो पार्वतीला खुप समजावतो. शेवटी गणांना सांगतो की, रानांत जा आणि प्रथम जो प्राणी दिसेल त्याचे शीर कापून घेऊन या. त्याप्रमाणे गण जातात तेंव्हा रानांत त्यांना हत्तीच प्रथम दिसतो म्हणून ते हत्तीचे शीर कापून घेऊन येतात. ते शीर हातात घेऊन त्या बालकाच्या शरीरास जोडतात व प्राण आणतात. पार्वतीला आपला मुलगा जीवंत झाला म्हणून आनंद होतो. ती त्याचे खुप लाड करते. शंकर पार्वतीच्या मांडीवर तो बसतो असा हा गजानन । त्याला माझे वंदन ।



# संध्याछाया

सुषमाआज 'सेवानिवृत्त' होणार म्हणून निरोप समारंभाचा जोरदार कार्यक्रम तिच्या शाळेत विद्यार्थ्यांनी व इतर सहशिक्षकांनी सायंकाळी आयोजित केला होता. सुमारे ३५ वर्षे सुषमाने एक आदर्श शिक्षिका म्हणून काम केले होते. प्रमोशन घेता घेता ती हेडमिस्ट्रेस झाली होती. समाज हेच माझे कुटुंब व शाळेतील मुले हीच माझी मुले अशा कुटुंबाच्या व्यापक कल्पना मनाशी बाळगून व स्वत:चे व्यक्तिमत्त्व उत्तम बनविण्याची स्वत:ची महत्वाकांक्षा यामुळे सुषमाने लग्न केलेच नाही. आईवडीलांची एकुलती एक मुलगी. तिच्या ध्येयापुढे आईवडीलांनी तिच्या कोणत्याच गोष्टीला विरोध केला नाही. परंतु सर्वसामान्य आईवडीलांना मुलीचे लग्न होऊन आपली जबाबदारी पूर्ण केल्याचे बघायचे असते. त्यामुळे त्यांनीही तिचे लग्नासाठी मन वळविले, पण व्यक्तिमत्त्व घडवितांना तिच्या या गोष्टीवर विचार करण्यास वेळ द्यावासा कधी वाटलाच नाही. आई वडील आपल्या आजाराने लवकरच गेले आणि सुषमा खऱ्या अर्थाने एकटी झाली. परंतु शाळेच्या व्यापात, मुलांच्या संगतीत तिला हे एकटेपण कधीच जाणवले नाही. अविरत शाळेच काम करून तिने शाळा खूप पुढे आणली. बरेच आदर्श विद्यार्थी या शाळेतून बाहेर पडले. कोणी डॉक्टर बनून, कोणी इंजिनिअर बनून तर कोणी पोलीस ऑफीसर बनून बाईंच्या पाया पडायला येत, तेंव्हा सुषमाचे मन अभिमानाने भरून येत असे. या विद्यार्थ्यांना दिवसरात्र मेहनत घेऊन तिने तयार केले होते. विद्यार्थ्यांनी पण कोणी गृहीणी तर कोणी उच्चपदावर नोकरी करीत होत्या. काहींच्या जीवनाचे प्रश्न सोडविण्यास सुषमाने मदत केली होती. सासरी गेलेल्या मुलींना योग्य मार्गदर्शन करून त्यांना नवजीवन दिले होते. तर मोडकळीला आलेले संसार सुरळीत मार्गावर आणले होते. शाळेची सर्वांगीण उन्नती झाली ती सुषमाच्या कष्टामुळे व प्रयत्नामुळे ! अशी सर्वगुणी, परोपकारी व आदर्श हेडमिस्ट्रेस

सेवानिवृत्त होणार म्हणून तसे सर्वांनाच वाईट वाटत होते. परंतु सुषमाच्या कार्याचा गौरव करण्याची ही संधी तशी प्रत्येकाला सुखावह वाटत होती. '' बाईंकरता काहीतरी करणे '' ही भावना त्यांत होती त्यामुळे कार्यक्रमाची तयारी जोरदार चालू होती.

कार्यक्रम संध्याकाळी होता, तसा हा कार्यक्रम सुषमाला मनाला जडपणा आणणारा होता. इतके दिवस 'एकटेपणा' तिला कधी जाणवलाच नाही. सूर्य केव्हा उगवत होता व केव्हा मावळत होता कळत नव्हते. परंतु आता सेवानिवृत्त झाल्यानंतर 'आपण एकटे आहोत ' ही कल्पना तिला बेचैन करीत होती. दुपारचे जेवण करून सुषमा पेपर चाळीत पलंगावर आडवी झाली तोच बेल वाजली. बहुधा पोस्टमन असावा. तिने दार उघडले तो पोष्टमनने एकूण सतरा पत्रांचा गठ्ठा तिला दिला. अभिनंदनाचा वर्षाव करणारी ही पत्रे असणार हे तिने ओळखले. कारण निमंत्रण पत्रिका सर्वत्र गेल्या होत्या, सुषमा पत्राने भारावून गेली. कोणते पत्र आधी वाचू असे झाले. प्रत्येक पत्राबरोबर एकेक आठवण ताजी होत होती. कांही सुखद तर कांही दुःखद अशा आठवणीत ती अगदी बुडून गेली होती. सर्वांच्या अभिनंदनाच्या वर्षावाने ओलीचिंब झाली होती. इतक्यात एका पत्राने तिचे मन एकदम वेधून घेतले, कुणाकडून आले आहे बरं ?

दिवाकर देशपांडे, संध्याछाया, श्रीरामपूर. घाईघाईने पत्र उघडले.

**प्रिय सुषमा,**

आदर्श शिक्षिका म्हणून उत्तम कालखंड घालविल्याबद्दल हार्दिक अभिनंदन ! एक प्रेमाची सूचना कराविशी वाटते ती ही की आशा आकांक्षाच्या कोवळ्या किरणातून तू आदर्शांची वाटचाल सुध्दा केलीस ध्येयपूर्तीसाठी रण रण उन्हातून जाऊन तू शाळेचे अविरत काम केलेस आता आयुष्याची संध्याकाळ आमच्या वृद्धाश्रमाचे कार्य करण्यात तू घालवावी अशी इच्छा आहे. विचार करून कळव. येथील वृद्धांना तुझ्यासारख्या यशस्वी जीवन

घालविण्याऱ्या व्यक्तिची गरज आहे. व सोबतीची आवश्यकता आहे. त्यांच्या छायेत तुला पण विसावा मिळेल हार्दिक शुभेच्छा

तुझा
**दिवाकर**

सुषमाने पत्र वाचले. दिवाकरने कॉलेजमधली मैत्री कायम ठेवली म्हणायची ! सुषमाचे मन एकदम तरूण झाले. पत्राच्या आठवणी बरोबर ती एक कॉलेज तरूणी होऊन दिवाकरबरोबर फिरू लागली. बी. ए. फायनल असतांना दिवाकर हा एक हुशार विद्यार्थी म्हणून मित्र या नात्याने तिच्या आयुष्यांत आला. दोघेही हुशार. अभ्यासाबाबत नेहमी दोघांच्या चर्चा चालत व त्यातूनच त्यांची मैत्री वाढत गेली. कौलेज सुटल्यानंतर रोज डोंगराच्या रस्त्याला ती दोघे फिरायला जात असत. संध्याकाळचे ते मनोहर दृष्य दोघांनाही फार फार आवडत असे. संध्याकाळी बराच वेळ ते दोघे त्या दृष्याशी एकरूप होऊन जात असत. बी. ए. चा निकाल लागला दोघेही उत्तमरितीने पास झाले. त्या संध्याकाळी असेच ते या रस्त्याला फिरायला गेले.

''सुषमा, तू पुढे काय करणार आहेस?'' दिवाकरने मोठ्या उत्सुकतेने विचारले.

दिवाकर, तुला तर माहितच आहे की शिक्षिका या पदाचे मला किती आकर्षण आहे. ''जे जे आपणासी ठावे ते दुसऱ्याशी शिकवावे'' हे करीत करीत मला यापुढे माझे आयुष्य घालवायचे आहे. ''मनात आदर्श शिक्षिकेची एक प्रतिमा मी करून ठेवली आहे.'' दिवाकर तू काय करणार आहेस ?

'' माझ्यापुढे फारसा मोठा प्रश्न आहे. सुषमा माझी सर्व भावंडे लहान लहान आहेत. वडिल कारकून. घरची गरीबी तेव्हा मला तर मिळेल ती नोकरी करणेच भाग आहे. ती करता करता पुढे शिकेन हवंतर.

'' दिवाकर आपण कोठेही गेलो ना तरी आपली ही मैत्री कायम ठेवायची हं '' या संध्याछाया आपल्या मैत्रीची साक्ष नेहमी देत रहातील. कारण आपण बहुधा संध्याकाळीच भेटत असू होय ना ?''

'' हो तर '' सुषमा खरं सांगू तुला. तू मैत्रीण म्हणून तर मला आवडतेस परंतु .... कसं सांगू तू तू

''अरे बोल ना असा अडखळतोस कां ? इतक्या दिवसाचा आपला सहवास. मग एवढा परकेपणा कसला ?''

''छे तसं नाही ग सुषमा पण .... जाऊ दे पुन्हा केव्हातरी सांगेन ''

दिवाकर, अरे केव्हा भेट होणार ? उद्या तर मला मामांकडे जायचे आहे. पास झाल्याची बातमी त्यांना सांगायला नको कां ?''

''हो तर मग तू जा ना मी केंव्हातरी बोलेन प्लीज'' ठिक आहे. तू मनमोकळा कधी राहिलाच नाहीस. पण दिवाकर मैत्री टिकविण्याचे आश्वासन मात्र विसरू नकोस हं !

छे छे अगदी या मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून सांगतो की उगवणारी सकाळ ही आपल्या दोघांकरिता वेगळीच राहील.'' त्यावेळी सुषमाला किंचित लाजल्यासरखे झाले आणि त्यातच तिने दिवाकरचा निरोप घेतला होता. मनांत कांहीतरी ठेवून ! पुढे दिवाकर नोकरीनिमित्त दूर निघून गेला व सुषमानेही शिक्षिकेची नोकरी धरली व त्यांत ती रमून गेली पुढे तिचे आईवडील अल्पशा आजाराने गेले व ती अगदी एकटी झाली. दिवाकरची चौकशी करण्याचा तिने प्रयत्न केला पण तो खूप लांब नोकरीनिमित्त निघून गेल्याचे व त्याचे लग्नही झाल्याचे तिला कळले. पत्राने तिने त्याचे अभिनंदन पण केले होते. पण दिवाकरने मात्र तिला कधीच पत्र पाठविले नव्हते. ती मात्र दिवाकरची चौकशी भेटेल त्याच्याजवळ करीत असे व स्वत:बद्दलही त्याला कळवित असे. दिवाकर संसारी बनला. बायको मुले यांत रमून गेला . सुषमा पण शाळेच्या कामात एका विशिष्ट ध्येयाने बंदिस्त झाली. मधल्या काळांत एकमेकांची चौकशी करण्यास फुरसदच मिळाली नव्हती. पण ती सेवानिवृत्त होण्यापूर्वीच एका शिक्षकाने तिला सांगितले की त्याचेच गावी दिवाकर असतो. बायकोचे निधन झाले. मुले वडीलांशी नीट वागत नाहीत म्हणून त्याने रिटायर्ड झाल्यानंतर एक 'वृद्धाश्रम' काढला आहे. आणि त्याचे नांव '' संध्याछाया''

ठेवले आहे. एवढी संस्था काढून दिवाकरने आपल्याला कळवले कसे नाही याचे तिला आश्चर्य वाटले होते व थोडासा रागही आला होता. पण मैत्री टिकवायची होती नां ? प्रतिज्ञा निभवायची होती व दिवाकरची एकूण परिस्थिती कळल्यापासून बेचैन होती. सर्व नातेवाईक, पोटची मुले असून दिवाकर शेवटी वृद्धाश्रमांत एकटाच राहिला. त्याला भेटण्याची तिची खूप इच्छा होती व सेवानिवृत्त झाल्यावर ती त्याच्याकडे जाणार पण होती तो आज त्याचेच पत्र तिच्या हातात पडले. दिवाकर आपल्याल विसरला नाही या एकाच कल्पनेने ती भारावून गेली.

सुषमा तंद्रीतून जागी झाली आणि एकदम तिने निर्णय घेऊन टाकला की, आपले उर्वरित आयुष्य दिवाकरच्या वृद्धाश्रमांत घालवायचे . आजपर्यंत विद्यार्थ्यांना पुढे नेण्यांत आयुष्य खर्च केले आता कुणाबरोबर राहून त्यांच्या संगतीत वेळ घालवायचा. वृद्धांना भिवविणाऱ्या संध्याछाया या किती रम्य असू शकतात हे त्यांच्या सावलीत राहून त्यांना पटवून द्यायचे.

हा निर्णय सुषमाने घेतला आणि तिला एकदम हुरूप वाटू लागला. सेवा निवृत्त होणार या कल्पनेने मनावर आलेले दडपण व निराशा एकाएकी नाहीशी झाली. घड्याळांत पाहिले. कार्यक्रम सुरू होण्यास अवघा अर्धातास बाकी होता ती तयारीला लागली. सर्व पत्रांचा गठ्ठा तिने उचलून ठेवला तोंडावर थंड पाण्याचा शिडकावा घेतला, मोकळा वारा येण्याकरिता खिडकी उघडली. सूर्य उतरणीला लागला होता संध्याछाया पसरू लागल्या होत्या त्यातील छटा तिला आव्हान करीत होत्या.

# ले ख धा रा

# आदरणीय मावशी

भगिनींनो, वंदनीय मावशी केळकर यांच्या स्मृतीदिनानिमित्त चार गोष्टी आपणाशी बोलाव्या, अशी इच्छा आपल्या येथील राष्ट्रसेविकेच्या पदाधिकारी मग जवळ बोलून दाखविले व हा स्मृतिदिन 'संकल्पदिन' म्हणून आज साजरा करतो. असेही त्यांनी सांगितले. आजपर्यंत शिक्षकदिन, पालकदिन, बालकदिन स्वातंत्र्यदिन वगैरे माहित होते. परंतु हा स्मृतीदिन संकल्पदिन असे कळल्यावर व मावशी व त्यांच्या कार्याबद्दलची उत्सुकता एकदमच वाढली आणि त्यांनीच स्थापन केलेल्या राष्ट्रसेविका समितीच्या सेविकांना भेटण्याची तीव्र इच्छा झाली व ह्या भेटीतूनच झालेले हे चिंतन.

संकल्प म्हणजे एखादे कार्य करण्याचा मनाचा निर्धार व पूर्णत्वाला जाण्याचे प्रयत्न आपण कोणतेही देवाचे व्रत अथवा पूजा करतो तेंव्हा गुरुजी आपणाला आता संकल्प करणे आहे" असे म्हणतात . "पूजनंच् करिश्ये" अर्थात सोडा पाणी या गोष्टींना आपण परिचित आहो पण व मावशींनी कोणता संकल्प केला, ते कार्य सिद्धीला जाण्याचे प्रयत्न त्याचे परिणाम व पूर्णता कशी हे विचार मनात येतात.

वास्तविक पहाता मावशींच्या कार्याचे स्वरुप आपणा सर्व सेविकांना माहित आहे. ते वेगळे सांगण्याचा काही भाग नाही परंतु कशाचा संकल्प एवढेच पाहणे जरुर आहे. तसेच या दिनानिमित्त आपणही त्यांचे कार्य पुढे चालविण्याचा संकल्प करणे हे आपले कर्तव्य ठरते.

मावशींच्या वेळच्या स्त्रीची सामाजिक परीस्थिती कडे बघता स्वातंत्र्यपूर्व काळात ही स्थिती अस्थिर होती. बंधनकारक रितीरिवाज, विशेषत: स्त्रीची असुरक्षितता, स्त्रीयांवर अत्याचार, अबला म्हणून स्वातंत्र्य नाही. मावशींना वैधव्य प्राप्त झाले. त्यामुळे बहुधा हे वैफल्य जास्तच जाणवले असेल. त्यावेळच्या विधवा स्त्रियांना रितीरीवाजाचे बंधनेही फार होती या

एकूणच वस्तुस्थितीचा मावशींच्या मनावर परिणाम झाला असावा आणि समाजातील, राष्ट्रातील सर्व स्त्रीयांची शक्ती अशी खितपत पडून दुर्बल होण्याची चिन्हे मावशींना दिसु लागली असणार. गाडीच्या दोन चाकांपैकी एक चाक असे दुर्बल, अज्ञान अशिक्षित असेल तर राष्ट्राचा गाडा चालणार तरी कसा ? या सर्व गोष्टींमुळे स्त्रीयांकरीता काहीतरी करणे त्यांच्यातील सुप्तशक्ती जागृत करणे, त्यांना स्वतःची ओळख देणे हे कार्य करण्याची गरज त्यांना वाटली व याच कल्पनेने त्या भारावून गेल्या. व स्त्री संघटना झाल्याशिवाय व स्त्रीया एकत्र आल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. असा निश्चय व असा संकल्प सोडून त्यांनी १९३६ मध्ये राष्ट्रसेविका या संस्थेची स्थापना केली व अनेक योजना हातात घेतल्या देशभर हिंडून कार्याचा प्रचार केला. रामायण, महाभारतासाठी कथांचे महत्त्व कार्यातील रहस्य भारताच्या गौरवशाली इतिहासांत स्त्रीयांचा सहभाग प्रेरणा स्वरुप आहे संस्कृतीचे रक्षण धार्मिक, नैतिक, राजनैतिक जबाबदाऱ्या सक्षमतेने व तेजस्वीपणे त्यांनी पार पाडल्या आहे. जसे जिजाबाईचे मातृत्व, अहिल्याबाई होळकर यांचे कर्तृत्व, लक्ष्मीबाईचे नेतृत्व याशिवाय सरोजिनी नायडू के. लक्ष्मी या आहेतच शैक्षणिक क्षेत्रांत सावित्रीबाई फुले यांचे योगदान आहे.

भारतीय स्त्रीयांचे प्रवर्तन वर्तमान काळांत करण्यात पुरुषांचा सहभाग आहे. पण पुरुषांच्या सामाजिक दृष्टीकोनातून हे काम त्यांनी केले. कायद्यात वारसाहक्क महिला विद्यापीठे मंत्री मंडळात स्त्री अगदी राष्ट्रपतीपर्यंत परंतु स्त्रीयांचे प्रश्न फक्त या दृष्टिकोनातून पूर्णपणे सुटणार नाहीत. स्त्री किंवा देशाचा नागरिक हा फक्त सुशिक्षीत असून चालत नाही तर सुसंस्कृत पण असायला हवा आणि नेमके तेच सुसंस्कृत बनविण्याचे काम स्त्री "माता" या भूमिकेतुन प्रथम करते. माता एक इंजिनिअर, डॉक्टर तर समाजाला देते पण सुसंस्कृत इंजिनिअर अथवा डॉक्टर देते का हा प्रश्न आहे म्हणून स्त्री समाज एकत्र करुन संस्काराचे धडे मुलामुलींना द्यावे यावर मावशींनी जोर दिला ती घर चालविते म्हणजे नेतृत्त्व व कर्तृत्व

तिच्यात आहेच ते वाढविण्याची संधी तिला मिळायला पाहिजे याप्रमाणे एक परिपूर्ण स्त्री संघटना विशाल केली व जागृत स्त्री निर्माण केली. मावशींचा संकल्प पूर्ण झाल्याचे समाधान निश्चितच त्यांना झाल असणार.

स्त्री समाजाच्या बिकट प्रसंगांत मावशी अगदी ईश्वर अवतारासारख्या धावून आल्या सत्य संकल्पाचा । दाता नारायण । त्यांना ही बुध्दी नारायणानेच दिली असावी.

**धर्म स्थापनेचे नर । ते इश्वराचे अवतार ।**
**झाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ।**



# संस्कार केंद्र

मनुष्य डोळ्याने जे पाहतो, इतरांचे जे ऐकतो आणि तो जे वाचतो यातून त्याच्या मनावर काही संस्कार घडत असतात. यातून तो आपल्या वागण्यांत बोलण्यात बदल करीत असतो. त्या बदलातूनच त्यांचे जीवन हळूहळू घडत असते. यातूनच त्याचे कुटुंब, कुटुंबातून समाज आणि समाजातून देश व त्यातूनच विश्व घडत असते. संस्कार घडविणारी पहिली व्यक्ती आई असते. मुलगा लहान असतांना पाहून आणि ऐकून त्यांचे बालमन नवीन आकार घेत असते. सभोवताली असणाऱ्या व्यक्तीचे बोलणे आणि त्यांच्या कृती तो बारकाईने पाहतो. यातूनच त्याच्या नैतिकतेच्या आणि अनैतिकतेच्या कल्पना तयार होतात. आईवडिलांच्या बोलण्यांत व कृतीत फरक असल्यास तो त्याच्या नजरेस ते आणून देतो. गरीब आईवडील त्यांच्या मुलांना त्याला समजविण्यासाठी खोटी आश्वासने देत असतात. हाच मुलगा पुढे मोठा झाल्यावर मंत्री होऊन खोटी आश्वासने देवून फसवितो. मुलांपासून सत्यस्थिती लपविल्यास परिणाम उलट होत असतो. त्याचे चालते-बोलते उदा. म्हणजे गौतम बुध्द होय. जगातील दु:ख, दारिद्र्य हे जेंव्हा बुध्दांच्या लक्षात आले त्यावेळी तो महाल सोडून चालते झालो. समाज आणि देश घडविण्यासाठी निर्भयता, सहकारीतेची भावना, एकमेंकाविषयी बंधूभाव व प्रेम यांचे ठसे बालमनावर उमटत असतात.

बालकांवर शुध्द व पवित्र संस्कार करणे, त्याला लोकोपयोगी, कर्मतत्पर, स्वकर्तव्यनिष्ठ आणि मातृभूमीची तसेच राष्ट्राची सेवा करण्यासाठी योग्य बनविणे आवश्यक आहे.

खुप प्रात:काळी उठणे, भगवान नाम स्मरण किंवा स्तोत्र पठन करणे यामुळे संस्कार होतात. स्तोत्रपठण व भगवंताची स्तुती प्रात:काळी आवश्यक आहे. भगवंताच्या स्तुतीपर असे शब्द उच्चरल्यामुळे हृदयात

सरळ भाव निर्माण होतात. घरामध्ये भक्तीरसपूर्ण गाथांचे गान केल्याने शुध्दतेचे व पवित्रतेचे वातावरण निर्माण होते. बालकांना अशाप्रकारच्या वातावरणात वाढविणे आवश्यक आहे. बालवेश घातल्यावर सुध्दा त्यांचे ठिकाणी स्वत्वाचा बोध होतो आणि सद्‌गुणांचा प्रादुर्भाव होतो. संस्कारातून कर्तुत्ववान, ध्यैर्यवान, धर्म व देश यांचे सेवा करण्यास तत्पर मुलगा संस्कारातूनच तयार होऊ शकतो. शिशुसंघ चालवून वेळ गोष्टी, कथा व गीत यांच्या माध्यमातून संस्कार घडविल्या जाऊ शकतात.

उपेक्षीत कुटुंबातील संततीवर सर्व प्रकारचे चांगले संस्कार करणाचा पण केला पाहिले. उपेक्षित, गिरीजन, वनवासी, झोपडपट्टी निवासी यांना धर्माचे व कर्मविज्ञान नसते. यांचेकरीता शिक्षणाची आवश्यकता असते. उदा. बालवाडी, शिशुसंघ, श्रवणमंडळे, आश्रमशाळा, छात्रावास यांच्या माध्यमातून हे आवश्यक ते संस्कार घडविल्या जाऊ शकतात.

या संस्थेच्या अध्यापकाकरीता प्रशिक्षण वर्गाची आवश्यकता अपरिहार्य आहे. यातून संस्काराची एकवाक्यता, एकात्मता शक्य होईल.

हिंदू जीवनाचे हे वैशिष्ट्य आहे की, हिंदू जड व चैतन्य सर्वातच परमेश्वराचा निवास मानतो. संस्काराने व्यक्तीचे मन, बुध्दी व शरीर प्रशिक्षीत होत असते. सामाजिक कार्य सहकार्याने करण्याची सवय संस्काराने होऊ शकते. सुसंस्कारित समाजातच मानवाचे कल्याण आहे. खेळण्याच्या माध्यमातून आणि संस्कारकेंद्रात होणाऱ्या व्यायाम, योगादि कार्यक्रमातून समाजाकरिता आवश्यक असलेला गुण म्हणजे अंत:करणातून आवश्यक असलेला अभय असा गुण निर्माण होता. संस्कार केंद्रातील नियमित अशा प्रार्थनातून आपल्या जीवनामध्ये दर्शन व स्मरण होत असते.

संस्कार केंद्रातून मुलांनी स्वच्छ व नीटनेटके कसे रहावे, घाणेरडे राहू नये, केस ही अस्ताव्यस्त ठेवू नये आदि व्यवस्था करणे आवश्यक आहे. वास्तविक इतिहासाचे, संस्कृतीचे, सामाजिक मानचिन्हाचे चित्रमय दर्शन संस्कार केंद्रातून प्रसारीत होईल.

# वनवासी क्षेत्र

बहुतांश समाज दारिद्यास खितपत पडलेला आहे. वनवासी क्षेत्रात बहुकडे दैन्य पसरले आहे. खायला अन्न नाही. नेसावयाला वस्त्र नाही. रहायला घर नाही. शिक्षण नाही. औषधोपचार नाही. अशा अवस्थेत लोक कसेबसे जीवन कंठित आहेत. कार्यकर्त्यांनी लहानलहान खेडी, वनवासी क्षेत्र, गिरीकंदरे असे सर्वत्र फिरत राहणे आवश्यक आहे. त्या भागात फिरतांना आपल्याला हेच आढळून येते की, जीवनाच्या प्राथमिक गरजाही ज्यांच्या पूर्ण होऊ शकत नाही. असे कितीतरी आपले बंधू हालअपेष्टांत जीवन कंठित आहेत. समाजाची व्यवस्था अगदी जवळून पाहणे कार्यकर्त्यांना आवश्यक आहे. दारिद्याच्या भस्मासूराचेच चोहोकडे थैमान सुरु आहे आणि दारिद्रय दबा धरुन बसलेले आहे.

वनग्रामात जाऊन कार्यकर्त्यांनी भजन, किर्तन आयोजित करावेत. खेड्यातील लोक मोठ्या भक्तिभावाने अशा प्रकारच्या कार्यक्रमासाठी एकत्रित येतात. भजन वगैरे कार्यक्रम संपल्यावर तेथील लोकांच्या दैनंदिन जीवनातील अडीअडचणी समजून घेण्यासाठी रात्रभर सेवेत राहावे.

वनवासी क्षेत्रातील चालीरिती, रुढी, परंपरा यांचा ही विचार अवश्य व्हायला पाहिजे. अंधश्रध्दा त्यांचे ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आढळून येईल. मानवा विषयीचे पशुवत विचार करणे आणि तद्नुषंगाने आहार करणे असे गुण त्यांचे ठिकाणी दिसून येतात. उदा. गाय ही माता आहे. इतके सर्वश्रेष्ठ स्थान गाईचे ठिकाणी असल्यानंतर हिंदु समाजातील काही लोक गोमांस भक्षण करतात. हे उदाहरण त्यांचेकडे असणारी विचारा आचाराची दिशा कशी असेल हे पडताळून पाहण्याकरता पुरेसे आहे.

वनवासी क्षेत्र आज भयग्रस्त, रोगग्रस्त, विचारग्रस्त झाले दिसून येतात. या समाज व्यसनमुक्त, रोगमुक्त, कर्जमुक्त, भयमुक्त, करणे हे आज आपले प्रथम व श्रेष्ठ असे कर्तव्य मानल्या जाईल.

# लोकन्यायालय - एक दिवस

अकोट येथे दि. २४ मार्च १९९० रोजी लोकन्यायालय हा कार्यक्रम यशस्वी रितीने पार पडला तेल्हारा व आकोट येथील न्यायाधीश, वकील, कारकून त्यांनी अति परिश्रम घेवून लोकन्यायालय ही संकल्पना मूर्त स्वरुपात आणून त्यामागील हेतू पूर्ण करुन दाखविला आहे.

ह्या लोकन्यायालयामधील एका पॅनेलवर सभासद म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली, मिळाली म्हणण्यापेक्षा येथील बार असोसिएशनच्या प्रेसीडेंटने व सदस्यांनी ती मला दिली असे म्हणणे योग्य राहील प्रेसिडेंट व सदस्य एका सायंकाळी माझ्याकडे पॅनेल सदस्य संमतीपत्र घेवून आले सही करा म्हणून त्यांनी मला विनंती केली. प्रथम हे सर्व काय व सही करु किंवा नाही ह्या गोंधळलेल्या स्थितीत मी यजमानांना काय करु म्हणून प्रश्नार्थक मुद्रेने त्यांच्याकडे पाहिले. पण प्रेसिडेंट ने मात्र "तुम्हालाच हे स्वतःला ठरवायचे आहे असे म्हटल्यावर ताबडतोबच मी संमती पत्रावर सही करुन दिली. "एक नवीन अनुभव" एवढीच कल्पना त्यावेळी माझ्या मनात होती. पॅनेल सदस्य म्हणून संमती पत्रकावर सही तर केली पण प्रत्यक्ष २४ मार्च ला लोकन्यायालयात आपल्याला काय काम करावे लागणार ह्याबद्दल नक्की कल्पना येईना पण माझे पती वकील असल्यामुळे त्यांनी मला ह्या कामाची पूर्ण कल्पना दिली. गेली २/३ वर्ष लोकन्यायालय ह्याबद्दल च्या चर्चा पेपरमधूनही प्रसिध्द होत होत्या येथील न्याय मंदिराचे उद्‌घाटन १९८३ साली मा. न्या. चांदूरकर (मुंबई हायकोर्ट) ह्यांचे हस्ते झाले तेंव्हा त्यांनीही आपल्या भाषणात हा प्रश्न हाताळला होता हे माझ्या चांगलेच लक्षात होते. अनेकांच्या समस्या सुटून त्यांना होणाऱ्या आनंदात आपला सहभाग राहील ह्या गोड कल्पनेने मन हरवून गेले.

२४ मार्च ! आज सकाळपासूनच आकोट न्यायालयासमोर लोकांची धावपळ सुरु होती. खेड्यातील पक्षकार लोक, न्यायाधीश, वकील, कारकून, आपआपल्या कामात व्यस्त होते. कारण ९ वाजता "लोकन्यायालय"

ह्या कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ होता कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात चांगली झाली की, ते काम शेवटपर्यंत चांगलेच होते. उद्घाटन समारंभ उत्तम रितीने पार पडला.

पॅनेल सदस्य म्हणून आम्ही ठीक १०.०० वाजता न्यायालयात हजर झालो सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले होते. प्रत्येकाच्या मागे जणू 'लगीनघाई' होती. खेड्यातून पक्षकार स्त्री-पुरुष काही ठिकाणी न्याहारी घेत होते. तर काही आपल्या वकीलाशी बोलतांना दिसत होते. कारकुन लोक निकालात काढावयाच्या केसेसे हातात घेऊन आपआपल्या पक्षाकारांना काहीतरी समजावून सांगत होते. न्यायाधीश सर्व पॅनेलची व्यवस्था स्वत: जातीने पहात होते. बऱ्याच वर्षापासून अडकून पडलेल्या पक्षकाराच्या समस्या आज सुटणार होत्या. मनात विचार आला आज ह्या खेड्यातील पक्षकारामधून, किती जणांचे मोडलेले संसार जुळणार होते. किती स्त्रियांना आज खावटी मिळून अभिमानाने व आत्मविश्वासाने जगण्याचा अधिकार मिळणार होता. शेताच्या भांडणावरुन वैर धरणाऱ्या दोन पार्टी आज हातात हात घालून समाधानाने घरी जाणार होते. पैशाच्या देवघेवीतून कित्येकजण आज मोकळे होवून सुखाने झोप घेणार होते. त्या असंख्य लोकांच्या समुदायाकडे पाहून वाटले की पॅनेल सदस्य म्हणून आज आपण यांच्या जवळ आलो व ह्यांच्या सुखदु:खात अंशत:का होईना पण आपण भाग घेणार ह्या कल्पनेने मन भरुन गेले.

आमच्या पॅनेलवर ॲड. सौ. देशपांडे अकोला व सौ. सोनखासकर ह्या सदस्या म्हणून होत्या. आमची खोली आम्हाला उघडून देण्यात आली आम्हाला एक एक बॅज देण्यात आला. दोन तीन कारकून लोक, व केसेसचे गट्ठे अशी पूर्व तयारी झाली व कामकाजाला सुरवात झाली अनुभवी कारकुन श्री. जैन व ॲड. देशपांडे ह्यांनी भराभर केसेस पाहून पक्षकार, कारकून, वकील ह्यांचे पुकारे करण्यास सांगितले.

आयुष्यात माणसाला तडजोड करावीच लागते मग ते संसारातील असो अथवा कोर्ट कचेरीतील संघर्ष असोत. अशी तडजोड आज आम्ही प्रत्यक्ष पहिली. आज बऱ्याच वर्षापासून घिघळत व अडकून पडलेल्या

पक्षकारांच्या समस्या आज मिटणार व त्याही एका शब्दाच्या आधाराने." आपसात करणे". भांडण करतांना तसाही माणूस थोडा अविचारानेच वागत असतो. आपसात करणे ह्या गोष्टीत समजूतदारपणा व योग्य विचार त्यांचे ठिकाणी आलेला असतो. व तसे पाहिले तर ही पायरी माणसाच्या आयुष्यात प्रगतीची पायरी ठरते.

अनेक प्रश्न समोर येत होते. सर्वांची अंतरंगे जाणून घेण्याचा प्रयत्न चालू होता. काही जोडपी आज बरेच वर्षाचे भांडण मिटवून नवा संसार थाटण्याच्या उमेदीने उभे होते. "तुम्ही आता नांदाल कां ?" हा प्रश्न विचारल्यावर त्या स्त्रीच्या मुखावरील लज्जेचे भाव ती लपवू शकली नाही. प्रश्नाचे उत्तर मूक होते. कागद पत्रावर सह्या करुन ती जोडपी हसत निघून गेली. काही स्त्रीयांना खात्री मिळाली आत्मविश्वास व मानाने जगण्याची त्यांच्या सही करण्याच्या पध्दतीवरुन दिसत होती शेताच्या मोजणीचे शेतात नाली खोदण्याचे ह्याबाबतीत एकमेकांवर आक्रमण केलेल्या केसेसमध्ये सुध्दा "ह्यांचे म्हणणे आम्हाला कबूल आहे" अशी परस्परांची बोलणी कानावर पडले. जो तो पक्षकार आपल्या वकीलाला घेऊन व आपले कागदपत्र आणून 'आपसात' करण्याच्या गडबडीत आतबाहेर करीत होते. सर्वांच्या तोंडावर एकप्रकारचे समाधान होते. दहा-दहा लोकांची पार्टी, एकाच वेळी उपस्थित राहून समस्या सोडवित होती. ते कौतुकास्पद होते थकलेली वीज बिले, असणाऱ्यांना पण थोडा आशेचा किरण मिळाला.

मध्यांतरात जेवणाची सुटी होती स्वादीष्ट जेवण व उत्तम व्यवस्था ह्यामुळे पुढच्या कामाला आणखी जोर आला. काही पक्षकार ह्यावेळेपर्यंत हजर झाले होते. त्यांची कामे दुपारी करण्यात आली काही लोकांच्या गैरहजरीमुळे काही कामे स्थगितच ठेवावी लागली.

सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत लोकन्यायालय चालु होते. सर्व खेड्यातील लोकांच्या तसेच संबंधीत वकील, न्यायाधीश, कारकून पॅनेल अध्यक्ष सौ. देशपांडे व सदस्य सौ. सोनखासकर ह्या सर्वांच्या सहवासात वेळ मजेत गेला. सौ. देशपांडे ह्या ॲडव्होकेट असल्याने मुख्य काम त्या

पहात होत्या त्यामुळे मला निरीक्षण करण्यास भरपूर वेळ मिळाला.

मनात प्रश्न आला, उशीरा का होईना पण आमची खेड्यातील जनता जागृत होते आहे. समजूतदारपणे व योग्य विचारांची दिशा त्यांना मिळत आहे. पण अजूनही सही ऐवजी अंगठा लावतांना काही स्त्रीयांना, विशेषत: तरुण स्त्रीयांना बधितले आणि मन थोडे गंभीर झाले भारताला स्वातंत्र्य मिळाले पण स्त्री सही करु शकत नाही. अजूनही ती स्वत:च्या व कुटुंबाच्या आर्थिक समस्येत पिचून गेली आहे. टी. व्ही. रेडीओ ह्यामुळे ती जागृत झाली आहे. पण लिहणे वाचणे ह्या विषयक कार्याला ती वंचितच आहे. १९९० साल हे सरकारने 'साक्षरतेचे' वर्ष जाहिर केले हे बरेच झाले हे त्यादिवशी प्रकर्षाने जाणवले.

संसारात पुष्कळश्या घटनामध्ये आपण विवेकाने तडजोड करतो. कोर्ट कचेरीत न्यायदेवता डोळ्याला पट्टी बांधून प्रांजळपणे न्याय मिळवून देते परंतू काही वेळा तांत्रिक हरकती मुळे व उद्‌भवणाऱ्या अडचणीमुळे न्यायालयातील प्रकरणे चिघळतात ह्या गोष्टीमुळे न्यायदानात विलंब होवून लोकशाही वरील विश्वास ढळतो. लोकशाहीवरील हा विश्वास ढळू नये. व लोकशाही घटनेच्या चौकटीत त्वरित खचीत न्यायदानाची हमी दिलेली असल्यामुळेच सध्याच्या न्यायव्यवस्थेला पूरक अशी लोकन्यायालयाची संकल्पना पुढे आली तांत्रिक अडचणी बाजूला ठेवून समन्वयाने व समजुतदारीने न्यायदान सुलभ व त्वरित होवू शकते. म्हणून गावातील प्रतिष्ठीत सामाजिक कार्यकर्ते जीवनाचा अनुभव असलेले बहुश्रुत सदस्य नेमून त्यांनी अशा प्रकरणात तडजोड घडवून आणल्यास, प्रकरणे त्वरीत निकालात निघून उभय पक्षांना समाधान मिळेल अशा रितीने लोकन्यायालय सध्याच्या न्यायव्यवस्थेला पूरक ठरेल अशी ही संकल्पना आहे.

पॅनेल सदस्य म्हणून एक दिवस मी अगदी निराळ्या परंतु जिव्हाळ्याच्या वातावरणात घालविला. अगदी नवीन व मनात चिरकाल स्मृती ठेवणारा अनुभव.

# महिला दिन

आपल्या संस्कृती व तत्वज्ञानामधे स्त्री ही आदिमाया जगदंबेचे रुपात मनाली आहे. भगवंताचे सृष्टीक्रम चालू रहाण्याच्या कार्याची मोठी जबाबदारी देवाने स्त्रीवर सोपवली आहे म्हणून "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवत:"। असे संस्कृतामध्ये सुभाषित आहे. "या देवी सर्व भुतेषू मातृरुपेण संस्थिता । नमस्तस्यै नमस्तसै नमस्तसै नमोनम:।। या देवि सर्व भुतेषू शक्तिरुपेण संस्थितां । असे पुढे आळवले आहे.

जेंव्हा जेंव्हा देव संकटात सापडले व मानवतेला धोका निर्माण झाला तेंव्हा दरवेळी जगदंबा मातेला सर्व शरण गेले व तेंव्हा जगदंबेने काली माय, महाकाली रुपाने असुरांचा नाश केला आहे. आपल्या संस्कृती मध्ये लोप मुद्रा गार्गी, मैत्रेयी या महान विदूषी होवून गेल्या अरुंधतीने तर सप्तर्षी मध्ये स्थान मिळवले आहे. अशी उदाहरणे आहेत.

या पुरुष प्रधान जगांत अहील्या सिता दौपदी यांची उदाहरणे आहेत. इंद्राच्या फसवे गिरीने कपटाने फसवलेल्या अहील्येला मात्र शिळा होऊन रहावे लागले. तिचा उध्दारही श्रीरामाने केला. सितेबद्दल तर सर्वच जाणतात. कन्यास्नुषा / नृपती / प्रत्यक्ष राम भर्ता / रानावनात राहीली. पांडवाची पत्नी भारतवर्षाची सम्राज्ञी द्रौपदी धर्मराज युधिष्ठीराने एखाद्या निर्जीव वस्तु सारखी जुगारावर लावली अशी स्त्रीयांची दैना झाली आहे. "न स्त्री स्वातंत्र्य अर्हती " चा विपरीत अर्थ लावल्या गेला व "शुद्रढोल पशु और नारी । यह ताडणके अधिकारी । ही निती चालू राहीली." बैल टोचावा तशी बायको झोडपावी " या म्हणीप्रमाणे स्त्रिला जनावरासारखे हिन दिन लेखण्यात पुरुषार्थ सामावल्या गेल्या याही परीस्थितीत पुण्यश्लोक अहिल्याबाई झाशीची राणी, राणी दुर्गावती व अलीकडच्या काळात सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडीत, इंदीरा गांधी, डॉ. आनंदी गोपाळ, सावित्रीबाई या सारखी

चरीत्रे होवून गेली.

महीला दिन ही संकल्पना आपल्याकडे पश्चिमेकडून परदेशातून आली आहे. महीला दिनाची सुरुवात सुमारे दीडशे वर्षापूर्वी झाली. महीला दिनाची पार्श्वभुमी अशी ८ मार्च १८५७ रोजी न्युयार्क येथे एका कापड कारखान्यात काम करणाऱ्या महीलांनी निदर्शने केली व त्यांनी अत्यल्प वेतन काम करणाच्या जागेची निकृष्टता याबाबतीत आवाज उठवला त्याचेवर हल्ला झाला. व त्यांना हुसकून लावण्यात आले.

दोन वर्षांनी पुन्हा मार्च महीन्यात त्या महीलांनी पहीली कामगार संघटना स्थापन केली. व पुढे वेतन आणि बाल कामगारांचा प्रश्न धसाला लावला कामाचे तास कमी करावे व मतदानाचा अधिकार याची मागणी केली. अशा मागण्या करीता दि. ८-०३-१९०८ रोजी मोर्चा काढला. त्यात हे प्रतिक वापरले होते. सोशॅलिस्ट पार्टी ऑफ अमेरिकाने फेब्रुवारीचा शेवटचा दिवस महीला दिन पाळला जावा असे ठरवले. व १९०९ मध्ये २३ फेब्रुवारी रोजी पहीला महीला दिन साजरा झाला व तो १९१३ पावेतो क्रम सुरु राहिला.

१९१० मध्ये डेन्मार्क मधे जगातील सोशॅलीस्ट संघटना परीषद भरली व त्यात आंतरराष्ट्रीय महीला दिनाची संकल्पना जन्माला आली त्यात अमेरीकेतील कापड उद्योग, काम करणाऱ्या महीलांचे मानवाधिकाराचा व मताधिकारांचा नाराबुलंद झाला. पण ८ मार्च ही तारीख त्यावेळी निश्चित झाली नव्हती १९११ मध्ये ऑस्ट्रीया डेन्मार्क स्वित्झर्लंड मधे आंतरराष्ट्रीय महीला दिन १९ मार्च रोजी ठरविण्यात आला व मताधिकार व पदावर आसीन होण्याचा हक्क मागण्यात आला कामाचे ठिकाणी महीला व पुरुष असा भेदभाव करण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली.

दि. २५ मार्च रोजी न्युयार्क येथे ट्रँगल शर्ट वेस्ट कंपनीत आग लागली ट्रॅजीक ट्रँगल म्हणून ही घटना ओळखली जाते त्यात १४० मुलीचा जळून मृत्यु झाला. महीलांच्या कामगार संघटनानी महीलांच्या सुरक्षेचा प्रश्न उचलून धरला. पहीले महायुध्द सुरु झाले. १९१३ च्या फेब्रुवारीचे शेवटचे

रविवारी रशीयात महीलांनी शांती मोर्चा . १९१७ साली काढला व जगात शांतता नांदावी असे आवाहन केले. पुढे झारने सत्ता सोडल्यावर रशीयाचे हंगामी सरकारने स्त्रियांना मताधिकार बहाल केला तो ऐतिहासिक रविवार दि. २३ फेब्रुवारीला होता रशीयात वापरल्या जाणाऱ्या ज्युलीयन कॅलेंडर नुसार २३ फेब्रुवारी हा दिवस ग्रेगरीयन कॅलेंडर प्रमाणे म्हणजे आज प्रचलीत असलेल्या कॅलेंडर प्रमाणे ८ मार्च होता. दुसऱ्या महायुध्दानंतर संयुक्त राष्ट्र परीषद अस्तित्वात आली आमसभेने १९७५ हे साल आंतराष्ट्रीय महीला वर्ष घोषीत केले. मग जागतीक पातळीवर महीलांच्या परीषदा सुरु झाल्या. १९९५ साली बिजींग मधे चौथी जागतीक परीषद झाली. त्यात महीलांच्या ॲक्शनचा मसुदा जारी करण्यात आला. महीलांची प्रगती व स्त्रीपुरुष व समानता हा मानवाधिकाराचा प्रश्न असून, स्त्री ही माणूस असून तिला पुरुषा बरोबरचा दर्जा मिळावा ही सामाजिक न्यायाची पूर्व अट आहे असे ठरले. ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महीला दिन म्हणून महत्वाचा ठरला.

भारतीय घटनेनुसार स्त्रीपुरुष समानता घटनेतच अंतर्भूत केली होती. भारतात या विषयाची जाणीव राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, धोंडो केशव कर्वे आगरकर बाबासाहेब आंबेडकर यांनी लावली तत्पूर्वी सतीबंदीचा कायदा लॉर्ड बेंटींग यांनी आणला स्त्रियांना खावटी मिळावी म्हणून भारतीय कायद्यात मान्यता मिळाली पुढे शारदा कायदा घटस्फोटाचा अधिकार इ. स्त्री संबंध कायदे अस्तीत्वात आले. मान्यता पावले तरीही घराघरात स्त्रीवर शारीरिक अत्याचार, हुंडाबंदी या सारख्या घटना घडत होत्या. त्याला आळा बसावा म्हणून १९८३ मधे ४९८ अ हे कलम भारतीय दंडसंहीतेत अंतर्भूत करण्यात आले. त्यानुसार पती अगर त्याचे नातेवाईकांनी स्त्रीला क्रुरपणाची वागणूक दिल्याचे सिध्द झाल्यास ३ वर्षे सश्रम कारावासात दंड भरण्याची तरतूद करण्यात आली. याकरता क्रुरतेची व्याख्या प्रथमतः कायद्यात समाविष्ट करण्यात आली. संसारीक क्रौर्य म्हणजे अशी वागणूक की, ज्यामुळे लग्न झाले त्या स्त्री आत्महत्या करण्यास, प्रवृत्त होईल

स्त्रीने अगर तिचे माहेरचे नातेवाईकांनी गैरकायदा मागणी पूर्ण करावी म्हणून तिला मानसिक किंवा शारीरिक छळ होत असेल तर ते वैवाहीक क्रौर्य समजण्यात येईल अशी क्रौर्याची व्याख्या करण्यात आली. गैरकायदा मागणी मधे हुंड्याची रक्कम अगर हुंड्यात अंर्तभाव असणाऱ्या वस्तुचे मागणी करता तिला त्रास देण्यात येत असेल तर ते क्रौर्य ठरेल व त्याबद्दल शासन होईल पुष्कळ वेळा हुंड्याची बोलणीच होत नाहीत पण लग्नाकरता अट लग्न संबंधीत एकदा मागणी लग्ना नंतरही जर केली तर तो हुंड्याचा भाग समजण्यात यावा अशी तरतूद १९९६ साली हुंडा बंधन कायद्यात करण्यात आली.

वरील कारणास्तव एखादे विवाहीत स्त्रीचा छळ होत असेल तर तिला पोलीस स्टेशनात फिर्याद दाखल करता येईल नवरा, सासु, सासरा, नणंद, दिर, भावजय इ. नवऱ्याचे नातेवाईक विषयी दाद मागता येते. सदर गुन्ह्याला कारवाई करुन दखल घेण्याचा व अटक करण्याचा पोलीसांना अधिकार देण्यात आला.

सदर तरतुदीचा गैरवापर होवू नये व सासरच्या मंडळी विरुध्द त्याचा हत्यार म्हणून दुरुपयोग टाळण्याकरीता महीला कक्ष स्थापण्यात आला असून त्यांनी प्राथमिक चौकशी करुन गैरसमज टाळण्याचा प्रयत्न करावा व नाहीच जमल्यास पोलीसाकडे कारवाई करता प्रकरण पाठवावे अशी व्यवस्था आहे.

# दासबोध चिंतनधारा

# समर्थ रामदास स्वामींचा परिचय

बलमित्रांनो समर्थांचे नाव माहित नाही असे कुणीच नाही. त्यांचे तत्वज्ञान, त्यांचे क्रियाशील संतत्त्व हे आपल्या कणा कणा मध्ये भिनलेले आहे. समर्थ रामदास स्वामी यांचा जन्म जांब नावाच्या खेडे गावी शके 1530 चैत्र शुध्द नवमीस मध्यान्ही झाला. त्यांचे नाव नारायण, वडीलांचे नाव सुर्याजीपंत, आईचे नाव राणुबाई व अडनाव ठोसर. समर्थ लहान असतांना त्यांचे वडील मृत्यु पावले त्यामुळे ते अत्यंत अंतर्मुख झाले व ईश्वर दर्शनासाठी तळमळू लागले. त्यांना प्रत्यक्ष रामदर्शन झाले आणि रामचंद्र प्रभूंनी त्यांना मंत्रोपदेश दिला. प्रत्यक्ष श्रीराम प्रभूंनी त्यांना मंत्रदिक्षा देऊन त्यांचे नाव रामदास असे ठेवले. वयाच्या बाराव्या वर्षी लग्नाच्या बोहल्यावर उभे राहुन सावधान हे शाब्द ऐकताच लग्न मंडपातून पळून गेले व नाशिक जवळ गोदावरीच्या काठी टाकळी येथे त्यांनी बारा वर्षे रामोपासना केली. साधनेमध्ये प्रत्यक्ष हनुमंतांने त्यांना साक्षात दर्शन दिले व त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. वयाच्या २४ व्या वर्षी ते तीर्थयात्रेसाठी बाहेर पडले व संपूर्ण भारत भर त्यांनी बारा वर्ष त्यांनी पायी प्रवास केला. शके १५७१ मध्ये समर्थांनी शिवाजी राजांना अनुग्रह दिला जेव्हा १५७७ मध्ये शिवाजीराजांनी आपल्या राज्याची सनद भिक्षा म्हणून सर्मथांच्या झोळीत टाकली तेव्हा सर्मथांनी ती तशीच्या तशी त्यांना परत केली. यातच त्यांचे निस्पृहपण लक्षात येते. त्यांनी बलाची उपासना करण्यासाठी ११ मारोतीची स्थापना करुन ११ मठ निर्माण केले. शके १५८१ मध्ये दासबोधाचे ६ दशक व ४ समास पूर्ण झाले. शके १६०३ मध्ये श्री समर्थांनी माघवद्य नौमीस शनिवारी दुपारी सज्जनगडावर देह ठेवला.

मित्रांनो समर्थांचे गुणविषेश काय सांगावे, सर्मथांची उंची

मध्यम, वर्ण गोरा, सुरेख अंगकांती, कसदार शारीर, पाणीदार डोळे, सरळ नासीका, खणखणीत आवाज, सतेज चेहरा असे एक तेजपुंज्य व्यक्तीमत्व होते. ते सदैव लंगोटी घालत. अंगावर मेखा, लांब दाढी, जटाभार, गळयात जपाची माळ, हातात कुबडी, काखेला झोळी अशा वेशात ते समाजामध्ये हिंडत. ते नेहमी गार पाण्याने अंघोळ करित. त्यांना निसर्गरम्य अरण्यात निर्जन एकांतात राहणे मनापासून आवडे. जय जय रघूवीर समर्थ असे ते शब्द उच्चारीत. समर्थांनी पुष्कळ वाङ्‌मय निर्माण केले त्यात प्रामुख्याने 21 समासी दासबोध करुणाष्टके, रामायणातील सुंदर कांड व युध्दकांड पंचीकरणादी अभंग बारा ओव्या शतके पुर्वारंभ, अंतर्भाव, आत्माराम, चतुर्थमान, पंचमान, मानपंचक, जनस्वभाव गोसावी, पंचसमासी, सप्तसमासी, सगुणध्यान, निगुर्णध्यान, जुनाट पुरुष, षड्‌रिपु निरुपण, पंचीकरण योग, मनाचे श्लोक, श्रीमद दासबोध इतर स्फुट प्रकरणे काही ओवीबध्द पत्रे इत्यादि वाङःमय प्रसिध्द आहे. त्यांच्या सारखा महात्मा हा अतिशय दुर्मिळ असतो.


श्री रामदास स्वामी हे केवळ भक्तीमार्गी संत नव्हते अथवा राजकारणी महंतही नव्हते तर ते समर्थ महंत होते. केवळ भक्तीमार्गी संत किंवा राजकारणी महंत असे समर्थांना म्हणून संकुचीत होईल. दासबोध या ग्रंथावरुन विचार केल्यास समर्थांनी भिन्न भिन्न विषयावर बोध दिला आहे. व त्यातून "आधी केले मग सांगीतले" अशा प्रकारची आत्म प्रचितीचा त्यांचा अनुभव आहे. संपूर्ण दासबोध वाचन आपले झाले नसले तरी जे स्वाध्याय वाचनात आले त्यावरुन प्रपंच सांभाळून परमार्थाकडे सामान्य माणसाने जाण्याकरिता तो किती गुणांनी युक्त असावयास पाहीजे हया करिता त्यांनी दिलेले ज्ञान हे खरोखरच उपयुक्त आहे. आणि विषेशतः आत्मप्रचिती हे जे मूलतत्व दासबोधात समर्थांनी विषद केले आहे तो त्याचा गाभा आहे. अनेक उत्तम तत्वाने व बोधाने भरलेला हा दासबोध ग्रंथ आहे. प्रचितीच्या

अनुभवावर रचलेला आहे. म्हणजेच या सर्व गोष्टिंचा अनुभव समर्थांनी घेतलेला आहे. पचविलेला आहे म्हणूनच ते केवळ भक्ती मार्गे संत किंवा राजकारणी महंत होते असे म्हणता येत नाही. समर्थांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण श्रीरामसेवेत परोपकारात व महाराष्ट्राच्या उध्दार कार्यात घालवीला. लोकहितार्थ त्यांनी ग्रंथ रचना केली. दासबोध मनाचे श्लोक, आत्माराम हे मुख्य ग्रंथ लिहिले याशिवाय करुणाष्टके, अभंग, सवाया, आरत्यापण लिहिले आहेत. तपोबल, उपासना बळ व स्वधर्मनिष्ठा ही त्यांच्या ठिकाणी प्रबळ असल्याने याच जन्मी ते शिवाजी महाराजांची यशस्वी कारकीर्द पाहू शकले. "धर्मवृध्दीने राज्यवृध्दी करा" असा त्यांचा दंडक होता. परमार्थाकडे जाण्यासाठी भक्ती हाच मार्ग आहे. ही संकुचित वृत्ती त्यांनी ठेवली नाही. म्हणून त्यांना भक्तीमार्गे संत म्हणणे बरोबर वाटत नाही. त्यांचेवेळी महाराष्ट्राची सामाजिक व राजकीय परिस्थिती पाहता लोक अडाणी बनले होते, धर्मांतरे होत होती, कुणाच्या पायपोस कुणाच्या पायात नव्हता अशा वेळी धर्म रसातळाला जातो की काय ही भीती निमार्ण झाली होती म्हणून धर्मवृध्दीने राज्यवृध्दी करण्याचा उपदेश त्यांनी राजकारणी लोकांना आणि विषेशत: शिवाजी महाराजांना केला. प्रपंच न करता प्रपंच करावा करावा नेटका हे तत्व त्यांनी लोकांना सागीतले. त्यांचा प्रपंच म्हणजे संपूर्ण देश होता. सर्वस्पर्शी ज्ञानाची आत्मप्रचिती घेऊन "आधी केले मग सांगीतले" हया तत्वाला अनुसरुन त्यांनी जे कार्य केले ते महान आहे. आणि म्हणून ते समर्थ व महंत आहेत.

मित्रांनो, संपूर्ण दासबोध तुम्हाला शक्य होणार नाही म्हणूनच त्यातील काही महत्वाच्या मुद्यांना धरुन मी तुम्हाला जी माहिति सांगते ती तुम्ही मनापासून वाचा त्यावर चिंतन करा व हया चिंतनाने स्वत:चे जीवन समृध्द बनवा व समर्थ कृपेने प्रेरणा झालीच तर दासबोध जरुर वाचा. त्याचा प्रचार करा. स्वत: शिका व इतरांनाही शिकवा.

# समर्थांनी मनाचे श्लोक का रचले ?

चाफळ येथे श्री समर्थ रामनवमीचा उत्सव दरवर्षी साजरा करीत असत. या उत्सवाकरिता त्यांना श्री. शिवाजी महाराजांकडून बरीच मदत धान्य वगैरे च्या रूपात येत असे. एके वर्षी मात्र श्री. शिवाजी महाराजांकडून या उत्सवाला काहीच मदत येऊ शकली नाही. त्यामुळे समर्थांचे मन विचलीत झाले. उत्सव कसा होणार ही काळजी मनाला त्रास देऊ लागली आणि या मनस्थितीत असतांना त्यांनी एका खोलीत दार बंद करून एका बैठकीत २०५ मनाचे श्लोक लिहुन काढले व ही रचना भक्त मंडळींना दिली.



# दासबोध ग्रंथाबाबत

आपण खरोखरच एक सामान्य व्यक्ती आहोत कळत नकळत जो काही आपल्यामध्ये अहंकार आहे तो आपल्याच प्रगतीला अडथळा करणार आहे. दुसऱ्या व्यक्तीमधील दुर्गुण सोडुन थोडेजरी चांगले बघण्याचा प्रयत्न केला तर ती व्यक्ती सुध्दा तेवढ्या गुणांपुरती श्रेष्ठ आहे. मग भांडण, मत्सर, तु मी हे शब्द कशाला ? विशाल अंतःकरणाने आपण सगळीकडे का पाहत नाही. 'आधी केले मगच सांगीतले' असे असतांना आपण लोका सांगे ब्रम्हज्ञान असे का करतो ?

गुरुस्थानी असणारा दासबोध ग्रंथ हा सर्वांनी वाचुन आनंद मिळवावा अर्थात त्यानंतर 'आता श्रवण केलीयाचे फळ! क्रिया पालटे तात्काळ! तुटे संगायाचे मुळ येकसरा! ही फलश्रुती प्राप्त होते.

मनुष्य हा प्रपंचामध्ये गुरफटून गेलेला आहे. परंतु हा प्रपंच नेटका कसा करावा व तो करुनच प्रपंचाकडे कशी वाट चालावी याचे सुंदर विवरण दासबोधात आढळते. मनुष्याच्या अंगी खरोखरच सदगुणापेक्षा दुर्गुणच आढळतात परंतु हे सदगुण आत्मसात करण्याची मनाची शक्ती माणसात यावी लागते. ती दासबोध वाचनाने येते. उत्तम पुरुष लक्षण, विवेक लक्षण, यत्न शिक्षणा, नामस्मरण इत्यादि उत्तमोत्तम सुविचार दासबोधात आहे. हे सर्व आत्मसात करणे माणसात शक्य नाही तरीपण संसारी माणसाने आपला संसार जरी सदगुणांचा आधार घेऊन विवेकाचा आश्रय घेऊन, नामस्मरणाचा जप करुन नेटका केला तरी तो त्याच्या कामात पूर्णतः पावतो. आणि म्हणूनच दासबोधाचा प्रचार आणि प्रसार होणे आवश्यक आहे.


दासबोधाचा अभ्यास कसा करावा याबाबत सुध्दा मार्गदर्शन समर्थांनी केलेले आहे. समर्थ म्हणतात या २० दशकी दासबोधाचे

श्रवण करुन शोधपूर्वक मनन करावे म्हणजे परमार्थाचा अर्थ स्पष्ट होईल. २० दशकांचे मिळून २०० समास आहेत हे साधकाने सायकाश व सावधपणे वाचावे, त्याचे अवलोकन करावे. जसे जसे या ग्रंथाचे विवरण करावे तसा हा ग्रंथ अधिकाधीक कळू लागेल. साधकाला आत्मप्रत्यय येणे हे महत्वाचे.

दासबोधासारख्या या महत्तम ग्रंथाचे समर्थांनी स्वत:कडे श्रेय घेतले नाही. ते म्हणताल

भक्ताचेनि साभिमाने! कृपा केली दाशरथीने!
समर्थ कृपेची वचने! तेहा दासबोध!

भक्तांचे अभिमत धरुन श्री समर्थ कृपेने वचने एकत्र करुन हा दासबोध ग्रंथ तयार झाला आहे. असे ते प्रांजळपणे कबूल करतात.



# समर्थांची गणेशस्तुती

दासबोधातील दशक एक समास दोन गणेश स्तवन या समासात समर्थांनी श्री गणेशाची स्तुती श्लोक क्र. १ ते ६ मध्ये केली आहे. पुढे ही गणपतीच्या सगुण रूपाचे वर्णन करून स्तुती केली आहे.

सर्व सिध्दिची फळे देणारा व अज्ञान दूर करणारा मूर्तिमंत ज्ञान असणारा ओंकार रूप गणपतीला समर्थ प्रथम वंदन करतात. समर्थ म्हणतात गणपतीने माझे अंतःकरण अंतर्बाहय व्यापून टाकले आहे. तेथे त्याने कायमचे घर करावे आणि आपल्या कृपा दृष्टिने पाहून मला मुक्याला ग्रंथ सांगण्याचे सामर्थ्य दयावे. श्री गजाननाच्या कृपेने अज्ञान व भ्रम दूर होऊन काळ आपला गुलाम होतो. त्याची कृपा झाली तर आपल्यावरील संकटे समूळ नष्ट होतात म्हणुनच तो विघ्नहर्ता आहे. जगात जो कोणी अनाथ आहे त्याच्या आश्रय दाता श्री गणेश आहे. जगात जे चांगले आहे त्याचा तो साठा आहे. त्याला वंदन करून कोणत्याही कामाला सुरूवात केली की विघ्न नष्ट होते व ते काम यशस्वी होऊन पूर्णत्वास जाते. त्याच्या सगुण रूपाचे चिंतन केले तर मनाला समाधान वाटते १४ विद्यांचा हा स्वामी डोळे लहान सर्व सृष्टी समावणारे पंख्यासारखे कान विशाल पोट, मोत्यांच्या रंगाचे दात ४ हातापैकी एका हातात परशु दुसऱ्या हातात कमळ तिसऱ्या हातात तेजस्वी अंकुश व चौथ्या हातात मोदक असे त्याचे रूप आहे. अशी समर्थांनी गणपतीची स्तुती केली आहे.

गणपती स्तवनाबाबत मनाच्या श्लोकांमध्ये खालील श्लोक प्रारंभीच आलेला आहे.

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा
नमु शारदा मुळचत्वारवाचा
गमु पंथ आनंत या राघवाचा

# अष्टविनायकाचा परिचय

| | | |
|---|---|---|
| 1. | मयुरेश्वर | – पुणे जिल्हयात मोरगाव या गावी |
| 2. | सिध्दिविनायक गणेश | – नगर जिल्हयात सिध्दटेक या गावी |
| 3. | बल्लाळेश्वर गणेश | – रायगड जिल्हयात पाली या गावी |
| 4. | वरद् गणेश | – मुंबई पुणे रस्त्यावर कर्जत जवळ मढ या गावी |
| 5. | चिंतामणी गणेश | – पुण्यापासून जवळच थेऊर या गावी |
| 6. | गिरिजात्मक गणेश | – पुणे जिल्हयात जुन्नर तालुक्यात असलेले एकलेणे |
| 7. | विघ्नेश्वर गणेश | – जुन्नर जवळ ओझर या गावी |
| 8. | महागणपती | – पुण्यापासून जवळच |

# समर्थांनी उल्लेखलेल्या गीता

दासबोधात दशक क्र. १ व समास क्र. १ मध्ये १२ गीतांची नावे देण्यात आली आहे.

१. शिवगीता – ही शंकरांनी रामचंद्रांना उपदेशिली असून त्याच्यात वेदांत विषयाचे प्रतिपादन आहे. ह्यात १६ अध्याय व ७८३ श्लोक आलेले आहेत.

२. रामगीता – ही गीता श्री राम प्रभुंनी आपला बंधु लक्ष्मण यास सांगितलेली आहे. ब्रम्हांडपुराणात उमा महेश्वर अध्यात्म रामायणाच्या उत्तर कांडात ही आलेली असून ह्यात ६८ श्लोक आहेत.

३. गुरुगीता – उमा महेश्वरांचा संवाद या गीतेत आहे. गुरुभक्ती साधन हा विषय आहे स्कंद पुराणात उत्तर खंडात हा विषय आला असून ह्या करिता २७४ श्लोक देण्यात आलेले आहे.

४. गर्भगीता – २५ श्लोकांच्या या गीतेत गर्भधारा जन्म प्राप्ती व भोग चुकविण्याचा उपाय श्रीकृष्णाने अर्जुनास सांगितला आहे.

५. उत्तरगीता – भगवतगीता फिरुन सांगण्याबद्दल अर्जुनाने कृष्णाला विनंती केली असता भगवतगीतेच्या वेळेची तंद्री जमणार नाही असे सांगुन पुरवणी वजा ही गीता कृष्णाने सांगितली ह्यात 3 अध्याय असून त्यात वायु निरोधाच्या साधनाने साक्षात्कार कसा करुन घ्यावा याचे ज्ञान आहे.

१. अवधुत गीता – श्री दत्तात्रयाने कार्तिक स्वामीस ही अष्टाध्यायी गीता सांगितली जगाच्या उध्दारासाठी ज्ञान मार्गाचे विवरण देण्यात आलेले आहेत यात ८ अध्याय व २८९ श्लोक आहेत.

भगवद् गीता – भारतीय महायुध्दाचे वेळी आरंभी त्या समर प्रसंगातील

प्रमुख महावीर अर्जुन यास ऐन रणांगणावर व्यमोह उत्पन्न झाला तेव्हा त्यास भगवान श्रीकृष्णाने कर्तव्याविषयी बोध केला यात 18 अध्याय असून ७०० श्लोक आहेत.

८. ब्रह्मगीता – ब्रहमदेवाने देवांना ही गीता सांगीतली स्कंद पुराणात सुत संहीतेच्या यश वैभव खंडाच्या उत्तर भागात पहिला १ ते १२ अध्यायापर्यंत असून यात १०५८ श्लोक आहेत.

९. हंसगीता – युधिष्ठीराच्या प्रश्नावरुन भिष्माने ही गीता सांगीतली आहे. महाभारतातील शांतीपर्वातर्गत मोक्ष पर्वात ४५ श्लोकांची ही गीता आहे. भगवान विष्णुने हंस रुपाने ब्रहमदेवास उपदेश केला आहे.

१०. पांडवगीता – ८० श्लोकांचे श्रीकृष्ण गुणानुवादाचे हे स्तोत्र आहे. पाच पांडव ब्रहमदेव, इंद्र, सुभद्रा, द्रुपद, सात्यकी, विदुर, भिष्म, द्रोण, कृप, अश्वत्थामा, दृष्टदयुम्न, दुर्योधन, कर्ण, विकर्ण, वशिष्ठ, अरुंधती, काश्यप इत्यादि भक्तांनी केलेली ही भगवतस्तुती आहे.

११. गणेशगीता – संवाद रुपाने ही गीता गणेश पुराणाच्या अखेरच्या क्रिडा खंडात आध्याय १३८ ते १४८ मध्ये असू भगवतगीतेसारखीच आहे.

१२ यमगीता – हे १९ श्लोकांचे भक्तीपर स्तोत्र असुन ते पाराशराने व भिष्मांनी नकुलास उपदेशीले आहे. नृसिंह पुराणाच्या आठव्या अध्यायात यमाने नचीकेताला ही गीता सांगीतलेली आहे.

# दुरात्मा व दुश्चित्तपणा


एखादा ग्रंथ प्रथमपासुन शेवटपर्यंत न वाचता न अभ्यासिता जो मनुष्य त्या ग्रंथाला उगीचच नावे ठेवतो त्या मनुष्यास समर्थांनी दुरात्मा असे म्हटले आहे. ते म्हणतात

पुर्ण ग्रंथ पाहिल्याविण! उगाच ठेवी जो दषण! तो दुरात्मा दुराभिमान मत्सरेकरी!! द.1 स. 1! 22!

असा दुरात्मा दुष्ट बुध्दीचा असतो केवळ मत्सराने व दुराभिमानाने तो ग्रंथाला उणेपणा आणून आपली हिन वृत्ती प्रगट करीत असतो. याच मत्सरातून पुढे तिरस्कार प्रगट होतो आणि त्यातूनच मग तिव्र क्रोधाचा विकार पोसल्या जातो. म्हणून हा दूराभिमान, अहंकार प्रथमच समूळ नष्ट करायला पाहिजे व निरहंकार वृत्तीने ग्रंथाचे वाचन केले पाहिजे. आपल्याला जसे झेपेल, जसे समजेल तेवढे प्रत्येकाने घ्यावे हे उत्तम म्हणजे बाकीचे विकार आपोआप टळतात. अभिमाने उठे मत्सर! मत्सरे ये तिरस्कार! पुढे क्रोधाचा विकार! प्रबळे बळे! अशा रितीने दुरात्मा हा चढत्या क्रमाने विकार पावतो. व भोवटी काम क्रोधे लिधाळीला! तो कैसा म्हणावा भला अमृत सेवताची पावला! मृत्य राहो! म्हणुन कोणतेही पुस्तक वाचत असतांना वाचनाच्या पुर्वी त्यावर भाष्य करु नये.

ब्रहम दर्शन घडण्यास एकाग्र चित्त हवे असते. जो एकाग्र चित्त नसतो व जो व्यग्र चित्त असतो त्या व्यग्रचित्ताला समर्थांनी दुश्चित्तपणा असे नाव दिले आहे. दुश्चित बुध्दी असणारा माणूस प्रपंचात मुका बहिरा माणसासारखा होतो. त्याचा संसार एखाद्या वेड्या पिसाटाच्या संसारासारखा असतो. दुश्चित बुध्दीमुळे कार्याचा नाश होऊन सतत मनात चिंता वसत असते. त्याला गोष्टिचे स्मरण

राहत नाही व परिणामी ज्ञान प्राप्ती होत नाही. दुश्चित बुध्दीमुळे स्वहिताचा क्षय होतो व जय मिळत नाही. दुश्चित असून जो आळशी असतो त्याला परलोक मिळणे कठीण आहे. आळसामुळे आचार विचार बुडतो , पाठांतर होत नाही, आळसामुळे श्रवण निरुपण होत नाही परिणामी त्याला परमार्थाची खुणही समजत नाही. विवेकाची गती मंद होते व अभ्यासू वृत्ती नाहीशी होते. दुश्चितपणाबरोबर आळस व आळसाबरोबर निद्रा या तीनही गोष्टींचा संगम झाला तर मानसाचा नाश होणे निश्चित आहे. दुश्चित मानसाचे अंगी अहर्निश आळस भरुन राहिला तर तो जाणे भाक्य नाही उलट वाढू लागला तर आळसाला उसंतच राहणार नाही. समजा तो दुश्चित्तापासून सुटला तरीपण त्याचे अंगी असलेला आळस हा राहतोच व या आळसामूळे त्याचे ठिकाणी आचार विचार राहत नाही. या दुश्चितपणा अंगी असणाऱ्या माणसाचे प्रपंचात व परमार्थात नुकसान होते. कारण तो एकाग्रचित्त नसतो. त्याचे मन चंचल असते, बुध्दी स्थिर राहत नाही आणि म्हणूनच त्याचे बैठक पक्की वाटत नाही.



# पढतमूर्ख लक्षण

पढतमूर्खाची लक्षणे सांगतांना समर्थ म्हणतात कोणाचे म्हणणे ऐकत असतांना त्या म्हणण्यात स्वतःला कमीपणा येणारे भाष्य एकले असता ज्याचा क्रोध अनिवार होतो, व ज्यामुळे तो चिडचिड करतो तो पढतमूर्ख समजावा. वास्तवीक पाहता आपल्यातील दोष हे समजूतदार माणसास माहित असतात. परंतु तरीसुध्दा ते दुसऱ्यांकडून जेव्हा वदले जातात तेव्हा त्या माणसाचा संयम सुटतो व त्याला क्रोध अनावर होतो. वास्तविक पाहता आपल्या ठिकाणच्या अवगुणाचे ज्ञान त्याला असते तरीसुध्दा तो विवेक न धरता क्रोधाला जवळ करतो म्हणून तो पढतमूर्ख होय. मनुष्य आपल्याच शरीरातून काढलेल्या नाजूक तंतूच्या जाळयाने मोठ्ठा हत्ती बांधण्याचा प्रयत्न करतो. हत्ती बांधण्यास हा धागा नाजूक होईल त्याला पक्का दोरच लागेल ह्या गोष्टिचे ज्ञान त्याला असूनसुध्दा तो हा प्रयत्न अविवेकाने करतो. असा माणूस पढतमूर्ख होय. कमळातील मधू सेवन करण्याच्या लोभाने भ्रमर हा कमळात एवढा गुरफटतो की सायंकाळी कमळ पाकळया मिटल्या की त्यात तो अडकून शेवटी मृत्यु पावतो. तद्‌वतच संसारात अविचाराने जो गुरफटतो तो पढतमूर्ख आहे. समर्थांच्या मते प्रपंचाला सर्वस्वी खरे मानून जीवन जगणारा अज्ञानी माणूस हा मूर्ख होय. हा मूर्ख माणूस अत्यंत स्वार्थी असल्याने सगळे जग माझ्या सुखासाठी आहे असे समजतो. मी देह आहे या कल्पनेशी घट्ट राहून देह सुखासाठी तो सारखा हापापलेला असतो. तो विकारवश कुविचारी, भोगी, हिनलक्षणी व आळशी असतो. परंतू काही प्रापंची लोकामध्ये देहबुध्दीचा जोर असला तरी सुध्दा निस्वार्थीपणा चांगले, वाईट, उत्तम गुण, या सर्वांचे ज्ञान असते. परंतू तरीसुध्दा अशी माणसे

सत्कर्म माहित असून दष्कर्म करतात, वंद्य काय हे माहित असून निंद्य स्विकारतात, सदाचाराची किंमत ओळखुन भ्रष्टाचार करतात, उत्तम लक्षणे जाणून बूजून सोडून हीन लक्षणांना थारा देतात. अशा लोकांना समर्थ पढतमूर्ख असे म्हणतात. मूर्ख हा मुळचाच अज्ञानी असतो परंतू पढतमूर्ख याला चांगल्या गाष्टिंचे ज्ञान असतांना सुध्दा तो ते आचरणात आणत नाही व त्याच्या उलट वागतो.

पुत्र, कलत्र आणि दारा! इतुकाची मानूनिया थारा!
विसरोन गेला ईश्वरा! तो येक मूर्ख!

मूर्ख लक्षणातील या ओवीप्रमाणे आपला पूत्र आणि आपली स्त्री एवढाच मर्यादित संसार समजून त्यात गुरफटून जाऊन माणूस ईश्वराला विसरतो तो मूर्ख समजल्या जातो.

प्रपंचाविषयी सादर! परमार्थी ज्याचा अनादर!
जाणपणे हो आधार! तो एक पढतमूर्ख!

यातील माणसाला प्रपंचाविषयी आदर आहे, परमार्थाविषयी जाण आहे तरीसुध्दा तो परमार्थाचा अनादर करुन वागतो तो पढतमूर्ख आहे.

# यत्न शिकवण

प्रयत्नशील माणसाने आपली जीवनपध्दती कशी ठेवावी हे सांगतांना समर्थ म्हणताल सर्वप्रथम आळस झाडून टाकून मनुष्याने प्रयत्नशील बनले पाहीजे. तरच त्याला दैव अनुकूल ठरते. यासाठी आपल्या दैनदिंन जीवन पध्दतीचे पुढीलप्रमाणे नियोजन करावे.

प्रात:काळी लवकर उठून प्रातः स्मरण करावे, नित्यनियमाने पाठ करावा मागील पुनरावृत्ती करुन पुढे पाठ करण्याचा दृढ नियम करावा. प्रातर्विधी व्यवस्थित करावे, बाष्कळपणाची बडबड करु नये, देव दर्शन करावे, मनन चिंतन करावे, जसे बोलतो तसेच वागावे, निरपेक्षता ठेवावी, लोकांना गोड बोलून आपलेसे करावे, नाम स्मरण करावे या जीवन पध्दतीने मनुष्याच्या अंगी तेज येईल.


मनुष्याला जेव्हा जीवनाचा कंटाळा येतो तेव्हा त्याने आपल्या मनावर आलेली मरगळ झटकून टाकायला हवी. प्रथम आळस सांडून निराश न होता योग्य दिशेने खुप प्रयत्न करुन आपल्या जगण्याचा मार्ग निश्चीत करायला हवा. असे प्रयत्नशिल राहिल्यामुळे त्याला दैव अनुकूल झाल्यावाचून राहणार नाही. प्रयत्नाला देवाच्या जागी मानुन त्या प्रकारे कार्य करत राहावे. असे प्रयत्न करुन जीवन जगल्यास मनुश्य महंत बनु शकतो असे समर्थांनी अभिवचन दिलेले आहे. अशा महंताच्या अंगी अनेक सद्‌गुण वास करतात. हे सद्‌गुण पुढील प्रमाणे आहेत.

1. आळस झाडून टाकून मनष्य सदैव प्रयत्नशिल राहतो.
2. तो जे बोलतो तेच करतो.
3. तो हृदयात भगवंताचे ध्यान करतो व सदैव नामस्मरण करतो
4. आपल्या गोड शब्दाने लोकांना आपलेसे करुन घेतो अपशब्दाने दुसऱ्यास दुखवत नाही. आपल्यास जे माहित आहे ते दुसऱ्यांना समजवुन देतो. तो क्षमाशिल असतो.
5. परोपकाराच्या कामी तो आपले शरीर लावतो. कोणालाही कमी पडू नये असे त्याचे वागणे राहते.

# सद्गुणाचे रहस्य

बुध्दी हे मणुष्याचे व्यवच्छेदक वैशिष्टये आहे. मनुष्य व मानवेतर ह्यात फरक पडतो तो बुध्दिमुळेच. अनेक ज्ञेय वस्तु जेव्हा मनुष्य आपल्या बुध्दिच्या कक्षेत साठविण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला ज्ञेयाचे खरे ज्ञान होते. मनुष्याच्या याच मर्मावर बोट ठेऊन समर्थानी आपल्या दृ .चत् निररुपणात श्रोत्यांना आव्हान केले आहे. श्रवण करतांना श्रोत्याला नेमकी कोणत्या गोश्टिची आवश्यकता असेल तर ती म्हणजे एकाग्रचित्ताची. हे एकाग्रचित्त तेव्हाच घडते जेव्हा मन बुध्दिचा कल हा श्रवण ग्रंथांवर असतो परंतु हयाच्या नेमके उलटे घडते. मनुष्य जेव्हा श्रवण करतो तेव्हा त्याच्या मनाचा कल विविध बाह्य उद्दिपकांचा ठाव घेत असतात. परिणामी नेमक्या श्रवण विषयाकडे दुर्लक्ष होत. ह्यालाच समर्थांनी दृश्चित् म्हटले आहे. दुश्चित्तामुळे मन चंचल, अशांत व श्रध्दाहीन बनते. हे दुष्परिणाम टाळण्याकरिता समर्थांनी असा उपदेश केला आहे की परमार्थात कोणत्याही विषयाचे श्रवण करतांना त्यातील अर्थातर विचारात घ्यावे म्हणजेच अर्था अर्थामधील फरक लक्षात घ्यावा. कोणत्याही विषयावर विचारमंथन करतांना मनुष्य नियामक तत्व बाहेर काढीत असतो असे गृहीत धरण्यात येते पण ह्या उलट नेहमीच घडते. मनुष्य सारासार विचार न करता कोणतीही टोकाची भूमिका घेतो परिणामी त्याच्या विचारशक्तींना विधायक वळण न मिळता विघातक वळण प्राप्त होते ह्या सर्वाचे महत्वाचे कारण म्हणजे तो कोणत्याही बाबींच्या गर्भित अर्थापर्यंत जाऊन पोहोचत नाही. ह्या अवस्थेला जेव्हा मनुष्य येतो तेव्हा त्याच्यावर कितीही संस्कार केले तरी त्याचा फायदा होत नाही. आणि नेमके हेच साधर्म्य पाषाण व मनुष्यात समर्थानी सागींतले

आहे. पाषाणावर कितीही संस्कार केले त्यातुन अगदी सजीव मूर्ती निर्माण केली तरी तो पाषाणच राहणार त्याच्यात विचारशक्ती जागृत होऊ शकणार नाही. त्याही पुढे जाऊन समर्थांनी असे प्रतिपादन केले आहे की पाषाणाचे एखादी चीप काढली ती पुन्हा जोडता येणार नाही. तद्वतच अवगुणी माणसाचे अवगुण कीतीही घालविण्याचा प्रयत्न केला तरी ते मुळापासून जात नाही.



# उत्तम पुरुष लक्षण

समर्थांनी दशक १२ व समास १० मध्ये उत्तम पुरुष लक्षणे स्पष्ट केली आहे. त्यात आपली वाणी कशी असावी अथवा आपण गोड का बोलावे याबाबत त्यांनी ओवी क्र. २२ ते २६ यात आपले विचार प्रगट केले आहेत. ते म्हणतात गोड बोलण्यामुळे सुख वाटते हे आपणास प्रत्यक्ष अनुभवास येते म्हणून दुसऱ्याला आपल्यासारखेच समजुन वागवावे. कठोर बोलण्यामुळे वाईट वाटते याचाही मनुष्यास अनुभव आहे, मग का दुसऱ्यास वाईट बोलावे. आपल्याला चिमटा घेतला तर जीव कासावीस होतो, मग दुसऱ्यालाही याबाबतीत तसेच होइल हे का न समजावे ?

दुसऱ्यास दुख देणारी वाणी अपवित्र होय ती एखादे वेळी आपला घात सुध्दा करते. ज्या प्रमाणे पेरले तेच उगवते त्याच जसे आपण बोलू त्याच प्रमाणे उत्तर येते. मग काय म्हणून कठोर बोलावे.

आपणास संपूर्ण ज्ञान प्राप्त झाल्यानंतर ते ज्ञान इतरांना सांगुन त्याचा संपूर्ण लाभ दुसऱ्यांना द्यावा या संदर्भात स्पष्टीकरण करतांना समर्थांनी उदाहरण दिले आहे की समोरचा माणुस पाण्यात बुडत आहे आणि आपल्याला पोहता येत आहे. अशा परीस्थितीत त्या बुडणाऱ्या माणयास आपण वाचविले पाहिजे. किर्ती मिळविण्याकरिता मानसाने खुप कष्ट करणे जरुर आहे. किर्ती मिळवायला गेलो तर सुख मिळत नाही. व सुख मिळवायचे असेल तर किर्ती व्हावयाची नाही. या करिता विवेका वाचून मनाला समाधान नाही.

प्रबोधशक्ती हा लोकप्रिय नेत्यांच्या अंगी विषेश गुण असायला पाहिजे तो उत्तम पुरुष होय. आपल्या प्रबोधशक्तीच्या जोरावर तो लोकांना आपलेसे करतो. या प्रबोधशक्तीचे लक्षण म्हणजे जो बोलण्याप्रमाणे वागतो, चालतो आधी स्वत: आचरण करतो व नंतर दुसऱ्यास करावयास सांगतो त्याच्या प्रबोधावर लोकांचा विश्वास बसतो व तो लोकप्रिय होतो.

# राक्षसवृत्ती लक्षण

राक्षसवृत्तीच्या लक्षणे समर्थानी सांगीतली आहे. तोंडाळ, हेकट, कठोर बोलणारा, नित्य अहंकाराच्या डौलात राहणारा, न्यायनितीला न जुमाननारा, शिघ्रकोपी, कोणत्याही प्रकारची मर्यादा न बाळगणारा, राजकारणात किंवा सुख संवादात इतरांशी मिळते न घेणारा, ज्याच्या बोलण्यात खरे पणा नाही, जो पापी, कृतघ्न व लबाड आहे तो राक्षस आहे असे समजावे. ही राक्षसीवृत्ती माणसाची लक्षणे होय.



# चातुर्य लक्षण


दासबोधाच्या दशक 14 व समास 6 वा यात चातूर्य लक्षणावर समर्थानी भाष्य केले आहे. मनुष्याच्या अंगी काही अवगुण असले तर ते तो स्वप्रयत्नाने सोडवु शकतो व उत्तम गुणांचा अंगीकार तो करु शकतो. कुविद्या सांडून तो शहाणा होवु शकतो. ही गोष्ट पटवुन देण्याकरिता समर्थ म्हणतात की रुपलावण्य हे नैसर्गिक देणगी आहे. ते अभ्यासाने प्राप्त होत नाही. आंधळेपण, मुकेपण, बहिरेपण हे सहज गुण आहेत. तेथे माणसाचा उपाय चालत नाही. परंतु अवगुण सोडून उत्तम गुणांचा अंगीकार करणे हे मनुष्याच्या हातात आहे. प्रयत्नाने ते सहज शक्य आहे.

मनुष्याच्या अंगी चातूर्य असेल तर तो अंतर्मनाने श्रुंगारला जातो. वस्त्राने मात्र बाह्य शरीर सुंदर दिसते. ह्या दोहोमधला फरक जाणून काय थोर आहे हे ठरवीले पाहीजे. बाहेरुन शरीर सजवीले तर ते लोकांच्या उपयोगी पडणार नाही. परंतू अंगातील चातूर्याने पुष्कळ लोकांचे रक्षण करता येईल. तनमन खर्च करुन झिजले पाहीजे आणि चांगले म्हणून घेतले पाहीजे. उगाच नसत्या कल्पना मनात धरल्या तर पुढे पश्चातापाची पाळी येऊ शकते.

लोकसंग्रह वाढविल्याने त्याच बरोबर माणसाचे वैभवपण वाढते. व वैभवाप्रमाणे माणूस आपले जीवन जगतो. हा परस्पर संबंध आहे. हा लोकसंग्रह वाढविण्याकरिता आळस सोडून जनात मैत्री वाढविली पाहीजे. वैर सोडले पाहीजे, सत्य असत्याला ओळखले पाहीजे, सर्वांमध्ये न भांडता राहून त्यांची मने जिंकल्याने लोकसंग्रह वाढतो. ही चातूर्य लक्षणे ज्यांना समजली व ज्यांनी ती आचरणात आणली ते पुरुष भाग्यवान समजायला पाहिजे. या व्यतीरिक्त इतर पुरुष हे करंटे होत.

# सत्संग महिमा

सत्संगाने मनुष्याला मुक्ती मिळते. परिसाशी संगत करणारे लोकांचे संगतीने सोने होते. पाण्याचा एक थेंब सागरात मिळाला तर तो पवित्र होतो. गंगा या पवित्र नदीला मिळणाऱ्या इतर नद्या संगमामुळे पवित्र होतात. त्याचप्रमाणे संत संगत केल्याने मनुष्याला मुक्ती मिळते परंतु तो सावध, साक्षेपी व दक्ष असावयास पाहिजे. हे गुण आत्मसात करण्याकरिता त्याने प्रयत्न केले पाहिजे. केवळ सज्जनांची संगत करुन ताबडतोब मुक्ति मिळणार नाही तर त्यासाठी त्याने सावध, साक्षेपी व दक्ष बनले पाहीजे. जो असा असतो व सत्संग करतो त्यास ताबडतोब मुक्ति मिळते.




# श्रवण

मनुष्याने केवळ श्रवण करु नये तर त्यातील अर्थांतर पाहणे महत्वाचे ठरते. असे अर्थांतर न पाहणाऱ्या मनूष्याला समर्थांनी पाषाणाची उपमा दिली आहे. ग्रंथ वाचन करुन त्याचा व्यवस्थित अर्थ समजावून घेतला पाहीजे. अशा वेळी एकाग्रचित्त न झाले तरी पुन्हा पुन्हा श्रवण करीत जावे. अर्थ समजल्याशिवाय नुसतेच जो श्रवण करतो तो श्रोता नाही. तो मनुष्य वेशातील पाषाण होय. पाषाण म्हटल्यानंतर मनुष्यास वाईट वाटेल हे समर्थ जाणून होते. परंतू समर्थ म्हणतात

पाषाणाचे गुण पाहता असे आढळते की दगड वाकडा असला तर तो फोडून तेवढा भाग काढून त्याला मनासारखे घडविता येते. व घडविल्यानंतर ती कृती तशीच्या तशीच टिकून राहते. पाषाणाची खपली अलगद फोडली तरी ती भागाहून जोडता येत नाही. परंतु मनुष्याची बुध्दी झाडुन टाकली तरी ती त्याला पुन्हा लागते. दगडाप्रमाणे घाव घालून म्हणजेच वारंवार उत्तम लक्षणे सांगुन मनुष्य घडविला जात नाही. कारण दुश्चित बुध्दीमुळे त्याच्यातील विवेक नाहीसा होऊन घडत आलेला माणूस लयाला जातो. आणि म्हणून शास्त्राच्या योग्य श्रवणावर समर्थांनी भर दिलेला आहे.

श्रवण निरुपण या समासात श्री समर्थांनी श्रवणाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. श्रवणात मनन आणि निधीध्यासन अंतर्भूत आहेत. मनावर एकसारखे संस्कार करण्यास श्रवण महत्वाचे आहे. जे एकले ते मनन करुन त्याचे स्वंथ होणे आवश्यक आहे. श्रवणाने अनेक लाभ होतात. श्रवणाने भक्ती स्वाधीन होते, विरक्ती उत्पन्न होते व दृष्याची आसक्ती सुटते. श्रवणाने चित्त शुध्दी घडते, मनाला स्थिरता येते व मनातील अहंकार नाहीसा होतो. श्रवणाने निश्चय करण्याची सवय

होते, शंका फिटतात, मनातील संशय नाहीसे होऊन अंतरंगातील दोष नाहीसे होतात व स्वभावात बदल होतो. श्रवणाने मन आवरले जाते व समाधान पावते. देह बुध्दिचे बंधन नाश पावते. श्रवणाने मी पणा मरतो, संकटे टळतात, सत्संगती मध्ये राहूनश्रवण केले असता आत्मनात्म विवके कळू लागतो व आपले मन तदाकार पावते. श्रवणाने ज्ञान वाढते, प्रज्ञेचा उत्कर्ष होतो, इंद्रिय सुखाची कल्पना कमी होते. ज्ञान शक्ती वाढते व साधकाला आत्मवस्तू अनुभवास येते.



# राजकारण

समर्थांनी राजकारण हा शब्द समाजाचे पुढारीपण गाजविण्यास लागणारे व्यवहार चातूर्य या अर्थाने वापरलेला आहे. राजकारण पुष्कळ केले तरी ते कुणाला कळू देऊ नये. ते करतांना दुसऱ्याला पीडा देण्याचा हेतु नसावा.

राजकारण बहुत करावे! परंतु कळोच नेदावे!
पर पीडेवरी नसावे! अंतःकरण

लोकांची परिक्षा करुन ठेवावी कारस्थाने करुन त्याचा अहंकार झाडून टाकावा. मनुष्य तोडु नये. तामसी असलेल्यांना दुर ठेवावे. कामचुकार व क्षुद्र असेल त्याच्याशी बोलू नये. व संबंध आलाच तर सोडून दूर जावे. जे उन्नतीच्या मार्गावर असतील त्यांना सहकार्य करावे. जे भांडखोर असतील त्यांना दुर करावे. भिन्न प्रवृत्तीच्या व पातळीवरच्या माणसाकडून काहीतरी कार्य करुन घेण्याच्या कलेला समर्थ राजकारण असे म्हणतात.

नष्टांचा प्रतिकार करण्यास नष्टांचीच योजना करतो. वाचाळांना गप्प करण्यासाठी वाचाळच उभे करतो तो खरा राजकारणी. काटयाने काटा काढावा पण तो कुणालाही कळू देऊ नये म्हणजेच कार्य करावे परंतु ते कोण करते हे कळू देऊ नये. आपण आपल्याकडे अजागळपणा घ्यावा. कोणास न कळू देता काम तात्काळ केले तर ते सिध्दीस जाते. स्वताच्या कार्यासाठी लोकांवर अवलंबून राहू नये त्यामुळे कार्याचा नाश होतो. राजकारणातील मुख्य सुत्रे आपल्या हाती घ्यावी व इतर कामे इतरांकडून करुन घ्यावी. राजकारणात धूर्त लोकांना गोवावे.

समर्थांचे राजकारणाबाबतचे हे विचार आजच्याही घटकेला अतिशय लागु पडतात.

# जनस्वभाव निरुपण

माणूस हा इतका स्वार्थी आहे की त्याला देव ही स्वार्थासाठी हवा असतो. कष्टाशिवाय त्याला फळ हवे असते पण कष्टवाचून फळ नाही हा कर्मसिध्दांत आहे. ज्यांनी कष्ट केले, जे विवेकाने वागले त्यांनीच वैभव उपभोगले. प्रपंच असो किंवा परमार्थ दोन्हीकडे विवके सारखाच पाहिजे. पुढील योजना बरोबर आखुन त्या प्रमाणे वागले पाहिजे. आपण जेवढा पैसा मिळवला तेवढा सर्व खर्च करुन टाकला व पुढील भविष्यासाठी काहीच शिल्लक ठेवला नाही तर पुढे कठिणवेळी समस्यांना तोंड देणे दुरापास्त होते. म्हणून पुढची योजना विवके ठेऊन करतात तेच लोक शहाणे ठरतात. मनष्याच्या ठिकाणी विवेकाचा अभाव असला तर त्याच्या ठिकाणी दुसरा कोणताही असलेला अभाव हा अभावच असतो. विवके जागृत ठेऊन एखादया गोष्टीवर श्रध्दा ठेवली पाहीजे. अविवेकाने श्रध्दा ठेवली तर ती अश्रध्दा ठरते. अशा मूर्ख माणसास फक्त प्रतिमा हाच देव वाटतो परंतू विवेकाने व श्रध्देने त्या प्रतिमेत देव उतरविता येत नाही. प्रत्येक गोष्टीचा अनुभव स्वतः घेणे आवश्यक असते. अनुभव न घेता आपण जे जे करतो ते ते सारे व्यर्थ जाते. कर्माच्या कचाट्यात सापडून मनूष्य कष्ट भोगत भोगत मरुन जातो. जोपर्यंत सुक्ष्मात शिरता येत नाही तोपर्यंत कर्माचे बंधन सैल होत नाही. व हे कर्माचे बंधन मनुष्यास सतत तळमळ व दुःखात ठेवते. मनुष्याने कोणतीही गोष्ट विचारपूर्वक केली पाहीजे. विचारानेच ईहलोक व परलोक साधता येतो. विचाराने जीवणाचे सार्थक होते. विचारशक्ती अंगी बाणली म्हणजे माणसास सोपी जाते. सामान्य माणूस अत्यंत स्वार्थी असतो. देवाची भक्ती सुध्दा काहीतरी मिळावे या स्वार्थी भावनेने तो करतो. मनुष्याचा स्वभाव असा आहे की कष्ट

तर करायला नको पण फळ मात्र हवे परंतू कर्माचा नियम असा आहे की कष्टाशिवाय फळ मिळत नाही. जे कष्ट करतात व जे विवेकाने वागतात त्यांना प्रपंचात सुखाची प्राप्ती होते. देवाचे कर्तेपण महान आहे हे विवेकाने समजुन घेतले पाहीजे जे लोक आज कष्टाचे दुःख भोगतात ते नंतर सुखाचे फळ भोगतात. प्रपंच असो अथवा परमार्थ दोन्हीकडे विवके सारखाच असतो. जगामध्ये अनेक देव आढळले तरी अंतर आत्मा हाच खरा देव आहे. माणसाने विचारपूर्वक त्याचा शोध घ्यावा. ह्या अंतर आत्म्याला लोक चुकतात आणि तिर्थाकडे धाव घेतात. तिर्थक्षेत्री जाऊन सुध्दा देव न भेटल्यावर त्यांच्या मनात असा विचार येतो कि प्रत्येक तिर्थामध्ये धोंडा व पाणी याशिवाय काहीच नाह मग उगीच वणवण फिरण्यात काय अर्थ आहे याची जाणीव झाली की तो सत्संग करतो. पुष्कळ लोकांना सत्संगाने देव सापडतो. संत हे माणसाला अंतरामधे शिरण्याचे महत्त्व पटवून देतात आणि अंतरवेध घेण्याची कलापण शिकवतात. जर श्रध्दापूर्वक अंतरात्मा शोधला तर दगडात देव आहे हे पटायला लागते. म्हणून तीर्थ यात्रेपेक्षाही सत्संगाची महती अधिक आहे असे समर्थ म्हणतात.

# जाणतेपण

जगात काही लोक संपन्न, काही लोक दुबळे, दरिद्री, काही लोक ओंगळ तर काही लोक स्वच्छ असा भेद का दिसतो?असा प्रश्न समर्थांना एका श्रोत्याने विचारला असता समर्थ उत्तर देतात हा सगळा भेद आपल्या गुणांचा परिणाम आहे. ज्यांचा अंगी गुण असतात ते लोक भाग्य व वैभव भोगतात. व जे गुणहीन व अवगुणी असतात ते दारिद्र्य भोगतात. प्रत्येक माणसाने आपला धंदा हा समजून व जाणून केला तर तो समाजाच्या दृष्टिने कार्यकर्ता ठरतो. विद्या, हुशारी, विवेक, प्रयत्न, कौशल्य आणि व्याप हे सर्व गुण ज्याचे अंगी असतात तो वैभव भोगतो व भाग्यवंत ठरतो परंतु या गुणांचा अभाव ज्याचे ठिकाणी आहे तो मात्र करंटा राहतो, भाग्यहीन ठरतो. ज्याच्या जवळ विद्या नाही व वैभव नाही तो भाग्यहीन मलीनपणे समाजात वावरतो व वाईट प्रवृत्तीचा वाटतो. जीवनात भाग्य निर्माण करणे हे आपल्या हाती आहे. जाणतेपणाने कर्म करुन आपल्या गुणांचा विकास केला तर भाग्य निर्माण होऊ शकते. याच्या उलट अवगुणी माणूस करंटा भाग्यहीन ठरतो म्हणून प्रपंचात अथवा परमार्थात जाणतेपणाने वागले पाहिजे. जेवढा व्याप असेल तेवढे वैभव माणसाला मिळेल. माणसाची विद्या जेवढी असते तेवढी महत्वाकांक्षा त्याची असते. म्हणुनच त्याला वैभव प्राप्त होते. व्याप तितका संताप हे समर्थांना मान्य नाही कारण जाणते पणाने व्याप वाढविला व विवेकाने कामे केली तर संताप होण्याचे काहीच कारण नाही. वैभव हाच त्याचा परिमाण आहे.

# स्वगुण परीक्षा

मणुष्याचा जन्म झाल्यानंतर त्याचे शिशुपण व बालपण हे त्याच्या आई वडीलांच्या प्रेमात जात असते. शिक्षणाची जबाबदारी आई वडील सांभाळतात. पूढे तो वयात येतो, त्याचे लग्न होते आणि आधी आई वडीलांवर प्रेम करणारा आज्ञाधारक मुलगा लग्नानंतर एकदम बदलतो व बायकोच्या मताने वागू लागतो. पहिली बायको मरते लगेच दुसरे लग्न करतो, व्यसनाधीन होतो, स्त्री सुखाला चटावतो, घाणेरडे रोग होतात त्यातून कसाबसा वाचतो व गुला बाळांकरिता नवस करतो. कालांतराने मुलाबाळांनी घर भरुन जाते पण पैशाची चणचण भासू लागते. मुलीच्या लग्नात कर्ज काढतो, पैसे कमविण्यास परदेशी जातो, तीकडून आल्यानंतर दुष्काळ पडतो, कुटुंबाची वाताहात होते, तिसरे लग्न करतो आता बायको तरुण मुले वाढलेली व हा व्यसनी मग मुले त्याला मारु लागतात, लोक भांडण सोडवितात शेवटी एकटा एका झोपडीत राहू लागतो. तेवढयात परचक्र येते व लुटालूट होऊन बायको पळवीली जाते, भ्रष्ट होते. अती म्हातारपणामुळे तोही तपतो व केव्हा एकदा मरण येईल यासाठी धडपळू लागतो. अखेर ह्या करंटयाच्या वाट्याला दुखच येत. ह्या सर्व परीस्थितीत आपला विवेक कायम ठेवला व सदगुण कायम ठेवले तर ही अवस्था येत नाही.

# सद्‌विद्या

सद्‌विद्या लक्षण सांगतांना समर्थांनी दशक २, समास ८ व ९ मध्ये याचे विवेचन केले आहे. सदविद्या लक्षण ही आत्मसुधारणेकरिता आवश्यक आहे. ही लक्षणे सर्वांनी मुद्दाम अंगीकारली पाहीजे हे पटवून देण्याकरिता समर्थ म्हणतात की रुप व लावण्य ह्या अभ्यास करण्याच्या बाबी नाहीत ती ईश्वरी नैसर्गिक देणगी आहे. काही गुण सहजतेने उपजतच माणसात आलेले असतात. त्याचा अभ्यास करुन ते आत्मसात करावे लागत नाही. परंतू जे गुण सहजगत्या आलेले नाही त्याव्यतिरिक्त इतर गुणसुध्दा माणसाने अंगीकारणे, आत्मसात करणे जरुर आहे. म्हणून अशा गुणांना समर्थांनी आगंतूक गुण असे संबोधीले आहे. सदविद्या लक्षणे सांगतांना समर्थ म्हणतात की जो दक्ष, धुर्त असतो एखाद्या गोष्टिचा योग्य तर्क करणारा असतो, नियमबध्द, शोधक व सत्य साहित्यिक असतो व ज्याच्या अंगी कुशलता चपलता व वैविध्य हे गुण असतात तो सद्‌विद्या लक्षणांनी युक्त असतो.

सद्‌विद्या लक्षण असणाऱ्या माणसाचे वर्णन करतांना समर्थ म्हणतात तो पुरश्चरणे करणारा असावा, तीर्थाच्या पवित्र ठिकाणी त्याचे वास्तव असावे, कोणतेही व्रत तो निश्चयाने करणारा असावा, परोपकारार्थ व परमार्थासाठी शरीराला कष्ट देण्याची तयारी असणारा असावा कोणत्याही सत्कृत्यात तो आपले मन व इंद्रिय ताब्यात ठेऊन ते कार्य पार करणारा असावा. असे असणारा व्यक्ती नेहमी वाद विवाद टाळून सुसंवाद करीत असतो. वाद जेथे येईल ते टाळण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असते. त्याला कोणत्याही प्रकारची उपाधी अथवा संगत नसते. त्याच्या अंगी क्रोध व दुराशा नसते. कोणत्याही गोष्टीचा क्रोध, व्देष, मत्सर इत्यादी विकार त्याचे ठिकाणी नसतात.

# विश्वमन व मानवीमन

विश्वमन मुळचे शांतमय व शक्तीसंपन्न खरे परंतु मानव देहाच्या कोंडीत अडकल्याने ते आपल्या ज्ञानमय शक्तीमय व आनंदमय अवस्थेत मुकले. ह्याचा परिणाम काय होतो. विश्वाला ज्ञानमयता व सर्वज्ञता असते तर मानवी मन अशांतता व अल्पज्ञ असते.

| विश्वमन | मानवीमन |
|---|---|
| निष्काम, निर्भय | सकाम भयभीत |
| काळांतीत | काळाधीन |
| जन्ममृत्यू खेळ | मृत्यु भयावह |
| अनेकात एकत्व | एकत्व विसरणे अनेकास खरे मानून रमते |
| आत्म्याला जाणले | विश्वाला तू पणाने जाणते |
| सत्य संकल्प | संकल्प विकल्प |
| फक्त आनंद | जागेपणा स्वप्न |
| आत्मबुध्दी | देहबुध्दी |

वास्तविक आपले मन त्या विश्वमनाचाच अंश आहे म्हणून आपल्या मनाने विश्वमनांत विलीन होऊन ईश्वर दर्शनाचा आनंद भोगला पाहिले. आपल्या देहबुध्दीची आपणच आत्मबुध्दी करविला पाहिजे

देहबुध्दीमुळे स्वानंदाचा हक्क आपण गमावून बसलो आहोत गमावलेला आनंद परत मिळविण्यासाठी आपले मन धडपड करते देहाच्या नादाने त्यांची कल्पना चुकते व हृदय-विकारी विनाशी वस्तुमध्ये ते आनंदाचा शोध करते. जेथे तो आनंद नाही तेथे तो शोधत बसण्याचा वेडेपणा सोडून आपल्या मनाने तो भगवंतापाशीच शोधावा म्हणून श्री. समर्थांनी मनाच्या श्लोकांत त्या मनाची समजूत घातली आहे.

माणसाचे मन विश्वमनाचाच अंश असल्याने त्याच्या अंगी प्रचंड

सूक्ष्म सामर्थ्य वास करते देहाला चिकटून स्थूलाचे सतत चिंतन करण्याची सवय लागल्याने मनाचे हे सामर्थ्य व्यक्तपणे अनुभवास येत नाही. श्री. समर्थांचे ठाम मत आहे की, स्वसामर्थ्याच्या अज्ञानापायी माणूस दु:ख भोगतो हे अज्ञान मनात रहाते अज्ञानी मन चुकीच्या कल्पना करते. आपण केलेल्या कल्पना चुकीच्या आहेत असे मनाला पटवून दिले की, अज्ञानाचे आसन हालते व भगवंत स्मरणाचा अभ्यास सुरु होतो. माणासाचे मन अज्ञानी खरे पण उत्क्रांत आहे यात विश्वमनाची कल्पना करता येते. शिवाय ज्याने चिंतन करावे त्याचे रुप बनावे हा मनाचा मोठा गुण आहे म्हणून स्थुलामागे धावण्याची त्याची सवय क्षीण करुन सूक्ष्माचे चिंतन करायला शिकविले तर ? म्हणून समर्थांनी मनालाच उपदेश केला आहे.

या प्रश्नाचे उत्तर समर्थांच्या तत्वज्ञानामध्ये सापडतं श्री. समर्थ अद्वैतवादी होते त्यांचे स्पष्ट मत असे होते की, माणसाचे जीवन या विश्वजीवना पासून वेगळे काढता येत नाही. इतकेच नव्हे तर माणूस विश्वाची छोटी प्रतिकृती आहे प्रतिकृति म्हणजे लहान प्रतिमा किंवा नमुना.

सच्चीदानंद स्वरुप ईश्वर, हिरण्यगर्भ अथवा विश्वमन आणि दृष्य विश्व मिळून विश्व बनते तर आनंदरुप आत्मा, मन आणि शरीर मिळून माणूस बनतो. तो आत्मरुपाने माणसाच्या अंतर्यामी त्याच्या हृदयात वास करतो त्याचप्रमाणे अनेक सूर्यमाला आणि अनंत तारे असलेले दृष्य विश्व त्या पंचभूतांचे बनलेले आहे त्याच पंचभूतांपासून माणसाचे शरीर तयार होते. पण ज्ञानी पुरुष असे सांगतात की हे अवाढव्य विश्व ईश्वराच्या मूळ संकल्पापासून निर्माण झाले. विश्व निर्माण करणारा ईश्वरी संकल्प सत्य होता म्हणुनच तो ज्ञानमय व शक्तीमान होता. त्याला धारण करण्यास तितकेच ज्ञानमय व शक्ती संपन्न विश्वमन आवश्यक असते. अर्थात विश्वाच्या रचनेत सच्चीदानंद ईश्वर आणि पंचभुतात्मक दृष्य विश्व यांच्यामध्ये विश्वमन वास करते ईश्वराच्या सत्य कर्मानुसार जगातील साऱ्या घटना घडवून आणणे हे विश्वमनाचे प्रधान कार्य असते. संपूर्ण विश्वाला जाणीव रुपाने

आतबाहेर व्यापणारे विश्वमन प्रत्येक प्राण्याच्या शरीरात मनाच्या रुपाने वास्तव्य करते. विश्वमन ईश्वराला विसरत नाही. पण प्राण्याचे मन माणसाचे मन आत्मरुपास विसरते. दृष्यांत रमणाऱ्या व दृष्याचा शोध घेण्यात पटाईत असणाऱ्या मानवी मनाला आनंदरुप आत्म्याचा अनुभव येत नाही स्वानंदाचा अनुभव येण्यासाठी त्या मनाचे शोधन करावे लागते. मनानेच मनाचे शोधन करुन त्यास आनंद भोगण्यास तयार करावे लागते. म्हणून श्री. समर्थांनी मनाला उपदेश केला आहे.

# नामस्मरण

नित्य करिता नामस्मरण! वृत्ती पालटे आपण!
नामासारेखाच हरी! रीघे हृदया माझारी!

नामाबरोबर ह्रदयात हरी शिरतो व त्याने ह्रदय शुध्दी होऊ लागते. नित्यनियमाने नामस्मरण केले असता वृत्ती आपोआप पालटुन जातात. वासना प्रपंचाला सोडुन जनार्दनाला चिकटते व अहंकार अहंपणाला सोडून सोहम परब्रह्म तेच मी या भावनेत शिरतो. चित्त हे चित्ताला विसरुन भगवंताला जडून राहतात. मनाचे मनपण मोडुन ते संकल्प विकल्प करायला विसरतो बुध्दी ही कृतनिश्चयाने समाधिरुपच होऊन राहते. अशी ह्रदयाची शुध्दी झाली म्हणजे हरी तेथून बाहेर निघतच नाही. ह्या नामाबद्दल विविध संतांनी खालीलप्रमाणे पुरावे दिले आहे.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात "हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी!"

तसेच "ज्ञानदेव म्हणे जप माळ। अंतरी धरोनी श्री हरि जपे।। सदा पुढे महाराज म्हणतात ते नामे सोपेरे। रामकृष्ण गोविंद । वाचेशी सद्गद। जपाआधी ।

तुकाराम महाराज म्हणतात "घेईघेई माझे वाचे गोड नाम विठोबाचे " ह्याच नामाचा महिमा सांगत असतांना महाराज म्हणतात ज्या नामे तरले शुकादिक! नारद संत मुनीजन साधु! जणोनिया जे न सरे! ते नेणती जैसा गज अधु!
सहज तुक्या नामची जपता स्वरुपावेधु

नामदेव महाराजांनी नामाला "अमृताहुनी गोड नाम तुझे देवा" असे म्हणून नामाची गोडी वाढवीली आहे. संत चोखामेळा यांनी

नामस्मरणाने सर्व चिंतांचे हरण होते असे विधान करुन "हरि नाम गर्जता ! नाही भव चिंता ! ऐसे बोले गीला । भागवत।" असे म्हटले आहे.

तुकडोजी महाराजांनी प्रभुचे मंगलमय गाण सतत गाण्यासाठी मंगलमय नाम तुझे सतत गाऊंदे अशी परमेश्वराकडे प्रार्थना केली. परमेश्वराचे नाम अखंड जपावे. ही एक प्रकारची नामसाधनाच आहे. ही नामसाधना करीत असतांना त्यात सातत्य सांभाळले असता त्या नामाचा अंतःकरणावर संस्कार उमटण्यास सुरुवात होते. हा संस्कार जसा दृढ होत जाईल तसा त्या संस्काराचा स्वाभाविक परिणाम म्हणून त्या नामाचे प्रयत्नावाचून स्मरण होईल. प्रयत्नावाचून झालेले स्मरण मध्यमा वाणीवाटे परा व पश्चंती वाणीत उतरते स्थिर होते आणि असे स्थिर झालेले नाम ही खरी नामसाधना होय.

# नामस्मरण भक्ती

अकृत्रिम भावाने भगवंताचे अनुसंधान करणे म्हणजे भक्ती होय. हया अनुसंधानाची उत्पत्ती प्रेमातून होते. भक्ती म्हणजे भगवंताविषयीचे गाढ प्रेम. जीवनाचे परमलक्ष प्राप्त करुन घेण्याचा मार्ग म्हणजे भक्ती. हे प्रेम त्रिकोणात्मक हवे. त्याचा पहिला कोन म्हणजे प्रेमात देवघेव नसते, मोबदल्याची अपेक्षा नसते याचा दुसरा कोन म्हणजे प्रेम निर्भय असते. प्रेमास्पदाच्या ठिकाणी भयाचा अभाव असतो अर्थात परमेश्वर आपल्याला शिक्षा देईल, कोप होईल ही भावना त्या ठिकाणी राहत नाही. प्रेम हे भयाला जिंकते. यातील तिसरा कोन म्हणजे प्रेम हे उज्वल, निर्मळ, एकनिष्ठ व आदर्श हवे. ईश्वराशिवाय दुसरा कोणाचाही विचार मनात यावयास नको. अशा त्रिकोणात्मक प्रेमाच्या अनुसंधानातून ईश्वराची भक्ती करावयाची असते. ईश्वर म्हणजेच ज्याच्यापासून हे विश्व जन्म पावते व ज्यामध्ये ते अवस्मित होते व ज्यात ते लय पावते तोच ईश्वर. आपण ज्याचे वर्णन करतो तो सगुण ईश्वर ज्ञानीजन ज्या सत्‌चित्‌आनंद स्वरुप ब्रहमाचा लाभ करुन घेतात ते ब्रहम वेगळे व भक्त गणांचा प्रेमस्वरुप भगवान निराळा असे मुळीच नाही. तर ज्ञानाचे सत्‌चित्‌आनंद ब्रहमच भक्तांचा प्रेममय भगवान होय. ईश्वर, सगुण व निर्गुणही आहे. भक्त ज्याची उपासना करतात तो सगुण ईश्वर ज्ञान्यांच्या ज्ञानगम्य परब्रहमाहून मुळीच वेगळा नाही. ते केवळ अव्दितीय ब्रहमच तथापि ब्रहमाचे निर्गुण स्वरुप अतिशय सूक्ष्म असल्यामुळे ते प्रेमाचा विषय होऊ शकत नाही. म्हणून भक्तगण त्याच परब्रहमास सगुण स्वरुपाची उपासना करण्यात आनंद मानीत असतात. भक्तांचा इश्वर म्हणजे परब्रहमाचे सगुण स्वरुप होय. अशा या परब्रहमाची सगुण भक्ती करण्याकरिता आपल्याला प्रेमाचे अनुसंधान लावायचे आहे.

नामे पाषाण तरले! असंख्यात भक्त उध्दरले!
महापापी तेची झाले! परम पवित्र!

वरील ओवी दशक क्र. ४ व समास क्र. ३ यामधील १८ वी ओवी आहे. या संपूर्ण समासात ईश्वराच्या नामस्मरणाचे महत्व किती आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. नामस्मरण ही तिसरी भक्ती असून तिच्यात किती शक्ती आहे. हे समर्थ येथे सांगत आहेत. प्रभु रामचंद्रांना सीतेची लंकेतून सुटका करावयाची होती परंतू सागर तरुन जाणे कठीण होते. तेव्हा समस्त वानर सेनेने रामनाम घेऊन एक एक दगड समुद्रात टाकला व तो दगड पाण्यावर तरंगुन सागरावर पूल तयार झाला. तो तरुन रामाने रावणाच्या राज्यात नेलेल्या सीतेला लंकेवर स्वारी करुन सोडवून आणले. हा रामनामाच्या महिमा आहे. सर्व वानर रामनाम घेतल्यामुळे उध्दरले. भक्त गणांचा उध्दार झाला आणि पाषाणही तरले. एवढेच नाही तर दुष्ट बुध्दीचा रावण परंतु मृत्यु समयी रामनाम घेतल्यामुळे पापी असून सुध्दा त्याला मुक्ती मिळाली. वाल्या कोळी, पापी अजामेळ हेही नामस्मरणाने तरले व मुक्त पावले.

रामनामाचा महिमा वर्णन करतांना समर्थ म्हणतात श्री शंकर हेही रामनाम घेत असत देव दानव ह्यांनी समुद्रमंथन केले तेव्हा त्यातून १४ रत्ने बाहेर आली. त्या बरोबर विषही बाहेर पडले. पण विषाचा स्विकार कोणी करेना. तेव्हा श्री शंकराने ते विष प्राशन केले. सर्व अंगाचा दाह होऊ लागला. तो दाह शांत करण्यासाठी शंकराने अखंड रामनामाचा जप केला. व त्याचा दाह शांत झाला. असा नामाचा महिमा अगाद आहे. नामस्मरणाने उध्दार तर होतोच पण मुक्तीही प्राप्त होते.

आपणहून न करता जो जप आपोआप चालतो तो अजप होय. बाहेरचा वायू आत घेणे हा श्वास तर आतील वायु बाहेर सोडणे हा प्रश्वास. श्वास घेतांना सोकार तर सोडतांना हुंकार होतो. सोकार

शांतीरुप आहे तर हुंकार शिवरुप आहे. 'मरा मरा' असा जेव्हा अजपा झाला तेव्हा राम राम हा जप आपोआप घडून आला व त्याने वाल्याचा वाल्मिकी झाला. सोहम आणि ओंकार एकच आहे. सोहम प्रणवरुप आहे . प्रत्येक जीव सर्व देहाला, सर्व अवयवाला व्यापून सोहम सोहम करीत हृदयात राहतो. प्रणवामध्ये परमेश्वराची भावना करुन रात्रंदिवस योगी लोक भक्तीपूर्वक प्रणवाचा जप करतात. श्री समर्थ म्हणतात की रोज २४ तासात आपले एकवीस हजार सहाशे श्वास प्रश्वास होतात हीच अजपाची संख्या होय. स्वराचे जन्मस्थान आत आहे. एकांतात मौन धरुन बसावे व आत लक्ष द्यावे म्हणजे सोहम, सुक्ष्मनाद ऐकावयास येतो. अर्थात श्वास घेतांना 'सो' व सोडतांना 'हं' असा सोहम मंत्र अजापात चालतो. हा शब्द मागे टाकून सुक्ष्मात जाणारा तो खरा मौनी होय. सर्व जीवांच्या अंतर्यामी अजपा असतो. आपल्या मधील अजपा आपण अगदी सहजपणे बघावे त्याचे दर्शन झाले की ध्यान सहजपणे घडते व माणूस सहजपणे वागला की अंतरात्मा प्रसन्न होतो. अंतरात्मा देहाच्या आत बाहेर सर्वत्र भरला आहे. परंतु अज्ञानामुळे माणूस तीथपर्यंत जाऊ शकत नाही व तो दुख भोगत राहतो. विवेकशील माणूस हा दृष्यातून निवृत्त होऊन अंतरात्म्यास ओळखतो. अविवेकी माणूस दृष्यामध्ये प्रवृत्त होऊन नाना प्रकारची दुःखे भोगतो. आजुबाजूला संपत्ती भरलेली असून तिच्यामध्ये भाग्यहीन माणूस जगतो तेव्हा त्याचे करंटेपण अधिकच उठून दिसते. परमानंद स्वरुप परमात्म्याने हा केवढा मोठा चमत्कार केला आहे. अंतरात्मा हा देहाच्या आत बाहेर सर्व ठिकाणी भरलेला असून त्याच्या अज्ञानामुळे माणूस दुःख भोगतो.

# उपासना

एका श्रोत्याने श्री समर्थांना असा प्रश्न विचारला की जगामध्ये पुष्कळ लोक आपापल्या देवतेचे पूजन मनापासून करतात. त्यांच्या उपासना देखील पुष्कळ प्रकारच्या असतात. व प्रत्येकजण आपल्या उपासनेला निर्गुण म्हणतात हे कसे ?. ह्यावर समर्थांने उपासना निरुपण हा समास सांगीतला आहे. श्री समर्थ म्हणतात आपापल्या देवतांची स्तुती करणे हा माणसाचा स्वभाव आहे. परंतू ते ज्या देवतांची पूजा करतात, उपासना करतात, ते अंतरात्म्यांचेच अंशरुप असतात. भक्तलोक जे भजन पूजन करतात ते अखेर अंतरात्म्यालाच पोहोचते. पावसाचे पाणी झाडाच्या शेंडयावर पडते पण अखेर ते मुळाकडेच जाते. सगळयांनाच मूळ सापडत नाही. फक्त साधुच्याच अंगी आत्मनात्म विवके असतो. तोच फक्त मूळ अंतरात्म्यापर्यंत पोहोचतो. जे चंचलपणे बदलते ते सगुण व जे निश्चल असते ते गुणातीत निर्गुण असते. ह्या गोष्टि प्रत्येकाने विवेकाने समजून घेऊन त्याप्रमाणे उपासना करावी. उपासना उत्तम चालली तर हा विचार आपोआप समजतो. अनेक लोक अनेक भाषा अनेक मने, अनेक जनावरे या पृथ्वीवर आहे. अर्थात या सृष्टीत सगुण निर्गुण एकत्र कालवलेले आहे. पण सूक्ष्म विवेकाने ते एकमेकापासून वेगळे करणे जरुरी आहे. उपासनेने ही बाब घडू शकते.

# विमलब्रह्म चिंतन

परब्रह्म अनिंद्रिय आहे, अनिर्वाच्य आहे, कल्पनातीत व दुर्बोध आहे. तरीपण या विमलब्रह्माचे तत्वज्ञान समर्थांनी अत्यंत सोप्या भाषेत सांगीतले आहे. ते म्हणतात ब्रह्म हे धरावे म्हटले तर धरता येत नाही, टाकण्याचा प्रयत्न केला तर टाकता येत नाही, जिकडे तिकडे त्याचे अस्तित्व आहे, तोंड फिरवू म्हटले तरी ते तोंडासमोरच राहते. काही केल्या त्यास चुकविता येत नाही. जसे आकाश सर्वत्र असते त्याच प्रमाणे परब्रह्म सर्वत्र व्यापून आहे. माणूस कोठेही पळू लागला तरी जसे त्याच्या भोवती आकाश असतेच तसेच तो कोठेही गेला तरी परब्रह्म हे समोर असतेच. तीर्थाचे दर्शन घेण्यास तरी उठून जावे लागते पण परब्रह्म हे बसल्या जागी पाहता येते. ब्रह्म हे जसे पोकळ आहे तसेच ते दाट भरले आहे. वैकुंठ, कैलास, स्वर्गलोक, ईहलोक, परलोक सर्व लोकात ब्रह्म व्यापून राहिलेले आहे. ते पावसाने भीजत नाही, चिखलाने भरत नाही इंद्रियांना न भासणारे व आकलन न होणारा आकार तोच परब्रह्म आहे. संत आणि साधू ह्यांच्या विश्रांतीचे स्थान म्हणजे परब्रह्म शब्द हे ब्रह्मापर्यंत पोहोचू शकत नाही. मानवी कल्पना ब्रह्माची कल्पना करु शकत नाही. अशा या कल्पनातीत निरंजन स्वरुपाला विवेकाने ओळखावे. अध्यात्माच्या श्रवण मननाने हा विवेक साधतो. विवेकाने ब्रह्मस्वरुप ओळखले की जन्म सार्थकी लागून संपूर्ण समाधान लाभते. निगुर्ण निराकार असे ब्रह्म हे विवेकाने ओळखावे. म्हणजे जन्माचे सार्थक होते. सर्व साधनांचे रहस्य अध्यात्म श्रवणात आहे. श्रवण करुन सतत मनन, चिंतन व स्वानुभव या क्रमाने गेले की ज्ञानाचे विज्ञान होते व मग उन्मनी अवस्था येते. ज्याला उन्मनी अवस्था येते त्यालाच साधनेचे फळ मिळते. त्याचा संसार सफल होतो व निश्चल व निर्गुण बह्म त्याच्या अंतर्यामी स्थिर होते.

**सर्वज्ञानामधे आत्मज्ञान हे श्रेष्ठ ज्ञान आहे.**




## सौ. सुहासिनी वसंत जलतारे

जन्म १० ऑक्टोबर १९३३

ॲड्. श्री बिंदुमाधव लुकतुके व सौ. इंदिराबाई लुकतुके ह्यांच्या सुविद्य कन्या. शिक्षण बी. ए. पर्यंत. लग्नापूर्वी समाजकल्याण खात्यात वर्ग-२ अधिकारी. २१ मे १९५८ साली अकोट येथील प्रतिथयश वकील ॲड्. वसंत ह. जलतारे ह्यांचेशी विवाह संपन्न झाला व आपल्या शासकीय नोकरीचा राजीनामा देऊन संसारात पदार्पण केले. अतिशय सुधारित विचारसरणी, सुसंस्काराची संपन्नता, समाजसेवेची तळमळ, बालकांप्रती प्रेम, गुरूभक्ती, कुटुंबवत्सल, साहित्याची अभ्यासक, सृजनशील व्यक्तिमत्त्वाची धनी. गुणग्राहक असणाऱ्या लेखिकेने १९७५ मध्ये सुबोध संस्कार वर्गाची स्थापना केली. आकोट गावी पत्रद्वारा दासबोध मंडळ सुरू करून अनेक गृहिणींना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. बालसंस्कार केंद्राच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवितांनाच सुबोध संस्कारधारेच्या काठी अनेक बालकांना आनंदाची अनुभूती दिली. हे सर्व करतांना कर्तव्यदक्ष गृहिणी, आदर्श पत्नी व आदर्श माता ही भूमिका यशस्वी पार पाडत आपला संसार अतिशय


सार्थक केला. आज त्यांची मुले अत्यंत सुसंस्कारीत व उच्चपदस्थ आहेत. त्यांची चार अपत्ये म्हणजे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या चार कोनांची अभिव्यक्तीच आहे. मुख्याध्यापिका म्हणून ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतलेली कन्या सौ. शैलजा लुले ही त्यांच्या अध्यात्मिक व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती, संपादक डॉ. वसुधा विनोद देव म्हणजे शैक्षणिक व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती, एच. पी. ह्या मल्टीनॅशनल कंपनीत मॅनेजर पदावर असणारे श्री जयंत जलतारे म्हणजे त्यांच्या आधुनिक व्यक्तिमत्वाची अभिव्यक्ती तर विंग कमांडर श्री नारायण जलतारे म्हणजे त्यांच्यातील देशभक्त व्यक्तिमत्वाची अभिव्यक्ती आहे. लेखिकेच्या सुविद्य स्नुषा सौ. अर्चना जयंत जलतारे व सौ. प्रणोती नारायण जलतारे तसेच जामात डॉ. सुनिल लुले व श्री विनोद देव ह्या सर्वांच्या सहअस्तित्वाने त्यांचा संसार हा अतिशय परिपूर्ण संस्कार संपन्न असा आहे व हा संस्काराचा वारसा आता त्यांच्या पुढच्या पिढीत सुद्धा आलेला आहे. प्रत्येक आदर्श कुटुंबाचा पाया ही स्त्री असते हे वाक्य सार्थ करण्याऱ्या लेखिका. २८ एप्रिल २०११ साली त्या ब्रह्मलीन झाल्यात पण पुढील अनेक पिढ्यांपर्यंत त्यांची ही 'संस्कारधारा' अनेक बालकांचे जीवन आनंदमय करतील व ह्या संस्काराने त्यांच्या जीवनात यश प्राप्त करून देतील.

-----



"We Worship your Feet
So that we reach your heart
that's sweet."

❋


भारतीयांच्या संस्कृतीचा आम्हाला अभिमान ।
पुढे चालवू वतन आम्ही हे देशाची ती शान ॥
आम्ही भावी जवान...
सुजलाम् सुफलाम् भूमिवरती असलो आम्ही सान ।
समृध्दीच्या शिखरावरती नेऊ तिला हे काम ॥
आम्ही भावी जवान...